# भाषा :

## स्वरूप, सामर्थ्य व सौन्दर्य

डॉ. वामन केशव लेले

राजहंस प्रकाशन ™

राजहंस प्रकाशन ™

# भाषा :
# स्वरूप, सामर्थ्य व सौन्दर्य

डॉ. वामन केशव लेले

राजहंस प्रकाशन

भाषा : स्वरूप, सामर्थ्य व सौन्दर्य
डॉ. वामन केशव लेले

प्रकाशक
दिलीप माजगावकर
राजहंस प्रकाशन
१०२५, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०
फोन - (०२०) २४४७३४५९
E-mail : rajhans1@pn2.vsnl.net.in

मुद्रक
रोहन एंटरप्रायझेस
१६/२, 'स्वोजस'
सहवास सोसायटी
कर्वेनगर
पुणे - ४११ ०५२

Bhasha : Swaroopa,
Samarthya va Saundarya
W. K. Lele

© वा. के. लेले
A1/2 सर्वत्र सोसायटी,
पौड रोड, कोथरूड,
पुणे ४११ ०३८
फोन - (०२०) २५४४६५४५

अक्षरजुळणी
रेखा ढोले
प्रिंट लिंक
७६९/५, शिवाजीनगर
पुणे ४११ ००४

मुखपृष्ठ : सतीश देशपांडे

आवृत्ती पहिली : मार्च २००५

ISBN 81-7434-313-X

**किंमत : ८० रुपये**

*माझे ज्येष्ठ साडू श्री. विष्णू नरहर कानेटकर*
*आणि त्यांच्या पत्नी सौ. उषाताई यांस*
*प्रेमादरपूर्वक —*

[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]
[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]

— [illegible]

[illegible]
[illegible]

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

# मनोगत

प्रस्तुत पुस्तकातील निबंध ह्यापूर्वी काही नियतकालिकांत व विशिष्ट प्रसंगी प्रकाशित करण्यात आलेल्या ग्रंथांत प्रसिद्ध झालेले आहेत. ते एकत्रित केल्यास जिज्ञासू वाचकांची सोय होईल असे वाटल्यावरून ते या संग्रहात आवश्यक त्या फेरबदलांसह पुनर्मुद्रित केले आहेत. या पुनर्मुद्रणास परवानगी दिल्याबद्दल मी संबंधित नियतकालिकांच्या संपादकांचा आणि ग्रंथांच्या प्रकाशकांचा आभारी आहे.

ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या बाबतीत एक सुखद अनुभव आला, तो आवर्जून नमूद करावासा वाटतो. मी सुमारे वर्षभरापूर्वी ह्या निबंधसंग्रहाची मुद्रणप्रत माझे प्रकाशक - मित्र श्री. दिलीप माजगावकर यांना प्रकाशनविचारार्थ दिली होती. त्यानंतरच्या काळात त्यांच्या-माझ्या चारपाचदा गाठीभेटी झाल्या पण ह्या पुस्तकाचा विषय कधीही निघाला नाही व मीही हा विषय विसरून गेलो होतो. आणि अचानकपणे २९ नोव्हेंबर २००४ रोजी त्यांनी माझ्याकडे संपूर्ण पुस्तकाची संगणकीय प्रुफेच पाठवून दिली. ती पाहून मला आश्चर्यानंदाचा धक्काच बसला! गेल्या वर्षभराच्या काळात त्यांनी हस्तलिखित वाचले कधी, पुस्तक प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला कधी आणि मजकूर संगणकीय अक्षरजुळणीसाठी पाठविला कधी ह्यांचा मला अजिबात थांगपत्ता लागू दिला नाही. म्हणजे इकडे लेखक 'अंधारात' आणि तिकडे त्याचे पुस्तक 'प्रकाशा'च्या वाटेवर! अशी आगळीवेगळी व्यवसायशैली असलेल्या ह्या प्रकाशक-मित्राला मनापासून धन्यवाद!

प्रिंटलिंकच्या सौ. रेखा ढोले आणि त्यांचे सहकारी यांनी त्यांच्या उज्ज्वल परंपरेला साजेल अशी अक्षरजुळणी केल्याबद्दल त्यांचे तसेच श्री. सतीश देशपांडे यांनी पुस्तकाला आकर्षक मुखपृष्ठाचा साज चढविल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो.

जिज्ञासू वाचक ह्या निबंधसंग्रहाचे यथोचित स्वागत करतील अशी आशा आहे.

**- वामन केशव लेले**

# अनुक्रम

१. सावरकर आणि भाषाशुद्धी / १

२. संभाषणाची भाषा : स्वरूप व वैशिष्ट्ये / १२

३. ललित साहित्याची भाषा / ३१

४. वाग्वैजयंतीची भाषा : एक नमुना पाहणी / ४९

५. जुन्या मराठी शब्दांचे पुनरुज्जीवन / ५६

६. भाषांतर : समस्या व उपाय / ७८

# १.

# सावरकर आणि भाषाशुद्धी *

१. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी दिनांक २६ जून, १९३७ रोजी 'मराठी भाषेचे शुद्धीकरण' ह्या विषयावर पुणे येथे एक भाषण दिले होते. त्यात त्यांनी पुढील विचार सूत्ररूपाने मांडले होते.

१.१ ज्या वस्तूंचे, कल्पनांचे व विचारांचे बोधक शब्द मराठी भाषेत मुळात आहेत, त्यांच्या अभिव्यक्तीसाठी परक्या भाषेतील नवीन शब्दांचा स्वीकार व प्रयोग करू नये, कारण असे शब्द म्हणजे जणू आपल्या पराभवाची स्मारके होत. त्यांचा पुरस्कार हे आपल्या मनोदास्याचे लक्षण आहे.

१.२ नवीन वस्तू, कल्पना व विचार यांचे वाचक परभाषेतील नवे शब्द मराठी भाषेने अवश्य स्वीकारावेत.

१.३ मराठी भाषेचा शब्दकोश समृद्ध आहे. तो आपण प्रयत्नपूर्वक सुरक्षित ठेवला पाहिजे.

१.४ नित्याच्या व्यवहारात चार-साडेचारशे परकी शब्द आहेत. आपण त्यांचे निर्धारपूर्वक उच्चाटन केले पाहिजे व त्यांच्या जागी संस्कृत भाषेतील शब्द शोधून, वारंवार योजून रूढ केले पाहिजेत.

१.५ परक्यांच्या वर्चस्वाचे स्मरण करून देणारे शब्द झुगारून देऊन शिवाजी महाराजांनी स्वभाषेची सेवा केली. आपणही अशीच स्वाभिमानी वृत्ती ठेवली पाहिजे.[१]

२. सावरकरांच्या वरील वैचारिक सूत्रांचे विवरण करण्यापूर्वी काही गोष्टींचा खुलासा

---

* पूर्वप्रसिद्धी- 'गरुडझेप', १९८३, पृ. २३-३२.

केला पाहिजे. सावरकरांनी वरील विचार भाषाशास्त्रज्ञाच्या भूमिकेतून व्यक्त केलेले नव्हते. त्यांनी ते एका देशभक्ताच्या भूमिकेतून मांडले होते. त्यांच्या ह्या विशिष्ट भूमिकेमुळेच 'निष्कारण आलेले परके शब्द आपल्या पराभवाची स्मारके होत; त्यांचा स्वीकार हे आपल्या मानसिक गुलामगिरीचे लक्षण आहे; स्वभाषेच्या प्रसाराच्या इच्छेने परकीय शब्द आपण मराठी भाषेतून उडविले पाहिजेत; संस्कृतातील एकेक शब्द म्हणजे जणू काव्यच; आपण भाषेच्या बाबतीत स्वाभिमानी वृत्ती ठेवली पाहिजे,'[१] अशा प्रकारची विधाने त्यांच्या वरील भाषणात आढळतात. भाषेचा केवळ शास्त्रदृष्ट्या विचार करणारा भाषाशास्त्रकार अशी विधाने करणार नाही, हे वेगळे सांगावयास नको. स्वदेश, स्वधर्म व स्वभाषा यांच्याविषयीचा, विष्णुशास्त्र्यांपासून चालत आलेला, उज्ज्वल वारसा प्राणपणाने जपणाऱ्या अत्यल्प कृतिवीरांमध्ये स्वा. सावरकरांची गणना होते. त्यामुळे त्यांनी आपल्या विचारसरणीस किंवा जीवनदृष्टीस अनुसरून वरील विचार मांडले आहेत, हे ध्यानात घेऊन मगच त्यांचे विवेचन आपण करावयास हवे. एवढ्या खुलाशानंतर आता सावरकरांच्या उपर्युक्त सूत्रात्मक विचारांकडे वळू.

३. ज्या कल्पना-विचारांचा बोध करवून देणारे शब्द मराठी भाषेत मुळातच अस्तित्वात आहेत त्या कल्पना-विचारांच्या प्रकटीकरणासाठी परभाषेतील शब्दांचा स्वीकार मराठी भाषकांनी करू नये, असे सावरकरांचे साग्रह प्रतिपादन आहे. ते बहुतांशी स्वीकार्य आहे. "भाषा ज्या समाजात वापरली जाते त्या समाजात सदस्यांचे परस्पर-व्यवहाराचे साधन आहे.... सामाजिक आंतरव्यवहार भाषेमुळे शक्य होतो...."[२] मनुष्य आपली मनोगते दुसऱ्यांना कळविण्यासाठी सतत बोलत असतो. इतरेजन त्याचे बोलणे ऐकत असतात. अर्थात मनुष्य ऐकणे व बोलणे ह्या दोन भाषिक कौशल्यांचा सर्रास व अधिक प्रमाणात उपयोग करीत असतो. वाचणे व लिहिणे ह्या दोन भाषिक कौशल्यांचा वापर सापेक्षतया कमी प्रमाणात करीत असतो.[३] अर्थात आपले बोलणे किंवा लिहिणे क्रमश: ऐकणाऱ्याला किंवा वाचणाऱ्याला समजले पाहिजे एवढी काळजी मनुष्याला घ्यावीच लागते, तरच परस्पर-व्यवहार किंवा विनिमय शक्य होतो. परंतु सरतेशेवटी भाषा ही 'व्यक्तीच्या स्वाधीन आणि व्यक्तिनिर्मित असते.'[४] त्यामुळे कधीकधी व्यक्तीला सर्वपरिचित व सर्वमान्य ध्वनिनिर्मित संकेत बाजूला सारून, केवळ स्वत:ला परिचित व मान्य असणाऱ्या संकेतांचा अवलंब करण्याचा मोह होतो. तसा तो झाला की, त्या व्यक्तीचे बोलणे अथवा लिहिणे श्रोत्याला किंवा वाचकाला अनाकलनीय होऊन बसते. उदाहरणार्थ, 'कोणत्या दोऱ्या ओढाव्यात ते मला ठाऊक आहे', 'त्यांनी कायदा हाती घेतला', 'संपामुळे सर्व व्यवहार ठप्प झाले', 'मुख्यमंत्री प्रधानमंत्र्यांच्या हुकमांची तामिली करतात', 'त्याचे बोलणे ऐकून मी चक्रावून गेलो', 'उमेदवारांना मतदारांच्या एकगठ्ठा मतांची अपेक्षा

होती', 'साहेब प्रदर्शन पाहून परेशान झाले', 'वाटल्यास मी भविष्यात प्रॅक्टिस सुरू करीन', 'स्त्री-मुक्तीचे नारे ऐकू येऊ लागले', 'लेखकाने असे प्रसंग मूळ आशयाला सशक्त करण्यासाठी घातले', 'आमची संघटना आंदोलन छेडणार आहे', ह्या व अशासारख्या वाक्यांत इंग्रजी व हिंदी भाषांतील शब्दांचा व वाक्प्रयोगांचा आढळ होतो. वस्तुत: 'त्यांनी कायदा धुडकावून लावला (किंवा धाब्यावर बसवला)'; 'त्याचे बोलणे ऐकून मी भांबावून (बावचळून, गोंधळून) गेलो'; 'स्त्रीमुक्तीच्या (कानठळ्या बसवणाऱ्या) घोषणा ऐकू येऊ लागल्या'; 'मूळ आशयाला बळकटी यावी म्हणून लेखकाने असे प्रसंग योजले', अशा प्रकारची मराठी वळणाची निर्मिश्र वाक्ये अधिक परिणामकारक वाटतात. वरील संमिश्र वाक्यांतील आशय परभाषांतील शब्दांवाचून पूर्णपणे व अविकृतपणे व्यक्त होऊ शकतो. अर्थात परभाषांतील शब्दांचा वापर अपरिहार्य नाही. शिवाय, ज्या श्रोत्यांना किंवा वाचकांना परभाषांतील शब्द ठाऊक नसतील त्यांची तशा शब्दांच्या योजनेमुळे गैरसोय होणार, हे उघड आहे. म्हणजे भाषेचा मूळ उद्देशच सफल होणार नाही. म्हणूनच परिचित कल्पना-विचारांचे बोधक असे मराठीतील प्रचलित शब्दच वापरावेत, त्यांच्या जागी परभाषांतील शब्दांचा वापर करू नये, ही सावरकरांची तात्त्विक भूमिका पटण्याजोगी आहे. मात्र, परभाषांतील अशा शब्दांना, सावरकरांनी मानल्याप्रमाणे, पराभवाची स्मारके न मानता अप्रगल्भ किंवा उथळ मनोवृत्तीची लक्षणे मानणे युक्तियुक्त ठरेल.

ह्यानंतर आता त्यांच्या दुसऱ्या विचाराचे अवलोकन करू.

४. नवीन वस्तू, नवीन कल्पना व नवीन विचार यांचे द्योतक परभाषेतील नवीन शब्द मराठी भाषेने अवश्य स्वीकारावेत, अशी सावरकरांची सूचना आहे. ती कोणत्याही जिवंत व वर्धिष्णू भाषेच्या स्थितिगतीला व प्रवृत्तीला पूर्णपणे धरूनच आहे. प्रचारात असलेली कोणतीही भाषा ही 'एक सर्वोपयोगी अशी सामाजिक संस्था आहे. सर्व वर्गांच्या सहजीवनाचे आणि सहकार्याचे ते एकमेव अपरिहार्य साधन आहे.'[५] हे सामाजिक जीवन कधीच स्थिर नसते. ते सतत बदलत असते. समाजातील स्त्री-पुरुषांना सुचणाऱ्या नव्या कल्पना, त्यांच्या बुद्धीला सुचणारे नवे विचार वा सिद्धान्त, त्यांनी शोधून काढलेली नवी यंत्रे, तंत्रे व/वा उपकरणे, समाजातील व्यक्तींचा इतर समाजांशी व संस्कृतींशी येणारा संबंध, त्या संबंधामुळे जाणवणाऱ्या नव्या संकल्पना, प्रथा व रीती इत्यादी 'नवे अनुभव' प्रत्येक समाजाला नित्य येतच असतात आणि "एखादी नवीन कल्पना वा नवीन अनुभव योग्य शब्दांत प्रगट करण्याची गरज भासू लागताच आपल्या भाषेत नवीन शब्द आणण्याची आवश्यकता प्रतीत होते."[६] मराठी भाषेनेही अशा नव्या अनुभवांच्या अभिव्यक्तीसाठी देशी, संस्कृत, कन्नड, तेलुगू, तमीळ, अरबी, फारसी, तुर्की, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रजी अशा

अनेक भाषांतील नव्या शब्दांचा स्वीकार केला आहे.[७] ह्या शब्दांमध्ये परस्पर-विनिमयाच्या समस्त अंगोपांगांशी निगडित असलेल्या शब्दांचा अंतर्भाव आहे. असाच प्रकार इंग्रजी भाषेच्याही बाबतीत घडून आलेला दृष्टीस पडतो. इंग्रजी भाषेने भारतीय भाषांकडून केलेल्या उसनवारीचा अत्यंत मनोरंजक व उद्‌बोधक अभ्यास श्री. जी. सुब्बाराव ह्यांनी केला आहे. ते Indian Words in English नामक आपल्या एतद्‌विषयक पुस्तकाच्या सुरुवातीलाच म्हणतात : "Since the beginning of direct and uninterrupted intercourse between England and India in 1600, with the chartering of the East India Company, there has been a continuous and considerable influx of Indian words into English."[८] ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीमध्ये असे प्रधान ९०० शब्द व तत्साधित हजारो शब्द दाखल करून घेण्यात आले आहेत.[९] ह्या शब्दांमध्ये अचार, कचहरी, कनात, काफिला, घी, चद्दर, चिठ्ठी, चौकी, दफ्तर, दरोगा, दाल, फर्मान, बट्टा, बक्षीश, बाजार, बेगम, बोरा, भांग, लष्कर, हींग, होली असे हिंदी आणि कारकून, गादी, चाळ, चौथ, ठग, डिकेमाली, देशमुख, देसाई, पगडी, पटेल (पाटील), पाळेगार, मुंगूस असे मराठी शब्द असून त्याशिवाय अरेबिक, आसामी, उर्दू, कानडी, काश्मिरी, गुजराती, तमीळ, तेलुगू, नेपाळी, पंजाबी, पुश्तू, फारसी, मल्याळम इत्यादी अन्यप्रांतीय व अन्यदेशीय शब्दांचाही समावेश आहे. इंग्रजी भाषेच्या कोशाने अमृत, अवतार, आश्रम, ऋग्वेद, कल्प, गुरू, तंत्र, निर्वाण, पंडित, पुराण, प्रलय, ब्रह्म, ब्राह्मणी, महात्मा, वाणी, वेदान्त, वैश्य, शास्त्री, संसार, संहिता, सती, संधी, संध्या, साधू, सामन्, सूत्र, क्षत्रिय इत्यादी अनेक संस्कृत शब्दांचाही मुक्तपणे स्वीकार केला आहे, ही बाब सर्वप्रसिद्धच आहे.[१०] हे सर्व भारतीय शब्द इंग्रजी भाषेला परके होते, पण वापरामुळे त्यांचा परकेपणा हळूहळू लोप पावला व ते शब्द इंग्रजी भाषेत रूढ झाले; इतके की, किप्‌लिंग, ड्रायडन्, थॅकरे, बायरन्, मिल्टन्, मेकॉले, लॅंब, लॉंगफेलो, स्कॉट् इत्यादी 'शब्दसृष्टीच्या ईश्वरां'नी आपापल्या साहित्यात त्यांचा मोकळेपणाने व मार्मिकपणाने उपयोगही केला.[११] मराठी व इंग्रजी ह्या भाषांप्रमाणेच तेलुगू भाषेनेही सुमारे ३००० इंग्रजी शब्द स्वत:च्या भांडारात समाविष्ट करून घेतले आहेत, अशी माहिती सुब्बाराव पुरवितात.[१२] हा प्रकार जगातील सर्व भाषांच्या बाबतीत अपरिहार्यपणे घडून येत आहे. कारण रा. सो. सराफ ह्यांनी म्हटल्याप्रमाणे "द्विभाषिकता आणि बहुभाषिकता वाढीला लावावयास आजचे जग अनुकूल आहे. दळणवळणाची वेगवान साधने, जनमानसावर पगडा बसविणारे सामूहिक करमणुकीचे मार्ग... व ज्ञानाच्या रुंदावणाऱ्या कक्षा यांमुळे मनुष्य एकांतात राहू शकत नाही, त्याची भाषा इतर भाषांतील शब्द आत्मसात करते, त्याच्या बोलण्यात दोन किंवा अधिक भाषांचे मिश्रण होत राहते आणि मनुष्य बहुभाषिक होत राहतो."[१३] भाषा

बोलणारा बहुभाषी झाल्यामुळे तो जी भाषा बोलतो ती परभाषांतील नवनवीन शब्दांचा सहर्ष स्वीकार करते. एकंदरीने सावरकरांची एतद्‌विषयक विचारसरणी यथायोग्यच आहे.

आता ह्यानंतरच्या विचाराचा परामर्श घेऊ.

५. मराठी भाषेचा शब्दकोश समृद्ध आहे. तो आपण प्रयत्नपूर्वक सुखरूप ठेवला पाहिजे. सावरकरांची एतद्‌विषयक भूमिका महत्त्वाची असल्यामुळे ती त्यांच्याच शब्दांत प्रथमत: समजून घेऊ. ते म्हणतात : "सापाने बेडूक गिळावा नि त्याचे हाडन् हाड, स्नायून् स्नायू पिचून-पचवून टाकावा, त्याचप्रमाणे जेते राष्ट्र जितांचे राजकारण, त्यांचा धर्म, त्यांची संस्कृती, त्यांची भाषा या सर्वांना आत्मसात करू पाहते – इतके की, 'तेच म्हणजे आपण' असा भ्रम जितांना व्हावा.

"बेडूक गिळल्याबरोबर सापाला ठार केले तर तो बेडूक जशाच्या तसा सुरक्षितपणे बाहेर पडतो. त्याचप्रमाणे अद्याप आपल्याला मराठी भाषा सुखरूप ठेवता येईल अशी स्थिती आहे, हे आपले भाग्य समजा."[१४]

सावरकर सापाला म्हणजे जेत्यांना- इंग्रजांना- ठार करण्याची भाषा बोलतात. ती राजकीय असल्यामुळे तिचा प्रस्तुत विषयाशी- भाषाशुद्धीशी- संबंध नसल्यामुळे ती बाजूला ठेवून सावरकरांचा आशय लक्षात घेऊ. तो असा आहे की, इंग्रज राज्यकर्ते इरेला पेटले असून भारतीयांच्या भाषेसकट सर्वस्वाचा सर्वनाश करण्याचा त्यांचा इरादा आहे. त्यांना आपल्या भाषेचे म्हणजेच एक प्रकारे आपल्या समग्र संस्कृतीचे अस्तित्वच पार पुसून टाकावयाचे आहे. आपल्या अस्तित्वालाच असलेला हा जबरदस्त धोका आपण वेळीच सावधपणे ओळखला पाहिजे व तो टाळून आपले अस्तित्व टिकवून धरण्याचे सर्व संभाव्य उपाय अवलंबिले पाहिजेत. वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे जेत्यांचे आपल्या भाषेवरील म्हणजेच पर्यायाने आपल्या अस्मितेवरील हे संभाव्य आक्रमण आपण केवळ थोपवूनच नव्हे तर परतवून लावले पाहिजे. सावरकरांच्या दृष्टीने, अशी कृती करण्यास सुदैवाने अनुकूल स्थिती आहे.

स्वा. सावरकरांचा वरील इशारा खचित मननीय आहे. नव्या वस्तू आणि वास्तू, नव्या कल्पना आणि भावना, नवे विचार आणि विकार ह्यांच्या प्रकटीकरणासाठी नव्या शब्दांचा स्वीकार करणे वेगळे आणि जेत्यांच्या नव्या भाषेची स्वभाषेवरील कुरघोडी डोळे मिटून सहन करणे, नव्हे तिला हार्दिक अनुमोदन देणे, वेगळे. दुसरा प्रकार केवळ निंद्यच नव्हे तर राष्ट्रद्रोही होय. परक्यांची भाषा जिभेवर रुळू लागली की, तिची ओढ वाढत जाते. तिचा परिणाम हळूहळू मनावर होतो व मन परक्यांचे ते सगळे ग्राह्य व स्वत:चे ते सगळे त्याज्य व तुच्छ मानू लागते. इंग्रजांच्या राजवटीच्या सुरुवातीस स्वदेशबांधव कसे भांबावून गेले होते व त्यांच्यापैकी 'वाघिणीचे दूध' प्यालेले काही स्वकीय

सुशिक्षित लोक इंग्रजांची भाषा, त्यांचा धर्म, त्यांचे आचारविचार व त्यांची संस्कृती यांचेच गोडवे गाण्यात आयुष्याची इतिकर्तव्यता कशी मानीत होते, ते अर्वाचीन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासकांना चांगल्या प्रकारे ठाऊक आहे. स्वा. सावरकरांसारख्या संस्कृतिचिंतकांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे आजच्या समाजाची कशी दुर्दशा झाली आहे ते आजूबाजूला बारकाईने पाहिल्यावर त्वरित लक्षात येते. आजच्या तथोक्त पुरोगामी कुटुंबात आई-बाबांचे स्थान मम्मी व डॅडी यांनी घेतले आहे; मुला-मुलींना कॉन्व्हेण्टमध्ये घालण्यासाठी पालक जणू जीव टाकीत असतात; सिगारेट न ओढणारा तरुण मागासलेला ठरतो; मद्यपान न करणारे 'शामळू' समजले जातात; जी शाळकरी मुलगी बॉय-फ्रेंड्बरोबर फिरावयास जात नाही ती 'काकूबाई' ठरते; जी तरुणी गांधर्व-विवाह करीत नाही ती 'मॉड्' नाही असे मानले जाते; भारतीय संस्कृतीने शिकविलेल्या सत्य, अहिंसा, परोपकार इत्यादी तत्त्वांचे पालन व आचरण करणारा मनुष्य आधुनिक जगाच्या कसोट्यांनी अयशस्वी समजला जातो. थोडक्यात, पाश्चात्त्यांच्या 'हाय-फाय' संस्कृतीने आपल्या संस्कृतीवर इतका कबजा मिळविला आहे की, अल्पकाळानंतर आपली संस्कृती नामशेष तर होणार नाही ना, अशी भीती वाटू लागली आहे. कोणत्याही संस्कृतीची ओळख होते, तिच्या भाषेच्याच द्वारे. त्या संस्कृतीचा मनावर पगडा बसतो तो त्या भाषेतील साहित्य वाचूनच आणि व्यक्तिमत्त्व नि:सत्त्व होऊन जाते ते भाषा व साहित्य यांच्या दुहेरी आक्रमणामुळे. अशा प्रकारे 'स्व' गमावून बसलेले राष्ट्र झपाट्याने मृत्युपंथास लागते. ह्या अनर्थाकडे स्वा. सावरकरांना प्रस्तुत विचाराद्वारे अंगुलिनिर्देश करावयाचा आहे. म्हणूनच त्यांचा प्रस्तुत विचार मन:कोषात जतन करून ठेवण्याच्या लायकीचा आहे.

आता ह्यानंतरच्या विचाराचे निरीक्षण करू.

६. नित्याच्या भाषेत चार-साडेचारशे परकी शब्द आहेत. त्यांचे निर्धाराने उच्चाटन करा; त्या कामी संस्कृत भाषेची मदत घ्या, असा स्वा. सावरकरांचा आदेश आहे. ह्या बाबतीत ते धीर देऊन म्हणतात की, हे कार्य वाटते तितके अवघड नाही. कारण हुतात्मा, उपस्थित, स्तंभ, बोलपट असे शब्द पाहता-पाहता भाषेत रूढ झालेच. तसेच इतर शब्दही बदलता येतील, असा त्यांचा आशावाद आहे; ह्या बाबतीत मात्र मतभेदाला वाव आहे. कै. बेडेकर यांनी म्हटल्याप्रमाणे, "भाषेबद्दल प्रेम, आदर व पूज्यभाव ठेवून तिच्या शुद्धतेबद्दल व शुचितेबद्दल काळजी घेतली जाते. मनाच्या शुद्धतेबद्दल व देहाच्या स्वच्छतेबद्दल माणूस काळजी घेतो. त्याहूनही जास्त आस्था भाषेच्या शुद्धतेबद्दल आपण घेतो ही गोष्ट चांगलीच आहे...."[१५] परंतु भाषा ही काही विशिष्ट व्यक्तींची किंवा वर्गाची मालमत्ता नसते. ती सुशिक्षित, अल्पशिक्षित, गरीब, श्रीमंत, उच्चवर्णीय,

अन्यवर्णीय अशा समाजाच्या सर्व घटकांच्या परस्पर-व्यवहाराचे वा विनिमयाचे प्रभावी साधन असते. त्यामुळे भाषेमध्ये एकदा रूढ झालेल्या परकी शब्दांचे कृत्रिमपणे उच्चाटन करणे हे कार्य सोपे नसते व यशोदायीही नसते. मराठी भाषेत रुळलेल्या परकी शब्दांना अभियोग, दिनांक, चित्रपट, बोलपट, हुतात्मा, विश्वस्त, क्रमांक, महापौर, व्यंग्यचित्र, दिनदर्शिका, सहस्र, क्षण असे काही संस्कृत शब्द सुचवून ते रूढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला; परंतु एक तर त्यांपैकी सर्व शब्द रूढ होऊ शकले नाहीत. दुसरे म्हणजे अगदी सुशिक्षित व्यक्तीच्या तोंडीही त्या नवीन शब्दांच्या जोडीनेच खटला, तारीख, सिनेमा, नंबर, कार्टून, कॅलेंडर, हजार, मिनिट इत्यादी जुने शब्द कायम राहिले असून त्यांचा वापरही होत राहिला आहे. शिवाय वृत्तपत्रे व पुस्तके न वाचणारे अशिक्षित मराठी भाषक अभियोग, दिनांक, विश्वस्त, दिनदर्शिका, सहस्र, क्षण असल्या हेतुपूर्वक बनविलेल्या शब्दांच्या वाटेला मुळीच जात नाहीत, असेच आढळून येते. त्यांच्या बोलीत खटला, तारीख, सिनेमा, नंबर, कॅलेंडर्स, हजार, मिनिट इत्यादी मूळ परके शब्द व/वा त्यांचे अपभ्रंश (उदा. शिनेमा, लंबर, मिलिट इ.) ठाण मांडून बसलेले आहेत, असेच दृश्य दिसते आणि तसे ते दिसणे नैसर्गिक व अनिवार्य आहे. कारण, वरीलसारख्या कृत्रिम उपायांनी भाषेचे शुद्धीकरण केल्याने भाषेचे प्रवाहित्व थांबते; भाषा साकळते, जड होते व उत्तरोत्तर सामर्थ्यहीन किंवा क्षीण होऊ लागते. वाहती भाषाच वाढते. ह्याबाबतीत संबंधित भाषकांनी विवेकानेच वर्तन करावयास हवे असते. परक्या शब्दांचे उच्चाटन करताना संस्कृतचे साहाय्य घ्यावे असा जो उपाय स्वा. सावरकरांनी सुचविला आहे तो 'चिन्त्य' आहे. सुशिक्षित मराठी माणसाचा कल संस्कृतकडे अधिक असतो हे खरे. त्याला लाउडस्पीकरऐवजी दूरध्वनिक्षेपक प्रिय वाटतो; परंतु खीर हा शब्द प्रचारात असताना कोणी 'क्षीर' हा संस्कृत शब्द बुद्धिपुरस्सर वापरू लागला तर ते कितपत इष्ट ठरेल? हातमाग हा रूढ शब्द उखडून कोणी 'हस्तवेम' शब्द रूढ करू म्हटले तर त्याला कितीसा पाठिंबा मिळेल? गंधकाला शुल्वारी म्हटल्यास कोणाला अर्थबोध होईल? जर असे नवशब्द अडचणीतच टाकणारे असतील तर भाषेचे संस्कृतीकरण किंवा गीर्वाणीकरण करणे कितीसे श्रेयस्कर आहे हा प्रश्नच आहे. असे 'संस्कृतीकरण मुद्दाम करावे काय?' असा प्रश्न विचारून श्री. भणगे यांनी पुढीलप्रमाणे बुद्धिग्राह्य युक्तिवाद केला आहे : ह्या प्रश्नाकडे दोन दृष्टींनी पाहिले पाहिजे. एक तर मुद्दाम केलेल्या संस्कृतीकरणात सामाजिक भेद वाढविले जात नाहीत काय? हा प्रश्न विचारण्यामागील दृष्टी राजकीय नाही, भाषाशास्त्रीय आहे. भाषा सामाजिक अभिसरणासाठी आणि ऐक्यासाठी आहे अशी ही दृष्टी आहे. दुसरी दृष्टी अशी की, मराठी ही मराठी राहते काय? जेथे मराठीत अर्थपूर्ण आणि दर्जेदार शब्द नसेल तेथेच संस्कृताचा आश्रय घ्यावा, असे म्हणण्यात संस्कृताविषयी

दुजाभाव नसून, मराठीविषयी अधिक परिचयामुळे जास्त आपुलकी आहे. दर्जाचा विचार आपुलकीपेक्षा अधिक महत्त्वाचा आहे काय, ह्याचा विवेक केला पाहिजे. ह्या आपुलकीचा अर्थ खोल आहे. ह्या आपुलकीने समाज बनतो. शब्दांच्या मागे समाज पसरला आहे.[१६]

सावरकर एक अधिकारी लेखक होते, ते उत्तम संस्कृतज्ञ होते, त्यांना संस्कृत भाषेची प्रतिष्ठा मोठी वाटत असे. म्हणूनच कदाचित त्यांनी वरीलप्रमाणे उपाय सुचविला असावा; परंतु तो मराठी भाषेच्या अंगवळणी पडण्याजोगा नाही, एवढे मात्र खरे.

आता त्यांनी मांडलेल्या शेवटच्या विचाराचा कानोसा घेऊन प्रस्तुत लेखाचा समारोप करू.

७. शिवाजी महाराजांनी शासनव्यवहारातील प्रचलित फारसी शब्द बदलून त्यांच्या जागी संस्कृत शब्द रूढ करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अशा प्रकारे स्वभाषेची सेवा केली. तशीच स्वाभिमानी वृत्ती आपणही ठेवली पाहिजे, अशी स्वा. सावरकरांची अपेक्षा आहे. ती योग्य की अयोग्य हे निश्चित करण्यासाठी इतिहासकाळात काय घडले, ते अगोदर नीटपणे लक्षात घेतले पाहिजे. ज्ञानदेव-नामदेवांच्या काळात महाराष्ट्रात यादव राजांची कारकीर्द होती. तीत वाङ्मयीन, धार्मिक व शासकीय व्यवहाराची भाषा मराठी होती; परंतु "यादवांची राजवट संपुष्टात येऊन बहामनी राज्याची स्थापना झाली, तेव्हापासून शिवछत्रपतींच्या स्वराज्यस्थापनेपर्यंत जवळपास तीन शतके महाराष्ट्र मुसलमानी सत्तेखाली होता.... या काळात फार्शी ही राज्यकारभाराची भाषा झाली.... (मात्र) फार्शीचा परिणाम... बहुजनसमाजाच्या भाषेवर किंवा वाङ्मयीन भाषारूढीवर झाला नाही."[१७] या कालखंडातल्या मराठी भाषेची दोन रूपे दिसून येतात – शासकीय व वाङ्मयीन. पैकी शासकीय भाषा फारसी - प्रचुर होती आणि वाङ्मयीन भाषा संस्कृतप्रचुर होती. इ. स. १६२८ मध्ये पत्रव्यवहारातील फारसी व मराठी शब्दांचे प्रमाण शंभरात ८६:१४ असे होते.[१८] श्रीशिवाजीमहाराजांनी मराठी राज्याची स्थापना केल्यानंतर स्वभाषेचा पुरस्कार केला. त्यांनी तिला राजभाषेची प्रतिष्ठा दिली. त्यांनी प्रशासकीय क्षेत्रातून फारसीचे उच्चाटन करण्यासाठी 'राज्यव्यवहारकोश' तयार करविला. "या कोशात मुख्यत: फार्शीतील व काही मराठीतील अशा सुमारे दीड हजार शब्दांसाठी मराठीत वापरता येतील, असे सोपे संस्कृत पर्याय दिले आहेत."[१९] ह्याचा परिणाम असा झाला की, इ.स. १६७७ च्या सुमारास शासकीय व्यवहारातील भाषेत मराठी शब्दांचे प्रमाण शेकडा ६२.२ इतके वाढले.[२०] अशा प्रकारे शिवाजीमहाराजांनी शासकीय भाषेचे सुलभ 'गीर्वाणीकरण' केले. त्यांच्या ह्या कृतीत त्यांची प्राचीन संस्कृतिप्रीतीच दिसून येते. त्यांनी जशी स्वाभिमानी वृत्ती दाखवली तशीच आपणही अर्वाचीन

काळात दाखवावयास हवी अशी सावरकरांची अपेक्षा आहे. शिवाजीमहाराजांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन महाराष्ट्र-शासनाने 'शासनव्यवहारात मराठी' प्रचलित करण्याचा जाणीवपूर्वक स्तुत्य प्रयत्न केला आहे. त्यानुसार अधिनियम, प्रशासन, प्रशासक, आकाशवाणी, राजदूत, विधेयक, केंद्रीय सचिवालय, आयोग, न्यायालय, विकेंद्रीकरण, राजभवन, राज्यपाल, अनुदान, आयकर, वेतनवाढ, चर्मोद्योग, विधानपरिषद, अधिसूचना, संसद, प्रस्ताव, मानक, इत्यादी परिभाषा रूढ झाली आहे.[२१] मराठी वृत्तपत्रे, आकाशवाणीची केंद्रे व ग्रंथकार ह्या परिभाषेचा सर्रास वापर करीत आहेत. शिवाय मराठीतील काही नियतकालिकांनी पुढीलसारखे काही संस्कृतनिष्ठ शब्द बनवून प्रचलित करण्याचा प्रयोग सुरू ठेवला आहे. अणुस्थिती, अंत:केंद्रित, अंतराळ-स्थानक, अधिकोष, अधोमंडल, अंतरालयान, अपकृत्य, अभिप्रमाणित, आचारभ्रष्ट, आचारसंहिता, आंतरराष्ट्रीय मौद्रिक, अधिस्वनिक, इष्टोष्णतादायक, उपन्यास, ऊर्ध्वस्थ प्रणालिका, चलन-विप्रेषण, भिन्नत्वकारक परिगती, स्फुलिंगविद्युन्मोच[२२] इत्यादी. ह्यांपैकी काही शब्द उच्चारदृष्ट्या अवघड असल्यामुळे, तर काही इतर भाषांत अन्य अर्थाने रूढ असल्यामुळे तर आणखी काही अर्थदृष्ट्या दुर्बोध असल्यामुळे वाचकांकडून स्वीकारले जाणार नाहीत. असे शब्द स्वाभाविकपणे मागे पडतील. त्यांच्या जागी विचारपूर्वक नवीन शब्द बनवून रूढ करावे लागतील; परंतु नवशब्दनिर्मितीच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला आहे, हे सुलक्षण आहे. अशाही स्थितीत काही वृत्तपत्रे कोर्ट, सोसायटी, पोलीस स्टेशन, कॉलेज, कमिशन, नोटीस, फंड, हॉस्पिटल, ॲवॉर्ड, कॉलरा, कलेक्टर, फोन, क्लार्क, ऑफिस, केस, हायकोर्ट, डायरेक्टर, पोस्टखाते इत्यादी इंग्रजी शब्द पूर्ववत मधूनमधून वापरताना आढळून येतात.[२३] परंतु ही परिस्थिती हळूहळू पण लवकरच पूर्णपणे पालटेल अशी आशा बाळगण्यासारखी सद्य:स्थिती निश्चित आहे. तरीदेखील भाषिक स्वाभिमानाच्या बाबतीत कोणतीही टोकाची किंवा अतिरेकी भूमिका वर्ज्य समजावयास हवी. आज विद्यमान असलेल्या भाषांपैकी कोणतीही भाषा सर्वथा अमिश्रित नाही, ही वस्तुस्थिती लक्षात ठेवावयास हवी. तसेच, सध्याच्या काळात जगातील भिन्न भाषक अनेक कारणांमुळे एकमेकांच्या जवळ वारंवार येत आहेत, त्यामुळे वेगवेगळ्या भाषांची देवाणघेवाण नि:संकोचपणे होत आहे आणि तशी ती भविष्यकाळातही होत राहणार आहे. ही स्थिती अटळ आहे, हे ध्यानात घेऊन भाषाशुद्धीच्या प्रश्नाकडे समतोलपणे पाहावयास हवे. प्रस्तुत प्रश्नाच्या संदर्भात The Society for Pure English ने जी विचारसरणी शिरोधार्य मानली ती वास्तववादी वाटते. म्हणून तीच येथे उद्धृत करून हा लेख संपवू-

"English should be at liberty to help itself freely to every foreign word which seems to fill a want in our own language. It

ought to take those words on probation, so to speak, keeping those which prove themselves useful and casting out those which are idle or rebellious. And then those which are retained ought to become completely English, in pronunciation, in accent, in spelling and in the formation of their plurals."[२४]

मराठी भाषेच्या बाबतीत अशीच भूमिका पत्करणे श्रेयस्कर ठरेल.

□□

## संदर्भटीपा


१. समग्र सावरकर वाङ्मय, खंड ४ था, वाङ्मय विभाग, प्रथमावृत्ती, पुणे, समग्र सावरकर वाङ्मय प्रकाशन समिती महाराष्ट्र प्रांतिक हिंदुसभा, १९६५, पृ. ४३४-४३५.
२. रा. सो. सराफ, भाषा मातृभाषा आणि परभाषा, प्रथमावृत्ती, पुणे, श्रीविद्या प्रकाशन, १९७२, पृ. १८-२०.
३. तत्रैव, पृ. ४६.
४. ना. गो. कालेलकर, भाषा : इतिहास आणि भूगोल, प्रथमावृत्ती, मुंबई, मौज प्रकाशन, १९६४, पृ. १८.
५. तत्रैव, पृ. १३.
६. संदर्भटीप क्र. २, पृ. १७.
७. पाहा- मु. श्री. कानडे, 'मराठीचा शब्दसंग्रह', मराठीचा भाषिक अभ्यास, प्रथमावृत्ती, पुणे, श्रीविद्या प्रकाशन, १९७९, पृ. ६०-६८.
८. G. Subba Rao, Indian Words in English, reprinted, London, Oxford University Press, 1961, p. 1.
९. तत्रैव, पृ. २.
१०. तत्रैव, पृ. १०७-१३४.
११. तत्रैव, पृ. ६७-९६.
१२. तत्रैव, पृ. २.
१३. संदर्भटीप क्र. २, पृ. ८०.
१४. संदर्भटीप क्र. १, पृ. ४३४.
१५. दि. के. बेडेकर, 'भाषेतील निषिद्धता', भाषा : अंत:सूत्र आणि व्यवहार (-संपा.) मु. ग. पानसे, आवृत्ती पहिली, पुणे, महाराष्ट्र साहित्य परिषद, १९६९, पृ. ७७.
१६. भा. शं. भणगे, 'विविध शास्त्रे आणि मराठी भाषा', संदर्भटीप क्र. १५, पृ. ३७.
१७. शासनव्यवहारात मराठी : समस्या, स्वरूप व प्रक्रिया, भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, पृ. ८-९.
१८. तत्रैव, पृ. ९-१०.
१९. तत्रैव, पृ. ५९.
२०. तत्रैव, पृ. १०.
२१. तत्रैव, परिशिष्ट १, पृ. १५६-१५८.
२२. तत्रैव, परिशिष्ट २, पृ. १५९-१६१.
२३. तत्रैव, परिशिष्ट ३, पृ. १६२-१६४.
२४. संदर्भटीप क्र. ८, पृ. ४४.


❑❑❑

# २.

# संभाषणाची भाषा : स्वरूप व वैशिष्ट्ये *

## १. 'संभाषणा'ची व्याख्या

ज्या संकल्पनेला इंग्रजीत Conversation म्हणतात, तिला आपण मराठीत संभाषण म्हणतो. Conversation हा शब्द Converse ह्या क्रियावाचक शब्दापासून साधलेला आहे. त्याचा अर्थ 'To convey the thoughts reciprocally in talk'[1], एकमेकांनी आलटून-पालटून बोलून आपापले विचार एकमेकांना कळवणे, असा आहे. त्या क्रियापदाद्वारे साधलेल्या Conversation ह्या नामाची व्याख्या केंब्रिज कोशात पुढीलप्रमाणे दिली आहे : 'talk between two or more people in which thoughts, feelings and ideas are expressed, questions are asked and answered and news and information are exchanged.'[2] अर्थात, संभाषण ही एक भाषिक घटना आहे. हिचे स्वरूपवर्णन असे करता येईल : संभाषणात दोन किंवा अधिक व्यक्ती प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे एकमेकींच्या समोर येऊन कधी आपले विचार, आपल्या भावना व कल्पना व्यक्त करतात, तर कधी एकमेकींना प्रश्न विचारतात किंवा विचारल्या गेलेल्या प्रश्नांची उत्तरे देतात, तर कधी बातमी आणि माहिती यांची आपापसांत देवाणघेवाण करतात. ही देवाणघेवाण सामान्यपणे तोंडावाटे उच्चारल्या गेलेल्या भाषेच्या द्वारे होते. आता ह्या व्याख्येचे शब्दश: विशदीकरण करू.

---

* पूर्वप्रसिद्धी- 'युगवाणी' (नागपूर), जानेवारी-फेब्रुवारी १९८५, पृ. ३०-३७

## २. व्याख्येचे विशदीकरण

२.१ प्रथमत: सामान्यपणे ह्या शब्दाचे प्रयोजन लक्षात घेऊ. मनोगतांची किंवा अनुभवांची देवाणघेवाण (Communication[3]) शरीराच्या काही अवयवांच्या विशिष्ट हालचालींच्या द्वारेही होऊ शकते. उदाहरणार्थ, हाताच्या पंज्याची विशिष्ट सांकेतिक हालचाल करून आपण 'या', 'येथे ठेव/ठेवा', 'बसा', 'कोठे निघालास/निघालात?' इत्यादी मनोगते व्यक्त करतो; 'भुवया उंचावून' आश्चर्य, अनपेक्षित घटनेबद्दलची प्रतिक्रिया इत्यादी स्वरूपाचे आशय व्यक्त करतो; जीभ बाहेर काढून स्तिमितता प्रगट करतो; जीभ दोन कवळ्यांच्या मध्ये दाबून धरून अवांछित कल्पनेचा उच्चार झाल्याचे दर्शवितो; हस्तांदोलन करून एखाद्याचे मन:पूर्वक स्वागत करतो किंवा त्याचे कौतुक करतो; दोन्ही हात जोडून एखाद्याबद्दलचा पूज्यभाव प्रदर्शित करतो; एखाद्याचे चुंबन घेऊन त्याच्याबद्दलचे प्रेम किंवा वात्सल्य दर्शवितो, तसेच एखाद्याला मिठी मारून पराकाष्ठेचा हर्ष किंवा सद्भाव व्यक्त करतो.[4] परंतु मनोगतांची खरीखुरी देवाणघेवाण तोंडावाटे उच्चारलेल्या शब्दांनीच होत असते. तीच विशदतर, सापेक्षतया दीर्घजीवी, प्रेरक व व्यापक असते.[5] बोलणाऱ्या व्यक्ती एकमेकींसमोर असल्यामुळे ही देवाणघेवाण स्पष्ट असते, त्या दोन्ही (वा अनेक) व्यक्ती एकमेकींसमोर असेपर्यंत टिकते, एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना बोलण्यास प्रेरित किंवा उद्युक्त करते आणि डर्बीशायरने[6] प्रतिपादिल्याप्रमाणे हिच्यात गप्पा, बोलणे, चर्चा, मुलाखत, वाद इत्यादी विविध स्वरूपांचा समावेश होतो. ह्यावरून लक्षात येईल की, जरी शरीराच्या विशिष्ट हालचालींनी मनोगतांची देवाणघेवाण शक्य होत असली तरी ती मर्यादित स्वरूपाची असते. खऱ्या देवाणघेवाणीला तोंडावाटे उच्चारल्या गेलेल्या शब्दांची अपेक्षा असते. म्हणून वरील व्याख्येत सामान्यपणे हा शब्द वापरला आहे.

ह्याचा आणखीही एक बारीक पैलू लक्षात घ्यावयास हवा. तसे पाहता मनुष्य हा नेहमीच स्वत:शी बोलत असतो. प्रत्येक व्यक्तीच्या मनात प्रतिक्षणी कोणत्या ना कोणत्या स्वरूपाचा विचार येतच असतो आणि तो नेहमीच शब्दांच्या द्वारे साकार होत असतो. असे असले तरी व्यक्तीच्या मनातील तो विचार अप्रकट किंवा अव्यक्त स्वरूपात असतो, त्यामुळे त्याची देवघेव संभवत नाही. तो प्रगट झाला (म्हणजे तो प्रगट केला गेला) की मगच त्याची देवघेव संभवते. अर्थात मनोगताच्या साक्षात उच्चाराची (=प्रकटीकरणाची) आवश्यकता असते. म्हणून वर सामान्यपणे शब्दाचा वापर केला आहे. आता 'दोन किंवा अधिक व्यक्ती' ह्या शब्दसमूहाचा विचार करू.

२.२ संभाषणात बोलणारा व ऐकणारा असे दोघेजण भाग घेत असतात. ते आलटून-पालटून परस्परांची कार्ये (functions) करतात. उदाहरणार्थ, अ बोलत असताना ब ऐकत असतो आणि ब बोलत असताना अ ऐकत असतो. ह्या प्रक्रियेचाही थोडा अधिक विचार करू. आपले मनोगत दुसऱ्याला (किंवा दुसऱ्यांना) कळविणे हे संभाषणाचे उद्दिष्ट असते. ते गाठण्यासाठी मनोगत मुखरित होणे अनिवार्य असते. तसे ते झाले तर ऐकणाऱ्याला बोलणाऱ्याचे मनोगत समजू शकते. कारण अनुच्चारित शब्द ऐकणाऱ्याच्या दृष्टीने अर्थरहित असतो, त्याचे आकलन व मनातल्या मनात निरूपण अशक्य असते. ह्याबाबतीत डर्बीशायरने म्हटले आहे : "In one sense, the spoken word has no meaning unless it is heard and understood... Certainly, without interpretation there is no communication, and one could argue that an attempted act of communication which does not succeed in communicating is meaningless"[7] मनोगताच्या अर्थनिरूपणासाठी व यशस्वी देवाण-घेवाणीसाठी किमान एका श्रोत्याची आवश्यकता असते. पण ह्याचा अर्थ असा नाही की, संभाषण हे नेहमी दोनच व्यक्तींत होत असते. संभाषणात अनेकदा अधिक व्यक्तीही सामील झालेल्या असतात. उदाहरणार्थ, मित्रांच्या गप्पा, आप्तांची बोलणी, जिज्ञासूंची चर्चा इत्यादी भाषिक घटनांत अनेक व्यक्तींचा सहभाग असतो, हे अनुभवसिद्ध सत्य आहे. आता ह्या दोन किंवा अधिक व्यक्तींमधील संभाषण का व कसे शक्य व सफल होते, त्याचा विचार करू.

२.३ बोलणाऱ्याने उच्चारलेले शब्द ऐकणारा ऐकतो व त्यांच्या मदतीने बोलणाऱ्याचे मनोगत समजून घेतो. आता वस्तुत: ऐकणाऱ्याला बोलणाऱ्याच्या मनातील हालचाली दिसू शकत नाहीत, समजू शकत नाहीत किंवा त्यांचा अनुभवही येऊ शकत नाही. तो अनुभव फक्त बोलणाऱ्याला स्वत:लाच येत असतो. तरीदेखील ऐकणारा बोलणाऱ्याचा अभिप्राय समजून घेऊ शकतो ह्याचे कारण असे की, दोघांची भाषा एक असते, ती दोघांनाही कळत असते व दोघांच्याही वापरातील असते. विशिष्ट संदर्भात विशिष्ट मनोगत व्यक्त करण्यासाठी बोलणाऱ्याने जे शब्द वापरलेले असतात, जवळजवळ तेच शब्द (शब्दावलीत व्यक्तिनिष्ठ असा थोडा फरक जरूर पडू शकतो) त्याच संदर्भात तेच मनोगत व्यक्त करण्यासाठी ऐकणाऱ्यानेही कधीतरी वापरलेले असतात. म्हणजेच बोलणारा व ऐकणारा ह्या दोघांचे भाषाविषयक व मनोगतविषयक असे उभयविध पूर्वानुभव प्राय: सारखे असतात. ह्या मुद्द्याचे समर्पक शब्दांत विवेचन करताना टर्नरने म्हटले आहे : "Communication

presupposes earlier experience shared by speaker and hearer. One such experience which must be shared is, obviously, experience of the language used. You and I communicate only because we both have experience of the English language. But along with this there is another kind of shared experience, an experience, of the same or similar past situations which provides the 'content' of language."[८] ह्या विवेचनावरून दोन वा अधिक व्यक्तींत संभाषण का व कसे शक्य होते त्याचा उलगडा होईल. मात्र व्यक्ती दोन असोत किंवा अधिक असोत, त्यांनी संभाषण-प्रसंगी वापरावयाच्या भाषेचे नियमनिर्बंध पाळणे आवश्यक असते.[९]

२.४ आता व्याख्येतील 'प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे...' इत्यादी शब्दसंहतीचा विचार करू. दोन किंवा अधिक व्यक्ती जेव्हा एकमेकींसमोर येऊन बोलतात, तेव्हा प्रत्यक्ष संभाषण होत असते. पण त्या व्यक्ती एकमेकींपासून दूर असताना जेव्हा टेलिफोनवरून एकमेकींशी बोलतात, तेव्हा त्यांचे अप्रत्यक्ष संभाषण होत असते. अशा वेळी संभाषक एकमेकांना प्रत्यक्षपणे पाहत नसतात; त्यांचे फक्त आवाज परस्परांना ऐकू येत असतात. तरीदेखील ते संभाषक फोनच्या माध्यमाच्या द्वारे जणू एकमेकांसमोर आलेले असतात. आता संभाषकांना संभाषण करावे असे का वाटते ह्या प्रश्नाचे उत्तर देऊ.

२.५ आपण घरात वावरत असताना एकमेकांशी अनेक गोष्टींसंबंधी बोलत असतो. आपल्याला आपल्या भावना, कल्पना, वैचारिक प्रतिक्रिया, श्रद्धा, मते इत्यादी गोष्टी घरातील इतर व्यक्तींना 'कळविण्या'ची इच्छा असते. ती आपल्याला संभाषणाला प्रवृत्त करते. चार मित्र एकत्र जमले की, नाना विषयांवरील गप्पांना रंग भरतो. अभ्यासू वा जिज्ञासू लोक एकत्र आले की, ते एखाद्या विषयाचा शोध घेण्यासाठी त्या विषयावर चर्चा करू लागतात. रस्त्यात कोणी हटकतो, काही माहिती विचारतो, अशा प्रसंगी त्याच्या प्रश्नाला उत्तर देण्याच्या निमित्ताने संभाषण घडते. बसमध्ये, गाडीमध्ये किंवा विमानात आपण केवळ वेळ घालविण्यासाठी सहउतारूंशी बोलतो. अशा प्रकारे संभाषणाची निमित्ते किंवा प्रेरके अनेक असून संभाषणाच्या ओघात सर्व इंद्रियांना येणाऱ्या अनुभूतींचे उल्लेख येऊ शकतात. संभाषणाला जगाच्या पाठीवरचा कोणताही विषय वर्ज्य नसतो.

येथवर संभाषणाच्या व्याख्येतील विविध घटकांचे अर्थ व त्यांची प्रयोजने समजून घेतली. आता संभाषणाच्या भाषेची कोणती वैशिष्ट्ये

असतात ते जाणून घेऊ. डेव्हिड क्रिस्टल आणि डेरेक डेव्ही ह्या दोघा ग्रंथकारांनी Investigating English Style नावाचे एक पुस्तक संयुक्तपणे लिहिले आहे; त्यात प्रस्तुत मुद्याची तपशीलवार चर्चा[10] मार्मिकपणे केली आहे. तिच्यात वरील लेखकांनी संभाषणाच्या भाषेच्या अनेक वैशिष्ट्यांचा परामर्श घेतला आहे. तीच वैशिष्ट्ये आता क्रमश: समजून घेऊ. तसे करताना प्रत्यक्षात घडलेली संभाषणे त्या-त्या वैशिष्ट्यांच्या चर्चेत उद्धृत केली आहेत. मात्र प्रत्यक्षातील संभाषकांची नावे बदलली आहेत.

## ३. संभाषणाची भाषा ही सर्वत्र वापरली जाणारी भाषा असते

संभाषणात कोणत्याही वयाच्या, लिंगाच्या, जातीच्या, धर्माच्या व व्यवसायाच्या व्यक्ती भाग घेऊ शकतात. ह्या व्यक्तींचाच समाज बनलेला असतो. त्यामुळे ह्या समाजघटकांची भाषा ही सर्वांची भाषा असते. तिचा वापर सर्व प्रकारच्या घटनांसंबंधी, प्रसंगांसंबंधी, व्यक्तींसंबंधी वा अनुभवांसंबंधी बोलताना केला जात असतो. ह्या अर्थी ती सर्रास सर्वत्र वापरली जाणारी भाषा असते. उदाहरणार्थ, खालील दोन संभाषणे अवलोकावीत :

३.१ 'काल झाली तेवढी शोभा पुरे नाही झाली?'
'अरे, तो भावड्या तिथं टपकेल अशी कल्पना होती?'
'बाबारे, आयुष्यात बरंच काही अकल्पित घडतं!'
'अहो, दर्शनपंडित, आम्हां पामरांना समजेल अशा भाषेत बोला जरा!'
'आता, देऊ का एक ठेवून?'

३.२ 'हं, मग लाडू कधी देणार?'
'पुढच्या जन्मी.'
'असे वैतागता का हो?'
'वैतागू नको तर काय करू? सगळं मुसळ केरात!'
'असं झालं तरी काय?'
'कर्म नि कहाणी.'

वरील दोन्ही उदाहरणांतील अनुभव वेगवेगळे असले तरी ३.१ मधील संभाषकांना ३.२ मधील भाषा समजू शकते आणि ३.२ मधील संभाषक ३.१ मधील भाषा वापरू शकतात. थोडक्यात, ही भाषा प्राय: सर्वांच्या सारख्याच परिचयाची असते.

## ४. संभाषणाची भाषा स्वाभाविक असते

संभाषकांच्या बोलण्यात सहजता असते. त्यांची मन:स्थिती, मानवी वर्तन, व्यक्तीच्या प्रतिष्ठेबद्दलचे समाजमान्य संकेत, विशिष्ट शारीरिक अवस्था, शैक्षणिक संस्कार, पेशा इत्यादींना अनुरूप अशीच शब्दकळा व वाक्यरचना संभाषकांच्या

मुखांतून बाहेर पडत असते. तिच्यात स्वाभाविकता किंवा अकृत्रिमता असते. उदाहरणार्थ,

४.१ 'कोण पाहिजे आपल्याला?'
'५४३ नारायण, हाच ना?'
'म्हणजे नानांकडे आला तर तुम्ही?'
'तुम्ही कसं ओळखलंत?'
'त्याचं असं आहे, आज सकाळपासून हा प्रश्न विचारणारे तुम्ही दहावे गृहस्थ आहांत!'

४.२ 'तुला पुस्तक हवंय वाचायला?' रेखानं विचारलं.
'नको,' सुधीर उत्तरला.
'मी वाचू जरा वेळ?' रेखानं पुन्हा विचारलं.
'बेशक वाचा,' सुधीर म्हणाला.
'हे अहो-जाहो का?' रेखाचा प्रश्न.
'तू परवानगी विचारलीस...' सुधीर बोलू लागला.
'म्हणून का?' रेखानं विचारलं.

## ५. संभाषणात अनेकदा अत्युक्ती असते

संभाषणात शब्दांच्या निवडीत व आशयाच्या अभिव्यक्तीत काटेकोरपणा व संयम यांचा अनेकदा अभाव असतो. त्यामुळे संभाषणात अत्युक्तिपूर्ण विधाने सुकाळाची असतात. क्वचित एखाद्याला हरभऱ्याच्या झाडावर चढविण्यासाठीही अशी अत्युक्ती जाणूनबुजून केलेली असते. उदाहरणार्थ,

५.१ 'कुठं निघालाहेस?' प्रवीण.
'का?' राजू.
'तुझ्याशी थोडं बोलायचंय्' प्रवीण.
'आत्ता बोलतोच आहेस की.' राजू.
'तुला विनोद सुचतोय. इकडे माझा प्राण चाललाय्.' प्रवीण.

५.२ 'एकदा कधी तुझी भेट होतेय् असं झालं होतं.'
'का रे बाबा?'
'अरे गेल्या आठवड्यात कोकणात जाऊन आलो.'
'मग?'
'ऐन पावसाळ्यात तिथं जे निसर्गसौंदर्य पाहिलं ना तसं जन्मात पाहिलं नव्हतं.'

## ६. संभाषणातील वाक्ये अनेकदा अपूर्ण असतात

संभाषणाचा विषय संभाषणात भाग घेणाऱ्या व्यक्तींना ठाऊक असतो,

विषयाची प्रगती कोठवर झाली आहे, हेही त्यांना अवगत असते आणि विषयाच्या कोणत्या अंशासंबंधी चालू घटकेस बोलणे चालले आहे, ह्याचेही त्यांना भान असते. (कारण संभाषण प्रत्यक्षात चालू असते.) शिवाय संभाषण हे प्रकृतित: पसरट व मोकळेझाकळे असते. त्यामुळे संभाषक वाक्यांच्या अपूर्ण भागांचा अर्थ मनातल्या मनात समजून घेऊन संभाषण चालू ठेवू शकतात. परिणामी, संभाषणात अनेक वाक्ये अपूर्ण असतात. तरीही त्यांच्या अर्थांचे पूर्ण आकलन संभाषकांना होऊ शकते. उदाहरणार्थ,

६.१ प्रवासी – एक डेक्कन कॉर्नर. किती?
बसवाहक – साडेतीन.
प्रवासी – घ्या.
बसवाहक – सुट्टे द्या.
प्रवासी – नाही आहेत.

६.२ अप्पा – अरे, मी जरा नारायण पेठेत जाऊन येतो.
जनू – बरं.
अप्पा – तोवर ही पुस्तकं नीट लावून ठेव.
जनू – होय, साहेब.
अप्पा – कोणाचा फोन आला तर...
जनू – निरोप लिहून ठेवीन आणि त्यांचा नंबरही.

## ७. संभाषक एकमेकांची वाक्ये पूर्ण करतात

संभाषणाच्या ओघात संभाषकांची मानसिक एकरूपता झालेली असते. एकमेकांना ऋजुतेने समजून घेण्याची त्यांची वृत्ती असते. त्यामुळे एखाद्या संभाषकाला सामान्यपणे वाक्याच्या अखेरीचा शब्द सुचला नाही तर किंवा संभाषण रेंगाळू नये (म्हणजेच ते झपाट्याने पुढे सरकावे) म्हणून किंवा एखाद्या मुद्याविषयी संभाषकांत पूर्ण मतैक्य असेल तर किंवा संभाषक-वक्त्याला मुद्यावर ठासून दुजोरा द्यावयाचा असेल तर, संभाषकांपैकी एक (म्हणजे श्रोता) दुसऱ्याचे (म्हणजे वक्त्याचे) वाक्य पूर्ण करतो किंवा त्याचे म्हणणे उचलून धरतो किंवा त्याच्या म्हणण्यास रुकार देतो. उदाहरणार्थ,

७.१ श्रीधर – आज माझे वडील असायला हवे होते.
माधव – असते तर काय...
श्रीधर – काय झालं असतं तेच सांगतो. ऐक.
माधव – ऐकतोय्.
श्रीधर – त्यांनी चक्क एक कोरा धनादेश माझ्या हाती देऊन...
माधव – तुझं अभिनंदन केलं असतं, असंच ना?

७.२ मालक – बरं गोखले, पगाराची काय अपेक्षा आहे?

गोखले – चार हजार.
मालक – तुम्हांला वेडबीड तर लागलं नाही ना!
गोखले – आता आपण विचारलंत, म्हणून...
मालक – सांगितलंत, असंच ना?

## ८. प्रतिसादादाखल एखाद-दुसराच शब्द उच्चारला जातो

संभाषणाची गती विषम असते. कधीकधी संभाषक ओळीने दोन-चार वाक्ये उच्चारतात, तर कधीकधी एखाद-दुसऱ्या शब्दाचाच उच्चार करून संभाषण थांबवतात. हा प्रकार मानवी स्वभावाला धरून असल्यामुळे स्वाभाविक असतो. उदाहरणार्थ,

८.१ प्रभाकर – रात्री किती वाजता झोपलीस काल?
नीता – दोनला.
प्रभाकर – एवढा वेळ टीव्ही बघत होतीस?
नीता – अरे, एक इंग्रजी पिक्चर लागलं होतं.
प्रभाकर – चांगलं होतं?
नीता – अप्रतिम!

८.२ वयस्कर गृहस्थ – काय, सुट्टी सुरू झाली का?
शालेय विद्यार्थी – हो, कालपासनं.
व. गृ. – मग आता सुट्टीचा काय कार्यक्रम?
शा. वि. – शिबिराला जाणार.
व. गृ. – कसले शिबिर?
शा. वि. – ग्रामीण भागात साक्षरता-प्रसाराचं.

## ९. बोलणाऱ्याच्या बोलण्याचा आरंभाचा किंवा अखेरचा शब्द ऐकणाऱ्याकडून पुन्हा उच्चारला जातो

स्त्री-पुरुषांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकल्यास असे लक्षात येते की, संभाषकांपैकी ऐकणारा बोलणाऱ्याच्या वाक्यातील सुरुवातीचा किंवा शेवटचा शब्द संमती दर्शविणे, विनय प्रकट करणे, ठाऊक किंवा पूर्वी ऐकलेले असल्याचे सुचविणे, वस्तुस्थितीचे वर्णन करणे, एखाद्या घटनेबद्दलची बरीवाईट प्रतिक्रिया व्यक्त करणे, विनंतीस मान देणे, कुतूहल प्रदर्शित करणे, विशिष्ट मन:स्थिती प्रगट करणे इत्यादी विविध निमित्तांनी पुन्हा उच्चारतो. उदाहरणार्थ,

९.१ सुनीता – मग?
मधुरा – मग ती फणफणत म्हणाली, 'ही नोकरी मी करणार नाही.'
सुनीता – करणार नाही? पण का?

मधुरा – का ते सांगितलं तर तुला धक्काच बसेल.
सुनीता – धक्का अगोदरच बसलाय्. सांग.
मधुरा – सांगते, ऐक.

९.२ बाबूराव – अरे, मंडईत गेलास तर माझ्यासाठी तेवढं औषध आणशील का?
केशव – आणशील का, असे गयावया करून का विचारताहात? अधिकारानं सांगा 'आण'.
बाबूराव – 'आण' सांगण्याचा मला काय अधिकार आहे?
केशव – का नाही?
बाबूराव – 'का नाही'चं उत्तर तुला ठाऊक आहे.

## १०. संभाषणात साद-प्रतिसादांच्या स्वरूपात प्रश्नोत्तरे असतात

संभाषण जेव्हा अनेक व्यक्तींमध्ये चालू असते, तेव्हा ज्ञान मिळविणे, माहिती काढून घेणे, एखाद्या घटनेचा तपशील जाणून घेणे, एखाद्याच्या कृति-उक्तींमागील हेतू समजून घेणे, केवळ औत्सुक्य शमविणे, विसंगतींच्या परिहाराचा उपाय शोधून काढणे, एखाद्या व्यक्तीला नीटपणे जाणून घेणे अशा अनेक कारणांनी प्रेरित होऊन संभाषक परस्परांना प्रश्न विचारून त्यांची उत्तरे मिळवितात. अशा प्रकारे प्रश्नोत्तर-स्वरूपात संभाषण चालू राहते व पुढेपुढे सरकते. उदाहरणार्थ,

१०.१ 'मी बंडूकडे गेलो होतो. तू सांगितलंस त्याप्रमाणं पैशांची मागणी केली.'
'मग, त्यानं दिले?'
'सध्या सवड नाही, म्हणाला.'
'कधी देऊ शकेल ते सांगितलन् का?'

१०.२ तीन मित्र चौथ्या मित्राला : मुलाखत कशी झाली?
चौथा मित्र : चांगली झाली.
तीन मित्र : किती प्रश्न विचारले?
चौथा मित्र : बरेच.
मुलाखत अर्धा तास चालली होती.
तीन मित्र : मग तुझी निवड झालीच म्हणून समज. कधी कळवणार?
चौथा मित्र : कदाचित पुढच्या आठवड्यात.

## ११. संभाषणात अनेकदा प्रश्नांना प्रतिप्रश्नात्मक उत्तरे असतात

संभाषणाच्या ओघात काही संभाषकांच्या मनात कुतूहल, विकल्प, विचार,

/

आत्मपरीक्षण, रोष, तर्कवितर्क, प्रतिक्रिया, अनिश्चय, आश्चर्य, औत्सुक्य इत्यादी नानाविध भावभावना उत्पन्न होतात. अशा प्रसंगी एका संभाषकाच्या प्रश्नाला दुसरा संभाषक प्रतिप्रश्नाद्वारे उत्तर देतो. उदाहरणार्थ,

११.१ विद्यार्थी : ए, तू येच. त्या निमित्तानं मला यायला मिळेल.
विद्यार्थिनी : माझ्यासाठी?
विद्यार्थी : नाहीतर कोणासाठी?
विद्यार्थिनी : आपण तासाला दांडी मारून पिक्चरला जाऊ या?
विद्यार्थी : ह्या वर्षीही परीक्षेत गचकायचं आहे का?

११.२ 'ए, दादा आणखी काय म्हणाले?'
'ऐकणार आहेस?'
'म्हणून तर विचारतेय् ना?'
'ऐकण्याची हिंमत आहे?'

## १२. संभाषणाच्या भाषेत अनेकदा ग्राम्यता असते

स्वत:च्या घरातील माणसे, इतर आप्त, मित्र, परिचित, सहकारी, सहाध्यायी इत्यादी संभाषक एकमेकांच्या परिचयाचे असतात. त्यामुळे त्यांना परस्परांच्या जीवनांतील सुखदु:खांच्या घटना, प्रसंग, अनुभव, स्वभावविशेष, आवडीनिवडी, गरजा, अपेक्षा, सामर्थ्ये, दौर्बल्ये इत्यादी बऱ्याच गोष्टी ठाऊक असतात. त्यांच्या पार्श्वभूमीवर संभाषण चालू असताना त्यात कधीकधी ग्राम्य उल्लेख येतात. काही संभाषकांची नैसर्गिक भाषाच शिवराळ असते, त्यांच्या तोंडून अपशब्द मोठ्या प्रमाणावर उच्चारले जातात. काही संभाषकांना त्यांच्या पेशामुळे अपशब्दांचा वापर करणे अनिवार्य बनलेले असते. आता संभाषणगत ग्राम्यतेची उदाहरणे अवलोकू.

१२.१ सदू – च्यायलाऽ, ह्या पाटलाला उद्योग नाही की काय?
येसू – ए सद्या, साल्या गप बैस.
सदू – बघ ना च्यायला... तो श्याम्या तिकडं सत्तेसाठी धडपडतोय् अन् हा इकडं चावडीवर बोंबलतोय्.

१२.२ 'बंड्या यार, मला बॉसने नाशिकला कोलवलं आहे.'
काँग्रॅच्युलेशन्स!'
'गधड्या, मला कोलवलं आहे ह्याचा तुला आनंद होतोय्?'

## १३. संभाषण कधीकधी व्याकरणदृष्ट्या अशुद्ध असते

संभाषक हे काही विद्वत्तापूर्ण भाषण करीत नसतात. ते एकमेकांशी बोलत असतात. त्यांनी परस्परांना समजून घेण्याचे मनोमन ठरविलेले असते. संभाषण नेहमीच निवांतपणे होत नसते, अनेकदा ते कमालीच्या घाईगर्दीत होत असते.

क्वचित्प्रसंगी ते दु:खी, भयभीत, अतिहर्षित अशा विशिष्ट मन:स्थितीतही होत असते. अशा अनेक कारणांमुळे त्यात व्याकरणाचे नियम काटेकोरपणे पाळले जातातच असे नाही. परिणामी, त्यात शब्दांचे रूपभंग, लिंगभेद, वचनभेद, वाक्यरचनेत त्रुटी इत्यादी व्याकरणविषयक चुका संभवतात. उदाहरणार्थ,

१३.१ 'अरे, ह्या घाट्याचं आज प्रमोशन झालंय्. 'चा' सांगा सगळ्यांना.'
(= 'चहा' सांगा सगळ्यांना)
'नुस्ता 'चा'?' (= नुसता चहा?)
'मग 'बिस्कुटं' सांगा.' (= मग बिस्किटं सांगा)
'फकस्त 'बिस्कुटं'?' (= फक्त बिस्किटं?)
'मग पावरोटीही सांगा.'
'कसला कद्रू आहेस रे!'

१३.२ 'आणखी काय म्हणले बाबूराव?' (= आणखी काय म्हणाले बाबूराव?)
'म्हणले— अजिबात नको.' (= म्हणाले...)
'पण तू नेट लावलंस की नाही?' (= पण तू नेट लावलास की नाही?)
'काही उपोग झाला नाही.' (= काही उपयोग झाला नाही.)

## १४. संभाषणात मधूनमधून खंड पडतो

संभाषण अखंडपणे क्वचितच चालू राहते, ते थांबत-थांबत चालू असते; मध्येच काही क्षण नि:स्तब्धता असते. एखाद्या विषयावरील संभाषण संपल्यावर, संभाषकांपैकी एखादा भावविवश किंवा चिंताग्रस्त झाल्यास, एखाद्या संभाषकाकडून एखादा प्रश्न विचारला गेल्यास, संभाषकांपैकी एखाद्याला एखादी वस्तू इतरांना दाखविण्याची इच्छा झाल्यास, संभाषण चालू असताना मध्येच कोणी आल्यास, आकस्मिक घटना घडल्यास किंवा असेच एखादे निमित्त झाल्यास संभाषणात खंड पडतो. संभाषकांचे हे तात्कालिक मौन जाणवण्याइतके स्पष्ट असते. उदाहरणार्थ,

१४.१ रघू – बापट, माझं तुमच्याशी भांडण नाहीये.
बापट – मग रेग्यांशी?
रघू – (मौन पाळतो)
बापट – का जाधव बाईंशी?
रघू – (मौन पाळतो)
बापट – अरे बोल, गप्प का?

१४.२ मीना – रंजना, तुला कोणी काही लागट बोललं का?
रंजना – (गप्प बसते)
मीना – तुला बरं वाटत नाहीय् का?

रंजना – (हूं की चू करीत नाही)
मीना – विश्वासचं पत्र आलंय् का?
रंजना – हो, नकाराचं.

## १५. संभाषणात कधीकधी एकाच वेळी अनेक संभाषक बोलतात

संभाषणप्रसंगी अनेकदा एकाहून अधिक संभाषक एकाच वेळी बोलतात हा अनुभव सार्वत्रिक व सार्वजनीन आहे. अशा एककालिक संभाषणाला पुढीलप्रमाणे अनेक निमित्ते संभवतात: एखाद्याचे स्वागत करणे, एखाद्याचे अभीष्टचिंतन करणे, एखाद्याला शुभेच्छा देणे, एखाद्याकडून कबुलीजबाब वदवून घेणे, एखाद्याविषयी मत देणे किंवा अभिप्राय व्यक्त करणे, अज्ञानाची कबुली देणे, एखाद्याला आशीर्वाद देणे/प्रश्न विचारणे, एखाद्याला हमी देणे/धीर देणे, दुःखोद्गार काढणे, माहितीचे निवेदन करणे, व्याकुळ होऊन प्रश्न विचारणे, विनंती करणे, सूचना देणे, इत्यादी. उदाहरणार्थ,

१५.१ उषा – ए शिल्पा, तुझी साडी झकासच आहे हं.
शलाका – अग उषा, तिची प्रत्येक निवड...
राधा – उत्तम असते असंच ना?
उषा, शलाका व राधा – नवऱ्याच्या निवडीसकट सगळ्या निवडी, बरं का ग शिल्पा!
शिल्पा – कितीही मॉड् झालात ना, तरी शेवटी दळूबाई दळूच!

१५.२ सुभाष – अरे मित्रांनो, आजच्या पेपरमधील अत्यंत आनंदाची बातमी वाचलीत का?
विश्वास आणि अनंत – कोणती रे?
सुभाष – अरे, आपल्या पंडितला आंतरराष्ट्रीय निबंधस्पर्धेत सुवर्णपदक मिळाल्याची.
सुभाष, विश्वास आणि अनंत – पंडित झिंदाबाद!

## १६. मोठ्या वाक्यांच्या पोटात (= अंतर्निविष्ट) लहान वाक्ये असतात

संभाषणाची एकूण धाटणी काहीशी गुंतागुंतीची असते. संभाषकाला मधूनमधून 'मला वाटते', 'मी काय म्हणतो', 'असे म्हणतात की', इत्यादी वाक्यखंड मोठ्या वाक्याच्या अंतर्गत वापरण्याची लहर येते. काहींच्या बाबतीत ती नित्याची सवय किंवा लकब असते. ह्या वैशिष्ट्याची उदाहरणे अवलोकू.

१६.१ 'बरं, ह्या प्रकल्पाबद्दल तुमचं काय मत आहे?'
'तसं म्हणाल तर मी अजून ह्या बाबतीत विचार केला नाही.'
'पण हा प्रकल्प, मला वाटतं, तुम्ही स्वीकारावा.'

'खरं हो, पण पैशांची काय सोय?'
'असं म्हणतात ना की, इच्छा असेल तर मार्ग दिसतोच.'

१६.२ 'मी काय म्हणतो, खडा टाकून पाह्यला काय हरकत आहे?'
'ते खरं, पण त्यांची काय प्रतिक्रिया होईल ते सांगता येत नाही.'
'जास्तीत जास्त काय, नाही म्हणतील इतकंच ना?'
'वाहत्या गंगेत हात धुऊन घ्यावेत, असं म्हणतोस?'

## १७. संभाषणात संक्षिप्त वाक्ये वापरली जातात

संभाषणप्रसंगी एक संभाषक दुसऱ्या संभाषकाचा अभिप्राय, हेतू, रोख इत्यादी बाबी लक्षात घेऊन आणि संभाषणातील गुप्तसुप्त संदर्भ ध्यानात ठेवून बोलत असतो. त्यामुळे तशीच खास गरज असल्यावाचून संभाषक पल्लेदार वाक्ये उच्चारीत नाही. लहान, आटोपशीर वा संक्षिप्त वाक्यांनी संभाषकांचे काम भागते; त्यांचे संभाषण सफल होते. उदाहरणार्थ,

१७.१ रमेश – काल रात्र विचारात गेली.
संदीप – संध्याकाळच्या घटनेच्या ना?
रमेश – सगळं थरारनाट्यच!
संदीप – मी पार हादरलोय्.

१७.२ ह्यापूर्वीच्या ३.२, ६.१, १३.१ व १४.१ मधील उदाहरण – वाक्ये संक्षिप्त व सुटसुटीत अशीच आहेत.

## १८. संभाषणात विचलित भाषिक रूपांचे (deviated linguistic forms) चे प्राचुर्य असते

लिखित वाग्व्यवहार हा प्रमाणभाषेत होत असतो (त्यातही ललित साहित्यातील पात्रे, त्यांची ग्रामीणता, वर्ण्य घटना-प्रसंग इत्यादींच्या आवश्यकतेनुसार बोलीभाषेचा वापर केलेला असतो.) तर संभाषण हे बोलीभाषेत- प्राधान्याने बोलीभाषेत- होत असते. बोलीत क्रियापदांची संपृक्त रूपे वापरण्याकडे वक्त्याचा कल असतो. ह्यामागे पूर्ण रूप उच्चारण्याचा कंटाळा, वैयक्तिक लकब, लघुरूपाने वाक्याचा तोल सांभाळण्याकडे असलेली वक्त्याची इच्छा, क्रियापदाच्या अर्थावर जोर देणे, संभाषणाचा 'झपाटा' टिकवणे अशी बरीच कारणे असतात. संभाषणाला अनेकदा शारीरिक हालचालींचीही जोड मिळत असल्यामुळे विशेषणे व क्रियाविशेषणे यांची द्वित्वयुक्त रूपेही मोठ्या संख्येने जाणवतात. उदाहरणार्थ,

१८.१ तो आलाय् (= आला आहे), सांग त्याला काय ते.
१८.२ असे फतकल मारून काय बसलाहात (= बसला आहात)?
१८.३ मी उद्या नागपूरला चाललोय (= चालललो आहे).
१८.४ मला चहा नक्वाय् (= नको आहे, जुन्या पिढीतील स्त्रिया).

१८.५ उठत्येयस् (= उठत आहेस) ना, का देऊ रपाटा?
१८.६ मोठ्ठे मोठ्ठे (= मोठेमोठे) डोळे करून तो माझ्याकडे बघत होता.
१८.७ तो कध्धी म्हणता कध्धीही (= कधीही) सुधारणार नाही.
१८.८ आत्ता (= आता) हाकलून दे त्याला.

प्रमाणभाषेतील रूपांहून वेगळी अशी वरीलसारखी रूपे ह्यापूर्वीच्या ४.१, ५.१, ५.२, ७.१, ८.२, ९.१, १०.१, ११.२, १२.१, १२.२, १३.१, १३.२, १४.२ इत्यादीतील उदाहरण-वाक्यांतही आढळतात.

## १९. संभाषणात अनेकदा भाषा-मिश्रण दिसून येते

संभाषण नेहमी एकच भाषा बोलणाऱ्यांच्या मध्ये घडून येत असते, असे नाही. कधीकधी मराठी भाषा बोलणाऱ्याला मध्येच एखादा शब्द किंवा एखादे वाक्य हिंदीत बोलण्याची लहर येते. अलीकडे मराठी भाषकांच्या बोलण्यात इंग्रजी शब्दांचा व वाक्यांचा वापर सर्रास होऊ लागला आहे. सार्वजनिक समारंभात, बाजारहाट करताना किंवा प्रवासात अन्य भाषेचा वापर संभाषणात कधी स्वेच्छेने किंवा कधी नाइलाजास्तव होत असतो. अशा प्रकारे मिश्र संभाषणाला अनेक कारणे संभवतात. एखाद-दोन उदाहरणांचे अवलोकन करू.

| | | |
|---|---|---|
| १९.१ | ऑफिसातला शिपाई | – हॅलो, डायमंड कंपनी. |
| | रामप्रसाद | – प्रवीणभाई हैं? |
| | ऑ. शिपाई | – नाही, ते आज मुंबईला गेलेत. |
| | रामप्रसाद | – आप कौन बोल रहे हैं? |
| | ऑ. शिपाई | – मी... त्यांच्या ऑफिसातला शिपाई. |
| | रामप्रसाद | – अच्छा, मैं कल उन्हें फोन करूंगा। |
| १९.२ | मधुकर | – उद्यापासून परीक्षा सुरू ना? |
| | सुरेखा | – हो रे, पण प्रेपरेशन काही मनासारखी झालेली नाही. |
| | मधुकर | – अग, स्कॉलर्स ऑल्वेज् से सो. एनी वे बेस्ट ऑफ् लक्. |
| | सुरेखा | – थँक्यू, बाय्. |
| १९.३ | सुनंदा | – का ग मंदा, तू अशी रडवेली का झाल्येस ग? |
| | मंदा | – अग, माझं दु:ख मलाच भोगू दे. तुला कशाला कष्टी करू? |
| | सुनंदा | – वाह ग शहाणे, आपण एवढ्या जिवलग मैत्रिणी, आणि म्हटलंय् ना, स्निग्धजनसंविभक्तं हि दु:खं सह्यवेदनं भवति। |

## २०. संभाषणात विषयांच्या बाबतीत स्वैरता असते

संभाषणाच्या भाषेला कोणत्याही विशिष्ट विषयाचे बंधन नसते. तिला कोणताही विषय चालतो. शिवाय संभाषणाला विषयांची धरसोडही मानवते. संभाषण हे मुक्त बोलणे असल्यामुळे त्याच्यावर विषयैक्य पाळण्याचे बंधन नसते. आता एक विषय तर पाच मिनिटांनी दुसराच विषय अशी अनिश्चितता त्यात संभवते. पुन्हा ही विषयांतरे झटक्यात व अनेकदा होतात. बदल हा संभाषणात अनुस्यूतच असतो, किंबहुना बदल ही त्याची अंत:सुप्त शक्ती असते. त्यामुळे ते कोणते स्वरूप धारण करील, कसे वाढत जाईल व त्याचे पर्यवसान कशात होईल, ह्याबद्दल कोणताही तर्क अगोदर करता येत नाही. संभाषण कधी एखाद्या विषयावर रेंगाळते, कधी इतर विषयांना स्पर्श करते, तर कधी मूळच्या विषयावर येऊन थडकते. एकंदरीने स्वैरता हे त्याचे एक ठळक वैशिष्ट्य असते. नमुन्यादाखल पुढील दोन उदाहरणांचे अवलोकन करू.

२०.१ शरद – इतका उशीर?
विजय – वाटेत गाडीला किरकोळ अपघात झाला.
त्यात दीड-दोन तास गेले.
शरद – बरं जेवतोयस् ना?
विजय – नको, वाटेत थोडं खाणं झालंय्. हवा तर चहा मागव.
शरद – अचानक कसा आलास?
विजय – अरे, त्या मिलिंदाच्या ऑर्डरचं काय झालं?

२०.२ रमेश – आजची बातमी वाचलीस का?
श्रीकांत – कसली?
रमेश – मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची.
श्रीकांत – ती नुसती हुलकावणी रे. ते जाऊ दे.
बंडू भेटला होता का रे अलीकडे?
रमेश – अरे हो, बंडूवरून आठवण झाली....
श्रीकांत – कशाची?
रमेश – त्याची बहीण नुकतीच अमेरिकेला गेली.

## २१. संभाषणाच्या भाषेवर संभाषकांच्या भाववृत्तीचा परिणाम होत असतो

संभाषणाच्या भाषेची लपेट संभाषकांच्या मन:स्थितीवर अनेकदा निर्भर असते. जशी संभाषकाची/संभाषकांची भाववृत्ती (mood) तशी त्यांच्या संभाषणाच्या भाषेची ठेवण. संभाषक कधी प्रसन्न मन:स्थितीत असतात, कधी उद्विग्न असतात, तर कधी त्यांना एकमेकांच्या फिरक्या घेण्याची लहर येते, तर कधी निखळ विनोदनिर्मितीचा आनंद लुटावासा वाटतो. एकंदरीने, संभाषणाची शब्दकळा संभाषकांच्या भावभावनांनी प्रभावित होत असते. उदाहरणार्थ,

२१.१ तो – चला, माझा स्टॉप आला.
ती – उतरणार तू?
तो – तू म्हणत असशील तर नाही उतरत!
ती – आजचे बसभाडे तूच दिलेस.
तो – छे, छे, मी ते तुझ्याकडून सव्याज वसूल करणार आहे!

२१.२ मोहन – हॅलो नयना!
नयना – अरे, अचानक कसा पुण्याला आलास?
मोहन – तू पत्रलेखनासाठी कागद कोठून आणतेस?
नयना – हे भलतंच काय विचारतोयस? शुद्धीवर आहेस ना?
मोहन – ते संध्याकाळी सांगतो. तू ऑफिसातच थांब, मी तुला न्यायला येईन. तू कशी आहेस?
नयना – ते संध्याकाळी सांगते!

## २२. संभाषणात भाषाबाह्य संदर्भ महत्त्वाचा असतो

संभाषकांच्या जीवनातील काही घटना, प्रसंग, व्यक्ती, आठवणी, बोलणी, वाचलेली पुस्तके, तारखा इत्यादी गोष्टी महत्त्वाच्या व संस्मरणीय असतात. त्यांच्याभोवती अर्थाची विशिष्ट वलये असतात. हा भाषाबाह्य संदर्भ होय. जेव्हा बोलणारा व ऐकणारा हे एकमेकांच्या परिचयाचे असतात, तेव्हा त्यांना हा भाषाबाह्य संदर्भ ठाऊक असतो आणि त्यांना हेही ठाऊक असते की, ह्या संदर्भाचा वाच्यार्थ ग्रहण करावयाचा नसून सूचित अर्थ ग्रहण करावयाचा असतो. उदाहरणार्थ,

२२.१ सलिल – कादंबरी लिहिताय वाटतं?
भाऊसाहेब – हं, प्रयत्न करतोय.
सलिल – बरोबरच आहे, 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता...'
भाऊसाहेब – घामही गळे!
सलिल – असं का म्हणालात?
भाऊसाहेब – अरे बाबा, Good writing is just ten percent inspiration and ninety percent perspiration हे तुला ठाऊक आहे ना?

२२.२ समजा, दोन विद्यार्थी एकमेकांशी बोलत आहेत. त्यांची परीक्षा दहा तारखेला सुरू होणार आहे. संभाषणाच्या ओघात एक दुसऱ्याला म्हणतो : 'दहा तारीख हां हां म्हणता उजाडेल.' या वाक्यातील 'दहा तारीख' ह्या शब्दांचा वाच्यार्थ 'महिन्याचा दहावा दिवस' हा वक्त्याला अभिप्रेत नाही, तर 'दहा तारीख' म्हणजे 'परीक्षेचा प्रारंभ-दिवस' हा संदर्भनिष्ठ अर्थ अभिप्रेत आहे. हा संदर्भ भाषेतर किंवा भाषाबाह्य आहे.

## २३. संभाषण चिंतनाला सामग्री पुरविते

संभाषण हे सर्व प्रकारच्या स्त्री-पुरुषांमध्ये संभवते. अशा व्यक्तींत अल्पशिक्षित व उच्चशिक्षित, गरीब व श्रीमंत, सामान्य बुद्धीची व असामान्य प्रज्ञेची, खुज्या कर्तृत्वाची व उत्तुंग कर्तबगारीची अशी सर्व थरांतील व सर्व क्षमतांची माणसे असतात. त्यांना आपापले जीवन जगताना विविध व विपुल अनुभव आलेले असतात. त्या अनुभवांमुळे त्यांनी निसर्ग, मनुष्य-स्वभाव, ऐहिक व्यवहार इत्यादी विविध विषयांवर आपापल्या कुवतींनुसार विचार केलेला असतो. तो त्यांच्या संभाषणाच्या ओघात सहजपणे व्यक्त होऊन जातो आणि इतरांच्या चिंतनाला खाद्य पुरवितो. ज्या संभाषकाला 'दुनियादारी'चा दीर्घकालीन व विशाल अनुभव असतो, त्याला अशांपैकी बरेचसे विचार ठाऊक असतात, सुचलेले असतात व/वा ते त्याने इतरांना प्रसंगविशेषी ऐकवलेलेही असू शकतात. एकंदरीने अशा चिंतनकणिका ही सर्व समाजाची सामाईक मालमत्ता असते. ह्या वैशिष्ट्याची दोन उदाहरणे पाहू.

२३.१ वासू – दैव खरोखरच किती बलवत्तर असतं, बघ!
दिनू – का बाबा, काय झालं?
वासू – अरे, परवा नाशिकला इमारत पडल्याची बातमी वाचलीस ना?
दिनू – हो, त्यात दोन मुलांची आई ढिगाऱ्याखाली गाडली गेली...
वासू – आणि मुलं वाचली. तेच वाचून मनात आलं—
दैवं चैवात्र पंचमम्।

२३.२ एक हितचिंतक – तुझा मालक तुला पगार किती देतो रे?
गरीब कामगार – दरमहा आठशे रुपये!
हितचिंतक – त्यात महिन्याचा नाश्ता तरी होतो का रे? पुढं लग्न, पोरंबाळं, घर हे सारं कसं होईल ह्या आठशे रुपड्यांतून?
गरीब कामगार – होईल सावकाश!
हितचिंतक – सावकाश म्हणजे तुझं नाक भुईला टेकल्यावर?
गरीब कामगार – पण गरिबाला लग्न करण्याचा, पोरंबाळं होऊ देण्याचा, घर बांधण्याचा हक्क आहे?

## २४. टेलिफोनवरील संभाषण हा संभाषणाचाच एक उपप्रकार आहे

टेलिफोनवरील संभाषकांना एकमेकांचे अस्तित्व फक्त आवाजाच्या द्वारे जाणवते. टेलिफोनवरील संभाषणात प्रश्न, त्याचे उत्तर (किंवा त्यांची उत्तरे),

आज्ञार्थक वाक्ये, त्रोटक शब्दावली, नि:शब्दता, बोलीभाषेतील रूपे इत्यादी वैशिष्ट्ये जाणवतात. उदाहरणार्थ,

२४.१ 'हॅलो, नरेन्द्र आहे?'
'नाही. (तो) बाहेर गेलाय.'
आल्यावर त्याला मला फोन करायला सांगा.'
'आपला नंबर?'
'त्याला ठाऊक आहे.'

२४.२ 'ऑक्सफर्ड डिक्शनरी आहे का हो?'
'कोणती, अॅड्व्हान्स्ड लर्नर्स?'
'हो.'
'आहे ना.'
'काय किंमत आहे?'
'सातशे रुपये.'

## समारोप

संभाषण हे तोंडी वाग्व्यवहाराचे अनिवार्य व यशस्वी साधन आहे. मुक्या व बहिऱ्या व्यक्ती वगळता इतरांना निसर्गत: लाभलेले हे भाषाकौशल्य आहे. हे हरकामी व हुकमी आहे. वर दाखवून दिल्याप्रमाणे ह्याला अनेक पैलू आहेत. लेखन ह्या उपार्जित कौशल्याचे सामर्थ्य लेखनप्रवीण व्यक्तींपुरतेच मर्यादित असते. पण त्याच्या तुलनेने संभाषण हे अधिक व्यापक व सर्वव्यवहारस्पर्शी असते. जो संभाषक ह्या शक्तीची वर वर्णिलेली सामर्थ्ये साक्षेपाने अभ्यासून आत्मसात करील तो उत्तम संभाषणपटू झाल्यावाचून राहणार नाही, असे नि:संशय म्हणता येते.

□□

## संदर्भटीपा


१. डॉ. जॉन्सनकृत ही व्याख्या व्हॅलिन्सने उद्धृत केली आहे. पाहा— G.H. Vallins, Better English, third impression, London, Andre Deutsch, March 1963, p. 181.

२. Cambridge International Dictionary of English, Low Price edition, reprinted, Cambridge, Cambridge University Press, 1999, p. 300.

३. "Communication is essentially sharing mutual participation or exchange." पाहा— J.R. Kreuzer and Lee Cogan, Studies in Prose Writing, Alternate edition, New York, Holt, Rinehart and Winston, 1961, p. 295.

४. "A twitch, a wink, a nudge, a kiss, passionate love-making and hitting someone over the head with an iron bar are forms of communication." पाहा— G. Brandreth, Pears Book of Words, London, Pelham Books, 1979, p. 9.

५. "Real communication, creative communication that can sustain and uplift and inspire is only possible with words." तत्रैव, पृ. ९.

६. "We have such names as chatter, gossip, conversation, talk, discussion, interview... for those pattern of sentences where only the spoken word is used." पाहा— A. E. Darbyshire, A Grammar of Style, London, Andre Deutsch, 1971, p. 17.

७. तत्रैव, पृ. १४४-४५.

८. G. W. Turner, Stylistics, reprinted, England, Penguin Books, 1977, p. 138.

९. संदर्भटीप ६, पृ. २२.

१०. David Crystal and Derek Davy, Investigating English Style, fifth impression, London, Longman Group United, 1976 [English Language Series Title No. 5], pp. 95-121.


❑❑❑

# ३.

# ललित साहित्याची भाषा : परिवर्तित वाक्यसाधक व्याकरणाच्या दृष्टीने विश्लेषण *

## १. लेखाचे प्रयोजन

मनुष्य स्वनिर्मित भाषेच्या साहाय्याने विचार करणे, बोलणे, ऐकणे, लिहिणे व वाचणे अशी पाच कार्ये साधतो. ह्यांपैकी विचार करणे हे कार्य इतर चारी कार्यांच्या मुळाशी असते. बोलणे व ऐकणे ही मानवी भाषेची प्रधान कार्ये असून लिहिणे व वाचणे ही सापेक्षतया गौण कार्ये होत. मनुष्य आपल्या विविध मनोगतांच्या प्रकटीकरणासाठी अनेकदा भाषेच्या ‘लेखी’ रूपाचा अवलंब करतो. ललित लेखन हा भाषेच्या ‘लेखी’ रूपाचाच एक विशिष्ट प्रकार आहे. मनुष्य ललित लेखनाच्या द्वारे आपल्या ‘विशिष्ट’ मनोगताचे प्रकटीकरण करतो. ह्या म्हणजेच सर्जनशील लेखनाच्या भाषेची पद्धत सर्वसामान्य व्यवहाराच्या भाषेच्या पद्धतीसारखी असूनही पूर्णपणे तशी नसते, असे रास्तपणे मानण्यात येते. अशा लेखनाच्या भाषाशैलीची पद्धतशीर मीमांसा करण्यासाठी अलीकडच्या काळातील पाश्चात्त्य भाषाशास्त्रज्ञांनी सिद्ध केलेल्या परिवर्तित वाक्यसाधक व्याकरणाचे कितीसे साहाय्य होते, त्याचा परामर्श घेणे हे प्रस्तुत लेखाचे प्रयोजन आहे. परिवर्तित वाक्यसाधक व्याकरण ही संज्ञा Transformational Generative Grammar साठी वापरली आहे.

## २. शब्दसंघटनांची विविधता

शब्दयोजनेची किंवा वाक्यरचनेची विविधता ही साहित्यिक शैलीच्या मुळाशी असते. किंबहुना ती विविधता हा शैलीच्या संकल्पनेचा गाभा होय. ओहमन

---

* **पूर्वप्रसिद्धी** – डॉ. द. भि. कुलकर्णी अभिनंदन ग्रंथ ‘समकालीन साहित्य : प्रवृत्ती आणि प्रवाह,’ १९८५, पृ. २१३-२२९

(Ohmann) म्हणतो : "The notion of style calls for different ways of expressing the same content."[1] ह्या धारणेचे स्पष्टीकरण दोन-तीन उदाहरणांच्या साहाय्याने करू.

२.१ अर्थ व वाक्यविन्यास यांचा अविभाज्य संबंध

'आम्हांला रंगीत दगड कोठेही मिळाले नाहीत,' हा आशय 'आम्हांला रंगीत दगड कोठेच मिळाले नाहीत,' 'आम्हांला रंगीत दगड शोधशोधूनही कोठे मिळाले नाहीत,' 'कोठे म्हणता कोठेही आम्हांला रंगीत दगड मिळाले नाहीत,' 'कुठ्ठे कुठ्ठे म्हणून आम्हांला रंगीत दगड मिळाले नाहीत' इत्यादी वेगवेगळ्या वाक्यविन्यासांच्या द्वारे व्यक्त करता येतो. ह्यांपैकी अखेरचे वाक्य वगळता बाकीच्या तीन वाक्यांत आपण परिचित शब्दांना परंपरागत (traditional) व्याकरणानुसार प्रत्यय वगैरे लावले व त्यांची वाक्यांत योजना केली. परंतु शेवटच्या वाक्यात आपण लिखित भाषेतील 'कोठे' ह्या रूपाचे 'कुठे' हे बोलीतील रूप वापरले; पण ते जसेच्या तसे न वापरता 'ठ'ची द्विरुक्ती करून वापरले. शिवाय 'कुठ्ठे' ह्या अव्यय-शब्दाचीही द्विरुक्ती केली आणि ते दोन्ही शब्द वाक्यारंभी वापरले. ह्यावरून आपण त्या वाक्यातील शब्दविन्यासात पारंपरिक व्याकरणापासून दूर सरकलो. ह्याला शैलीशास्त्राच्या भाषेत विचलन किंवा विपथन (Deviation) असे म्हणतात. आपण हे विचलन अज्ञानामुळे केले नाही, तर जाणूनबुजून केले. मूळ वाक्याच्या चार विकल्पांपैकी शेवटचा विकल्पच आपले मनोगत अचूकपणे व्यक्त करू शकेल, असे आपल्याला खात्रीपूर्वक वाटल्यामुळे आपण त्याची व त्याचीच निवड (choice) व योजना (use) केली.[२] 'कोठे' ह्या अर्थांशावर आपल्याला जोर द्यावयाचा होता व त्याच्याकडे श्रोत्यांचे लक्ष वेधावयाचे होते.म्हणून आपण त्या शब्दाच्या साधित रूपांना वाक्यारंभी अग्रस्थान दिले. ह्यावरून हे ध्यानात येईल की, आपल्या मनातील 'अर्था'च्या जवळ जाऊन पोचणाऱ्या अनेक शब्दसंघटना (word structures) संभवतात. परंतु त्यांपैकी एखादीच तो अर्थ पूर्णपणे व्यक्त करणारी असते. म्हणजेच अर्थ व वाक्यविन्यास यांचा अतिनिकटचा किंबहुना अविभाज्य संबंध असतो.

२.२ योग्यतम वाक्यविन्यासाची निवड

एखाद्या वक्त्याला 'मी लगेच येतो' हा आशय व्यक्त करावयाचा आहे. त्याला 'मी ताबडतोब येतो,' 'मी त्वरित येतो,' 'आत्ता येतो बघा,' 'हा आलोच बघा' इत्यादी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. ते सगळे जरी अर्थदृष्ट्या जवळजवळ सारखेच असले तरी ज्या वक्त्याला आपल्या विनाविलंब आगमनाविषयी श्रोत्यांच्या मनात विश्वास उत्पन्न

करावयाचा आहे, त्या वक्त्याला वरीलपैकी अंतिम दोन पर्याय अर्थदृष्ट्या आत्यंतिक समान वाटतात व तो त्या दोहोंपैकी एकाची निवड व योजना करतो. ह्या अंतिम दोन पर्यायी वाक्यरचनांमध्ये 'बघा' हे क्रियापदरूप वाक्यालंकारात्मक (म्हणजे वाक्यात डौल साधण्यासाठी वापरलेले) आहे. 'मी' हा कर्तृवाचक शब्द दोहोंत अनुक्त आहे. 'हा आलोच बघा' ह्या वाक्यात 'मी'ची जागा 'हा' ने घेतली असली तरी 'हा' हे येथे सर्वनाम नसून 'अव्यय' आहे. अर्थात सर्वनामाचा अव्ययार्थी प्रयोग हा प्रचलित नसून विचलित आहे. (तो भाषेच्या अंगवळणी पडलेला असल्यामुळे आता प्रचलितसा दिसतो, एवढेच.) 'आत्ता येतो बघा' ह्या वाक्यातील 'आत्ता' हे रूप 'आता' ह्या रूढ (normal) रूपाचे विचलित रूप आहे. 'त' द्वित्व पावल्यामुळे 'आता' हा अर्थ उत्कट झाला आहे. ह्यावरून असे ठरते की, आपले मनोगत अचूकपणे व ग्रहणकर्त्याच्या मनावर कोरले जाईल, अशा पद्धतीने व्यक्त करू इच्छिणारा वक्ता किंवा लेखक विविध वाक्यविन्यासांची योग्यायोग्यता मनात पारखतो व त्यांतील योग्यतम (mot juste) वाक्यविन्यास निवडून उच्चारतो किंवा लिहितो. तसे करताना तो काही शब्द जाणूनबुजून वगळतो.

## २.३ उपमाप्रभृती अलंकार

आता सुनील गावसकर-लिखित पुढील वाक्याचा विचार करू.

'मंदगती गोलंदाज चेंडूफेक करू लागले, तेव्हा तर माझं काम पावाला लोणी लावण्याइतकं सोपं होऊन गेलं.'[३] ह्या वाक्यात सुरुवातीचा अध्याहृत असलेला 'जेव्हा' हा अव्यय-शब्द साक्षात वापरलेला नाही. वाचक 'मंदगती गोलंदाज चेंडूफेक करू लागले तेव्हा' एवढा वाक्यांश वाचल्यावर 'मी चेंडू टोलवू लागलो व (वैयक्तिक आणि सांघिक) धावसंख्या वाढवू लागलो,' असा काहीतरी वाक्याचा उत्तरार्ध मनातल्या मनात रचतो. कारण तो अर्थदृष्ट्या पूर्वार्धाशी सुसंगत असल्याची वाचकाची अटकळ असते. परंतु प्रत्यक्षात लेखकाने लिहिलेल्या उत्तरार्धात चेंडू टोलवण्याचा, धावा काढण्याचा व धावसंख्या सहजपणे आणि झपाट्याने वाढवण्याचा उल्लेख मुळीच नाही. परंतु तो सर्व 'अर्थ' एका समर्पक उपमेच्या साहाय्याने 'सूचित' झाला आहे. इतकेच नव्हे तर तो जणू दृश्यमान (vivid) झाला आहे. 'मी चेंडू टोलवू लागलो व धावसंख्या वाढवू लागलो' ही शब्दरचना वास्तविक अर्थ साक्षात व्यक्त करणारी आहे. पण 'माझं काम पावाला लोणी लावण्याइतकं सोपं होऊन गेलं' ही शब्दरचना तशी म्हणजे वास्तविक अर्थ साक्षात व्यक्त करणारी नाही; ती विचलित (deviated) आहे. तरीही लेखकाने तिचीच

निवड व योजना केली आहे. अर्थात प्रस्तुत उदाहरणातील विचलन किंवा विपथन ह्याअगोदरच्या दोन उदाहरणांतील विचलनाहून अधिक असून अधिक स्पष्ट आहे. शिवाय, लेखकाने 'माझं', 'लावण्याइतकं', 'सोपं' व 'गेलं' ही बोलीभाषेतील रूपे लिखित भाषेत वापरून उदाहरण २.१ मधील विचलनासारखे विचलनही साधले आहे, ते वेगळेच.

## ३. वाक्य : शैलीदार लेखनाचे मूलभूत एकक

वरील उदाहरणांच्या विवेचनावरून आपल्या असे लक्षात येते की, आपले मनोगत पूर्णपणे व अविकृतपणे व्यक्त करण्यास भाषेतील केवळ शब्द पुरेसे नसतात, तर त्या शब्दांच्या विशिष्ट रचना किंवा संघटना आवश्यक असतात. म्हणजेच अर्थाची यथावत अभिव्यक्ती केवळ शब्दांनी होत नसते तर शब्दसाधित संघटनांनी किंवा वाक्यांनी होत असते. अर्थात वाक्य हे प्रभावी लेखनाच्या किंवा शैलीच्या सिद्धीचे व मीमांसेचे मूलभूत एकक (unit) आहे. डर्बीशायरने हा मुद्दा पुढील शब्दांत मांडला आहे; तो मननीय आहे :

"Two points deserve to be noticed. The first is that in analysing sentences we discover that our traditional notion of what is meant by the word word is not very helpful. The simple truth is that there are not enough words in the language to enable us to say all that we want. Consequently we have to make structures of words inside sentences, and these structures, though comparatively loose in one sense, behave as if they were stabilized elements like those entities we traditionally call words. They behave, that is, as if they were the sorts of things we could go and look up in a dictionary.[4]

## ४. पर्यायी वाक्यविन्यासांची अपरिहार्यता

वरील उदाहरणांच्या चर्चेमधून जी दुसरी गोष्ट आपल्या लक्षात येते ती अशी की, एखादा अर्थ प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी किंवा तो श्रोत्यांच्या अथवा वाचकांच्या मनावर बिंबवण्यासाठी वक्त्याला अथवा लेखकाला उपरिवर्णित शब्दसंघटनांचे अनेक पर्याय उपलब्ध असतात. असे किती पर्याय उपलब्ध होऊ शकतात त्याचा बोध आपल्याला परंपरागत व्याकरणावरून होऊ शकत नाही. कारण परंपरागत व्याकरणात शब्द व त्यांना जोडले जाणारे पूर्व व अपर प्रत्यय यांचा विचार केलेला असतो; अशा प्रकारच्या प्रत्यय-घटित शब्दांची वाक्यात कोणत्या क्रमाने योजना करावी त्याचा खुलासा केलेला असतो; नाम-सर्वनाम-क्रियापद-प्रभृती शब्दांना लिंग-वचन-विभक्ति-काळ-अर्थ-प्रभृतींचे कोणते प्रत्यय

लागतात त्याचे विवरण केलेले असते आणि कोणते रूप व/वा वाक्य शुद्ध व कोणते अशुद्ध त्याचा उलगडा केलेला असतो. परंतु, परंपरागत व्याकरणाने पर्यायी शब्दसंघटनांच्या सिद्धीवर व संख्येवर प्रकाश पडू शकत नाही. आपल्याला शैलीसंपन्न लेखनासाठी अशा पर्यायी वाक्यविन्यासांची आवश्यकता असते. कारण सर्जनशील लेखकाला कोण, कोठे, केव्हा, काय, कसे इत्यादींचे तपशीलवार व चित्तवेधक वर्णन करावयाचे असते. डर्बीशायरने हा विचार खालील समर्पक शब्दांत मांडला आहे :

"... The kinds of things that we want to say are the kinds of things that our society demands, positively, negatively or with assumed neutrality, that we should say. Therefore our society has made for us institutionalized and semi-institutionalized ways of saying whatever we think should be said. We also have to acknowledge a need to embellish the basic forms with modification which help us to define and clarify, to particularize and to make specific. We need also the management of a great deal of adverbial qualification, for not only do we have to say or be told that things exist and happen, but we also want to say or be told when, where, how and why."[5]

वेगळ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे अर्थाच्या प्रभावी अभिव्यक्तीसाठी शब्दबंधाच्या मूलभूत स्वरूपाची किती वैचित्र्यपूर्ण रूपांतरे करता येतात, त्याचे आकलन सांकेतिक व्याकरणाने होऊ शकत नाही. म्हणूनच अन्य व्याकरणाची मदत घ्यावी लागते. त्या व्याकरणालाच Transformational Generative Grammar असे म्हणतात.

## ५. परिवर्तित वाक्यसाधक व्याकरणाच्या व्याख्या

प्रथमत: ह्या व्याकरणाच्या पाश्चात्त्यांनी केलेल्या काही व्याख्या विचारात घेऊ.

५.१ डर्बीशायरने केलेली व्याख्या अशी :

> "... A transformational grammar is one which attempts to give a description of a language or a part of a language, by means of a set of rules. If these rules are applied in a certain fixed order specified in the grammar, then all the grammatical sentences and only the grammatical sentences of the language, or part of it, can be generated..."[6]

अर्थात काही नियमांच्या आधारे एखाद्या भाषेचे किंवा भाषेच्या

अंशाचे वर्णन करणाऱ्या व्याकरणाला परिवर्तनात्मक व्याकरण असे म्हणतात. अशा व्याकरणात सांगितलेले नियम विशिष्ट क्रम पाळून लागू केले तर संबंधित भाषेतील सर्व व्याकरणिक वाक्ये व फक्त व्याकरणिक वाक्येच सिद्ध करता येतात.

५.२ ई. बाक (E. Bach) कृत व्याख्या अशी आहे : "A (generative) grammar of a language is a theory or set of statements which tells us in a formal and explicit way which strings of the basic elements of the language are permitted."[7] बाकच्या ह्या विधानाचा आशय असा की, परिवर्तित वाक्ये सिद्ध करणारे व्याकरण हा एक सिद्धान्त किंवा विधानसमूह असून तो संबंधित भाषेतील मूलभूत घटकांच्या कोणत्या शृंखला साधता येतात ते रीतसर व स्पष्टपणे सांगतो.

५.३ के. डब्ल्यू. हण्ट (K.W.Hunt) ने ह्या व्याकरणाचे स्वरूपवर्णन पुढील शब्दांत केले आहे :

"The newest model in grammar is called generative Transformational. It is called generative because it aims to be as explicit as the mathematical formula that generates a circle or a straight line on a sheet of graph paper. An explicit formula is capable of being proved true or false. A vague statement is not capable of being proved either true or false. So generative grammar aims to say explicitly many of the things that traditional grammars have said only vaguely. It tries to generate the same sentences that people generate and it tries to generate none of the non-sentences. This grammar is by no means complete, but no other grammar is complete either, as any experienced grammarian knows."[8]

अर्थात परिवर्तित वाक्यसाधक व्याकरण हे आधुनिकतम व्याकरण होय. ज्याप्रमाणे आपण गणिताच्या एखाद्या सूत्राच्या साहाय्याने कागदावर वर्तुळ किंवा सरळ रेषा काढू शकतो, त्याप्रमाणेच प्रस्तुतच्या व्याकरणाच्या सुस्पष्ट नियमांनुसार आपल्याला वाक्ये सिद्ध करता येतात. एखादा गणितीय नियम बरोबर की चूक ते पडताळून पाहून निश्चित करता येते; परंतु कोणतेही संदिग्ध विधान अशा प्रकारे पडताळून पाहता किंवा पारखून घेता येत नाही. हे 'नवीन' व्याकरण पारंपरिक व्याकरणांनी सांगितलेल्याच गोष्टींचे प्रतिपादन करत असते. फरक इतकाच असतो

की, सांकेतिक व्याकरण त्या गोष्टी संदिग्धपणे सांगते, तर हे नवीन व्याकरण त्या गोष्टी सुविशदपणे सांगते. म्हणून त्याला परिवर्तित वाक्यसाधक व्याकरण म्हणतात. आपण एरव्ही जी वाक्ये साधतो तीच वाक्ये हे नवीन व्याकरणही साधते. किंबहुना ज्यांना वाक्ये असे म्हणता येणार नाही, अशी वाक्ये हे नवीन व्याकरण मुळीच साधत नाही. हे व्याकरण परिपूर्ण आहे अशातला मुळीच भाग नाही; पण तसे पाहता कोणतेच व्याकरण परिपूर्ण नसते, हे अनुभवी लोक जाणतातच. तात्पर्य असे की, परिवर्तित वाक्यसाधक व्याकरण परिमेय नियमांच्या साहाय्याने अक्षरश: अपरिमेय वाक्ये सिद्ध करू शकते. शिवाय प्रत्यक्षात सिद्ध होणाऱ्या अशा प्रकारच्या अपरिमेय वाक्यांचे बिनचूक विश्लेषण कसे करावयाचे त्याचे दिग्दर्शन करू शकते. शैलीच्या विश्लेषणात्मक अभ्यासाला ह्या व्याकरणाची नितांत उपयुक्तता अतएव आवश्यकता असते. ह्या मुद्याचा विस्तृत विचार ओहमनने, प्रस्तुत नवीन व्याकरणाची वैशिष्ट्ये नमूद करून, केला आहे. तोच समजून घेऊ.

## ६. परिवर्तित वाक्यसाधक व्याकरणाची वैशिष्ट्ये

६.१ ओहमनच्या मते शैलीशास्त्राच्या संदर्भात ह्या नवीन व्याकरणाची तीन महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांपैकी पहिले वैशिष्ट्य असे : "In the first place, a large number of transformations are optional."[9]

ह्या विधानाचे सोदाहरण स्पष्टीकरण करू या. कोणत्याही वाक्यातील शब्द त्या वाक्याचे घटक असतात. ते विशिष्ट नियमांनी एकमेकांशी संबद्ध असतात. त्यांच्या योगाने सिद्ध होणाऱ्या प्रत्येक वाक्याच्या उत्तान व गूढ अशा दोन संघटना असतात. हे वैशिष्ट्य सर्व मानवी भाषांमध्ये समान रूपाने आढळते. जेकब्ज व रोझेनबॉम ह्यांनी ह्याबाबतीत म्हटले आहे : "Perhaps the most important fact about the sentences of human languages is that all sentences have both a deep structure and a surface structure."[10]

उदाहरणार्थ, 'ती नवीन कल्पना मौलिक आहे,' ह्या वाक्यातील 'ती नवीन कल्पना' ह्या उत्तान शब्दसंघटनेच्या पोटात 'ती कल्पना नवीन आहे,' हे संपूर्ण वाक्य आहे. पण ते 'गूढ' आहे. त्यालाच deep structure म्हणतात. ही गूढ संघटना वाक्याचा अर्थ घोषित करते. ती वाक्याच्या उत्तान संघटनेशी परिवर्तनाच्या (transformation च्या) मार्गाने निगडित असते. वरील 'ती कल्पना नवीन आहे' ह्या गूढ संघटनेचे परिवर्तनमार्गे 'ती नवीन कल्पना' असे उत्तान संघटनेत रूपांतर झाले आहे. जेकब्ज आणि रोझेनबॉम ह्यांनी परिवर्तनाचे लक्षण

"Transformations have been defined as those processes which convert deep structures into intermediate and/or surface structures."[11] ह्या शब्दांत केले आहे. परंतु ह्या परिवर्तनाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य असे की, परिवर्तित उत्तान संघटनेपासून मूळची गूढ संघटना पुन: प्राप्त करता येते. वरील उदाहरणातील 'ती नवीन कल्पना' ह्या परिवर्तित उत्तान संघटनेपासून 'ती कल्पना नवीन आहे' ही मूळची गूढ संघटना पुन्हा प्राप्त करता येते. म्हणजेच परिवर्तित शब्दसंघटना मूळचा अर्थ टिकवून धरते; गूढ संघटना पूर्णपणे नष्ट होत नाही. जेकब्ज व रोझेनबॉम ह्यांनी ह्या वैशिष्ट्याचे वर्णन पुढील शब्दांत केले आहे :

"Transformations are, you should remember, meaning preserving. This implies that the deep structure is not lost, that it is still traceable or as it is sometimes worded that the deep structure is recoverable."[12]

गूढ संघटनेचे किंवा मूळ आशयाचे परिवर्तन अनेक स्वरूपांत संभवते. उदाहरणार्थ, 'मुलगा धावतो,' ह्या गूढ संघटनेची 'सडसडीत मुलगा धावतो' (विशेषण-साधित), 'मुलगा वेगाने धावतो' (क्रियाविशेषण-साधित), 'सडसडीत मुलगा वेगाने धावतो' (विशेषण व क्रियाविशेषण या दोहोंनी साधित), 'मुलगा धावत नाही' (नकारात्मक), 'मुलगा धावतो काय?' (प्रश्नात्मक) अशी अनेक परिवर्तने संभवतात. तसेच 'मुलगा वेगाने धावतो' ह्या आशयाची 'मुलगा अतिशय वेगाने धावतो', 'मुलगा चित्त्यासारखा धावतो' अशी विविध रूपांतरे संभवतात; परंतु ही परिवर्तने किंवा रूपांतरे वैकल्पिक (optional) असतात, अनिवार्य (obligatory) नसतात, हे ह्यांचे पहिले वैशिष्ट्य होय. हे वैशिष्ट्य शैली-संकल्पनेच्या दृष्टीने विचारणीय ठरते.

६.२ परिवर्तन-प्रक्रिया शब्दसंघटनेत बदल घडवून आणते हे खरे, तथापि मूळच्या शब्दसंघटनेचा काही भाग अपरिवर्तित राहिलेला असतो. अर्थात, परिवर्तित शब्दसंघटना व मूळची शब्दसंघटना यांमधील संबंध परिवर्तनानंतरही जाणवतो. म्हणजेच ह्या परिवर्तन-प्रक्रियेत मूळच्या शब्दसंघटनेचे आमूलाग्र रूपांतर घडून येत नाही, हे परिवर्तन-प्रक्रियेचे दुसरे वैशिष्ट्य आहे. ह्याचे वर्णन ओहमनने असे केले आहे :

"A transformation works changes on structure, but normally leaves Part of the structure unchanged. And in any case, the new structure bears a precisely specifiable relationship to the old one, a relationship, incidentally that

speakers of the language will intuitively feel."[13]

एखाद्या उदाहरणाद्वारे हा मुद्दा स्पष्ट करू. 'मोहनने हे पुस्तक वाचले' ह्या मूळ वाक्याचे 'मोहनने हे पुस्तक वाचले नाही,' असे किंवा 'मोहनने हे पुस्तक वाचले?' असे कोणतेही परिवर्तन होऊ शकते. परंतु, मूळ वाक्याचे 'राजेशने केळे खाल्ले' असे रूपांतर होऊ शकत नाही. अर्थात रूपांतरित वाक्यात मूळ वाक्यातील किमान काही घटक शिल्लक राहतात. आणखी एखाद-दोन उदाहरणे विचारात घेऊ. 'त्याला आनंद झाला' ह्या मूळ वाक्याचे 'त्याची कळी खुलली' हे रूपांतर पाहा. तसेच 'त्याला भीती वाटली'चे 'त्याची पाचावर धारण बसली' हे परिवर्तन पाहा. ह्या दोन्ही परिवर्तनात मूळ शब्दसंघटनांतील 'तो' ह्या सर्वनामाची सविभक्तिक रूपे तेवढी दिसतात, पण बाकी घटक शिल्लक राहिलेले नाहीत. पण रूपांतरित वाक्ये अर्थदृष्ट्या मूळच्या वाक्यांसारखीच आहेत. मात्र फरक असा आहे की, रूपांतरित शब्दसंघटनांना शैलीचा स्पर्श झालेला आहे. ही रूपांतरे कोणत्या नियमांनुसार झाली त्याची चर्चा पुढे करू. तूर्त एवढेच ध्यानात ठेवावयास हवे की, वरीलसारख्या मोठ्या प्रमाणावरील परिवर्तनांची मीमांसा सांकेतिक व्याकरणाने होऊ शकत नाही, ती परिवर्तित वाक्यसाधक व्याकरणाने होऊ शकते.

६.३ शैलीचा विश्लेषणात्मक अभ्यास करणाऱ्याला प्रस्तुत व्याकरणाचा आणखी एका दृष्टीने उपयोग होतो. त्याचे निरूपण ओहमनने ह्या शब्दांत केले आहे : "The third value of a transformational grammar to the analyst of style is its power to explain how complex sentences are generated and how they are related to simple sentences...[14]

ह्याचा खुलासा करू. वाक्यांचे केवल, मिश्र, संयुक्त इत्यादी प्रकार सर्वपरिचित आहेत. ह्यांपैकी संयुक्त वाक्य हे अनेक केवल व/वा मिश्र वाक्यांच्या एकत्रीकरणाने सिद्ध झालेले असते. संयुक्त वाक्याची घटक-वाक्ये परस्परांशी संबद्ध असतात. ती परिवर्तने पावून संयुक्त वाक्याला जन्म देतात. ही परिवर्तने निरनिराळ्या पद्धतींनी व नियमांस धरून होत असतात. ह्या नियमांचे विवरण प्रस्तुत व्याकरणात आढळते. प्रत्येक ललित लेखक ह्या संदर्भात वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब करून आपली पृथगात्मता प्रगट करतो. ती त्याच्या शैलीचे वैशिष्ट्य ठरते आणि एकूण शैलीच्या विश्लेषणात्मक अध्ययनाला सहायक ठरते. अशा प्रकारे परिवर्तित वाक्यसाधक व्याकरण शैलीच्या अभ्यासाला उपकारक व अत्यावश्यक आहे. आता परिवर्तनाच्या ओघात कोणकोणत्या कृती (operations) होतात, ते विचारात घेऊ.

## ७. परिवर्तन-प्रक्रिया

७.१ परिवर्तन-प्रक्रियांच्या स्वरूपांच्या व संख्येच्या बाबतीत व्याकरणशास्त्रकारांत मतभिन्नता आढळून येते. जेकब्ज व रोझेनबॉम ह्यांनी तीन प्रक्रिया मानल्या असून तद्विषयक प्रतिपादन पुढील शब्दांत केले आहे:

"There seem to be at least three different kinds of elementary transformations which can be used in the formulation of a particular transformation :

1. Adjunction, 2. Substitution, 3. Deletion. Within these transformation types there are probably subtypes."[15]

अर्थात वरील दोन विचारवंतांच्या मते कोणत्याही एखाद्या मूळ शब्दसंघटनेचे परिवर्तन होताना संक्षिप्तीकरण, अन्यसमावेशन व वर्जन ह्या तीन प्रक्रियांपैकी एक प्रक्रिया अवलंबिली जात असते.

७.२ ओहमनच्या मते ह्याबाबतीत चार प्रक्रिया संभवतात, त्या अशा :

"There are four possibilities : addition, deletion, reordering and combination."[16]

अर्थात, १. भर घालणे, २. वगळणे, ३. फेरजुळणी करणे व ४. जोडणे ह्या चार प्रक्रियांच्या साहाय्याने परिवर्तने साधता येतात, अशी ओहमनची विचारसरणी आहे. अर्थात त्याने केवळ प्रक्रियांच्या संख्येत भर घातली आहे असे नव्हे तर जेकब्ज-रोझेनबॉमकल्पित प्रक्रियांहून स्वरूपदृष्ट्या वेगळ्या प्रक्रियांचीही कल्पना केली आहे.

७.३ बाकने ह्या संदर्भात पुढीलप्रमाणे विवेचन केले आहे :

"A rule of grammar may perform any of the following operations :

| | | |
|---|---|---|
| deletion | : | $a + b \rightarrow b$ (or $a \rightarrow$ null) |
| replacement | : | $a \rightarrow b$ |
| expansion | : | $a \rightarrow b + c$ |
| reduction | : | $a + b \rightarrow c$ |
| addition | : | $a \rightarrow a + b$ |
| permutation | : | $a + b \rightarrow b + a$[17] |

बाकच्या मते वगळणे, एकाच्या जागी दुसऱ्याची योजना करणे, विस्तार करणे, संक्षेप करणे, भर घालणे व फेरजुळणी करणे अशा एकूण सहा प्रक्रिया शक्य आहेत.

७.४ वरील तीन याद्यांतील सर्वसमान (common) प्रक्रिया विचारात घेता एकूण प्रक्रियांची इंग्रजी आद्याक्षरानुसार सूची खालीलप्रमाणे सिद्ध होते : १. Addition, २. Adjunction, ३. Combination, ४. Deletion,

५. Expansion, ६. Permutation, ७. Reduction, ८. Reordering, ९. Replacement व १०. Substitution.

आता ह्यांचा उदाहरणांसह क्रमशः परिचय करून घेऊ.

**८. Addition = भर घालणे, वाढवणे. ह्या प्रक्रियेची विविध रूपे खालीलप्रमाणे दिसतात.**

८.१ ध्वनिविचलित रूपे – कधी, कुठे, कुणी, असा, तसे, खलास इत्यादी शब्दांची अनुक्रमे कध्धी, कुठ्ठे, कुण्णी, अस्सा, तस्से, खल्लास अशी 'द्वित्व'युक्त रूपे.

८.२ क्रियांची कालदर्शक रूपे – मी जातो → मी जात आहे, मी जात होतो, इत्यादी.

८.३ एकाहून अधिक कर्ते – तो व ती जातात, ते व त्या जात आहेत, इत्यादी.

८.४ पुनरावृत्ती (repetition) ने युक्त शब्दसंघटना – 'तो वाट सापडेपर्यंत भटक भटक भटकला होता.'[18] 'बिशननं उरलेल्या फलंदाजांना चकवत चकवत बाद केलं.'[19] 'त्यामुळे कण-कण, कवडी-कवडी साचवील तोच खरा मंत्री असतो.'[20]

८.५ विशेषणाचे संख्याधिक्य – जो विद्यार्थी चपळ, स्वतंत्र, शोधक बुद्धीचा, उपक्रमशील व उत्साही असतो तो खरा आदर्श विद्यार्थी होय.

८.६ क्रियाविशेषणांचे संख्याधिक्य – 'पतीने आपल्या पत्नीला इतक्या प्रेमाने, कौतुकाने, आनंदाने, जिव्हाळ्याने, रसिकतेने आणि कृतज्ञतेने केलेले असे हृदयंगम लिखाण मराठी वाङ्मयात आम्ही पूर्वी वाचलेले नव्हते.'[21]

**९. Adjunction = जवळ आणून जोडणे. ह्या प्रक्रियेची रूपे अशी :**

९.१ विलीनीकरण— इंग्रजीत do not, does not, is not, must not, I will इत्यादींची क्रमशः don't, doesn't, isn't, mustn't, I'll अशी संक्षिप्त रूपे होतात. मराठीतही बोलीभाषेत व बोलीचा आभास कर्तव्य असता लेखीभाषेत 'करत आहे,' 'आला आहे,' 'नाही आहे' इत्यादी शब्दजोड्या जोडून त्यांची अनुक्रमे 'करताय्', 'आलाय्', 'नाहीये' अशी संक्षिप्त रूपे करण्यात येतात. उदाहरणार्थ,

'आता तू पुढे काय करणारेस?'[22]

'तरी तो सुका तो सुकाच राहिलाय.'[23]

'तू पण बदललायस.'[24]

९.२ श्लेष किंवा शाब्दिक कोट्या

मूळ वाक्ये— आम्ही ज्ञानार्जनासाठी जमिनीवर बैठक मारून बसत

असू. +आमच्या ज्ञानाला भक्कम अधिष्ठान असे. --'आमच्या ज्ञानार्जनाला बैठक असे.'[25] ह्या रूपांतरात 'बैठक' शब्दावर श्लेष आहे.

**१०. Combination = मिश्रणप्रक्रिया. हिची रूपे खालीलप्रमाणे :**

१०.१ नामधातू – उपदेश देणे → उपदेशणे, अनुवाद करणे → अनुवादणे, उत्तर देणे → उत्तरणे, फूल येणे → फुलणे, उजेड फाकणे → उजाडणे, फळ येणे → फळणे इत्यादी.

१०.२ समास – पाणी + वाट → पाणवाट, वाट + गाव → वाटगाव, जळ + कात्री → जळकात्री, गदळ + गाळ → गदळगाळ, वध + वाद → वधवाद, पाठ + भिंत → पाठभिंत, इ.

१०.३ एकाहून अधिक केवल वाक्ये 'आणि' ने जोडणे – सुरेशने कविता म्हटली. + रमेशने कविता म्हटली → सुरेश आणि रमेश यांनी कविता म्हटली.

१०.४ 'आणि' वगळून संयुक्त किंवा मिश्र वाक्य बनविणे – दारावरची घंटा वाजली. + मी दार उघडले → दारावरची घंटा वाजताच मी दार उघडले. नरेश आत आला. + तो आनंदात होता → नरेश आत आला, तेव्हा तो आनंदात होता. मी उद्या नाशिकला जाणार आहे. + तो म्हणाला → मी उद्या नाशिकला जाणार आहे, असे तो म्हणाला.

**११. Deletion = वगळणे, वर्ज्य करणे. ह्या प्रक्रियेची विविध रूपे अशी :**

११.१ शब्दवगळ – माधवला क्रिकेट खेळता येते आणि मनोहरलाही क्रिकेट खेळता येते → माधवला क्रिकेट खेळता येते आणि मनोहरलाही येते. या रूपांतरात 'क्रिकेट खेळता' हे शब्द 'मनोहरलाही' ह्या शब्दानंतर वगळले आहेत.

११.२ आज्ञार्थक वाक्ये – तू खाली बस → खाली बस, तुम्ही विचार करा → विचार करा. ह्या परिवर्तनांत तू व तुम्ही ही सर्वनामे वगळलेली आहेत.

११.३ प्रश्नोत्तरे – प्रश्न– सगळे उतारू चढले?
उत्तर– हां/हो/होय (यात 'सगळे उतारू चढले' हे संपूर्ण वाक्य वगळले.)
प्रश्न– हे पुस्तक वाचले का?
उत्तर– नाही ('हे पुस्तक वाचले' हे संपूर्ण वाक्य वगळले.)

११.४ सूचनाफलक – उदाहरणार्थ, स्टेशनकडे → (= हा रस्ता स्टेशनकडे

जातो.)

पुणे ५० कि.मी. → (= येथून पुणे ५० किलोमीटर अंतरावर आहे.)

**१२. Expansion = विस्तार. ह्या प्रक्रियेची स्वरूपे अशी :**

१२.१ विधेयविस्तार – तो घरी गेला → तो काल गाडीत बसून घरी गेला.

१२.२ वेगळी वाक्ये करणे – सुनीलच्या गैरवर्तनामुळे त्याच्या आई-वडिलांना आणि शिक्षकांनाही काळजी वाटत असे → सुनीलच्या गैरवर्तनामुळे त्याच्या आई-वडिलांना काळजी वाटत असे. तशीच शिक्षकांनाही वाटत असे.

१२.३ उपमाप्रभृती अलंकार योजणे – त्याने कमालीच्या बेफिकिरीने माझे तोंड रंगवले (ह्या मूळ आशयाचे परिवर्तन →) 'गाडगे रंगवावे इतक्या बेफिकिरीने माझे तोंड रंगवून टाकले'[25]

(मूळ आशय–) तो ग्रामोफोनच्या तबकड्या भराभर तयार करून फेकायचा.

परिवर्तन → 'सराईत सुगरणीने भराभर पुऱ्या तळून टाकाव्या तशा तो ग्रामोफोनच्या तबकड्या तयार करून फेकायचा.'[26]

१२.४ साहित्यिक संदर्भोल्लेख – माझ्या आईने स्वतःच्या वाट्याला आलेल्या अर्ध्या इस्टेटीचा त्याग केला, ह्या मूळ आशयाचे परिवर्तन → 'माझी आई काही पंडिता नव्हती, सर्वनाशही ओढवलेला नव्हता, तरी आपल्या वाट्याला आलेली ही अर्धी इस्टेट तिनं आनंदानं त्यजिली.'[27]

ह्या परिवर्तनात 'सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डितः।' ह्या पंचतंत्रातील (५.४२) श्लोकार्धाचा प्रच्छन्न उल्लेख आहे.

१२.५ अवतरणे – जयवंत दळवी यांच्या 'सारे प्रवासी घडीचे'-मधील खालील उद्धरण वाचा :

"इतर वेळी ओव्या, श्लोक, अभंग, आर्या मुखी घोळवीत ते घरातल्या घरात फिरत असत.

"दयाब्द वळशील तू तरि न चातका सेवका।
उणे किमपि, भाविका उबगशील तू देव का।''[28]

लेखकाने बागाइतकर मास्तर नावाच्या पात्राच्या तोंडी मोरोपंतांच्या केकावली नामक प्रसिद्ध भक्तिकाव्याच्या विसाव्या श्लोकाचे पहिले दोन चरण घातले आहेत. अशा प्रकारे 'इतर वेळी...' इत्यादी वाक्यातील आशय विस्तार पावला आहे.

**१३. Permutation = रचनेची विविधता. ह्या प्रक्रियेची विविध रूपे अशी :**

१३.१ समानान्तर शब्दसंघटना – ह्यांचे अर्थसाम्यावर आधारित आणि

अर्थवैषम्यावर आधारित असे दोन प्रकार असतात. त्यांची उदाहरणे क्रमश: विचारात घेऊ.

अर्थसाम्यनिष्ठ – (मूळ आशय →) पुणतांब्यात जाणता वैद्य नव्हता की शहाणा डॉक्टर नव्हता.

परिवर्तित वाक्य → 'पुणतांब्यात ना जाणता वैद्य ना शहाणा डॉक्टर.'[२९]

अर्थवैषम्यनिष्ठ – (मूळ आशय →) इमारत बांधणारा जमिनीपासून वरवर तर खड्डा खोदणारा जमिनीच्या खालीखाली जात असतो.

(परिवर्तित वाक्य →) 'इमारत बांधत असतो तो वर चढत असतो, खड्डा खोदत असतो तो खाली जात असतो.'[30]

ज्याप्रमाणे दोन समांतर (parallel) ओळींतील अंतर नेहमीच सारखे असते आणि त्या ओळी एकमेकींना कधीही भिडत नाहीत, त्याप्रमाणे प्रस्तुत समानान्तर शब्दसंघटनांतील शब्दसंख्या समान असते, त्यामुळे त्या शब्दसंघटना समांतर ओळींप्रमाणे भासतात. वरीलपैकी अर्थवैषम्यनिष्ठ परिवर्तित वाक्य खालील पद्धतीने लिहिले की हे तथ्य जाणवेल :

'इमारत बांधत असतो तो वर चढत असतो, (७ शब्द)
खड्डा खोदत असतो तो खाली जात असतो.' (७ शब्द)

**१४. Reduction = घटवणे, कमी करणे, उणे करणे. ह्या प्रक्रियेची रूपे येणेप्रमाणे :**

१४.१ शब्दसंख्या कमी करणे

(मूळ आशय →) वर्णन करता येणार नाही इतका आंबा गोड आहे. (शब्दसंख्या ८)

(परिवर्तित वाक्य →) आंब्याची गोडी वर्णनातीत आहे. (शब्दसंख्या ४)

(मूळ आशय →) तो मनुष्य खोटारडा आहे, ह्याबाबतीत तिळमात्र संशय नाही. (शब्दसंख्या ८)

(परिवर्तित वाक्य →) तो मनुष्य नि:संशय खोटारडा आहे. (शब्दसंख्या ५)

(मूळ आशय →) ह्या झाडाला फुले येतील अशी खात्री नाही. (शब्दसंख्या ७)

परिवर्तित वाक्य →) हे झाड कदाचित फुलेल. (शब्दसंख्या ४)

**१५. Reordering = प्रयोगात किंवा शब्दक्रमात बदल करणे. ह्या प्रक्रियेची रूपे अशी :**

१५.१ कर्तरीचा कर्मणी प्रयोग – उदाहरणार्थ

तो ग्रंथ लिहीत आहे → त्याच्याकडून ग्रंथ लिहिला जात आहे.

१५.२ शब्दक्रम-विपर्यय – (मूळ आशय →) त्या डुलांमुळे त्या वेषभूषेला एक आगळी शोभा आली. (परिवर्तित वाक्य →) 'त्या वेषभूषेला एक आगळी शोभा आली त्या डुलांमुळे.'[31] अशा परिवर्तित शब्दसंघटनेला inversion म्हणतात. मूळच्या वाक्यातील 'त्या डुलांमुळे' हे वाक्यारंभीचे शब्द परिवर्तित वाक्यात वाक्याच्या अखेरीस योजले आहेत.

**१६. Replacement = समानार्थक शब्दसंघटनांची योजना करणे. ह्या प्रक्रियेची रूपे अशी :**

१६.१ समानार्थक शब्दाची योजना
(मूळ वाक्य →) तो अध्यापन करीत आहे.
(परिवर्तित वाक्य →) तो शिकवीत आहे.

१६.२ समानार्थक शब्दसंघटनांची योजना
(मूळ परिच्छेद →) यत्नदेवाची कृपा झाली की, दुबळ्यांचे बळवंत होतात. यत्नदेवाची कृपा झाली की, लहानांचे थोर होतात. यत्नदेवाची कृपा झाली की, निष्क्रियांचे सक्रिय होतात. यत्नदेवाची कृपा झाली की, अभागी लोक सुदैवी होतात. यत्नदेवाची कृपा झाली की, अडाण्यांचे शहाणे होतात.
(परिवर्तित परिच्छेद →) "यत्नदेवाचा प्रसाद झाला म्हणजे दुर्बळांचे सबळ होतात. यत्नदेवाची कृपा झाली म्हणजे लहानांचे थोर होतात. यत्नदेवाची तृप्ती झाली, की करंट्यांचे कर्तबगार होतात. यत्नदेवाचा वरदहस्त डोक्यावर पडला, की भाग्यहीनांचे भाग्यवंत होतात. यत्नदेवाचा संतोष झाला की अज्ञानांचे सज्ञान होतात..."[32]

**१७. Substitution = एकाबद्दल दुसरे योजणे. येथे समानार्थकत्वाचा काटेकोर आग्रह नसतो. ह्या प्रक्रियेची रूपे अशी :**

१७.१ एकाबद्दल दुसरे
(मूळ →) रमेशने गुंडाला बदडले. (परिवर्तन →) रमेशने कुत्र्याला बदडले.

१७.२ उत्तरगर्भ प्रश्न योजणे
विधानस्वरूपी आशय → हा उघड उघड पंक्तिप्रपंच आहे.
उत्तरगर्भ प्रश्न → 'हा उघड उघड पंक्तिप्रपंच नाही काय?'[33]

१७.३ नकारात्मक वाक्यरचना
होकारात्मक मूळ वाक्य → आम्हांला शिस्त अवश्य होती.
नकारात्मक परिवर्तन → 'आम्हांला शिस्त नव्हती असे नव्हे.'[34]

१७.४ वाक्प्रचाराची योजना
मूळ आशय → तिच्या घरातल्या माणसांना आजोबांच्या रूपाने अगदी अकल्पित लाभ झाला.
परिवर्तित वाक्य → 'तिच्या घरातल्या माणसांना आजोबांच्या रूपानं नागवं कोल्हंच भेटलं.'[35]

१७.५ रूपकात्मक रचना
मूळ आशय → चित्रण मोठ्या प्रमाणावर व झपाट्याने होऊ लागले.
परिवर्तित वाक्य → 'चित्रणाच्या कामाला पूर आला.'[36]

१७.६ मानुषीकरण (Personification)
मूळ आशय → वाद्ये वाजायची थांबतात.
परिवर्तित वाक्य → 'वाद्ये मुकी होतात.'[37]

१७.७ अन्यधर्मारोप = एका इंद्रियाची अनुभूती दुसऱ्या इंद्रियाला येत असल्याचे वर्णन करणे, अचेतनाला चेतन रूप बहाल करणे, अमूर्ताचे मूर्त स्वरूपात रूपांतर करणे किंवा चेतन वस्तू जड असल्याचे दर्शविणे. उदाहरणार्थ,
मूळ आशय → व्यास नदीचे पाणी चिंचोळ्या दरीतून खळखळाट करीत वाहते.
परिवर्तित वाक्य → 'चिंचोळ्या दरीतून अंग घासटीत कात टाकीत व्यास नदी खळखळते.'[38]

१८. **सर्जनशील साहित्यिकाला आपले मनोगत रमणीय व संस्मरणीय** (memorable) बनविण्याची आकांक्षा असते. त्यासाठी त्याला वर वर्णिलेल्या दहा प्रक्रियांच्या आधारे परिवर्तित वाक्ये सिद्ध करून आपल्या लेखनात ती योजावी लागतात. ललित लेखकाला परिवर्तित वाक्यसाधक व्याकरणाच्या साहाय्याने रूपांतरित वाक्ये सिद्ध करता येतात. शैलीच्या अभ्यासकाला सदरहू व्याकरणाच्या अभ्यासाच्या साहाय्याने, ललित लेखकाने सिद्ध केलेल्या रूपांतरित वाक्यांचे, पद्धतशीर विश्लेषण करता येते; लेखन शैलीसंपन्न आहे की नाही ह्याचा साधार निर्णय करता येतो; लेखक कोणत्या परिवर्तन-प्रक्रिया प्रभुत्वाने व प्राचुर्याने हाताळतो ते संख्यात्मक मोजणी करून निश्चित करता येते व त्या मोजणीच्या आधारे लेखकाच्या शैलीला योग्य नामाभिधान देता येते. यावरून हे लक्षात येते की, प्रस्तुत परिवर्तित वाक्यसाधक व्याकरण शैलीसंपन्न ललित साहित्याच्या 'जनका'ला जितके उपयुक्त व अत्यावश्यक आहे तितकेच ते त्या साहित्याच्या विश्लेषणात्मक 'अभ्यासका'लाही उपयुक्त व अत्यावश्यक आहे.

□□

# संदर्भटीपा


१. R. Ohmann, 'Generative Grammars and the Concept of Literary Style,' Contemporary Essays on Style, ed., G.A. Love and M. Payne, Chicago, Scott, Foresman and Company, 1969, p. 140.

२. तुळा— "The encoder makes a choice of the type of sentence to suit the kind of meaning he wants to express. And he has to use one particular kind of sentence-form to do this." A.E. Darbyshire, A Grammar of Style, London, Andre Deutsch, 1971, p. 67.

३. सुनील गावसकर, सनीडेज (एक आत्मचरित्र), अनु. बाळ ज. पंडित, द्वितीयावृत्ती, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, १५-८-१९७९, पृ. १७७.

४. संदर्भटीप २, पृ. ८४.

५. तत्रैव, पृ. ८६.

६. तत्रैव, पृ. ५९.

७. E. Bach, An Introduction to Transformational Grammars, New York, Holt, Rinehart and Winston, Inc., 1964, p. 13.

८. K. W. Hunt, 'How Little Sentences Grow into Big Ones,' संदर्भटीप ७, पृ. १७१.

९. R. Ohmann, 'Generative Grammars and Concept of Literary Style,' Readings in Applied Transformational Grammar, ed., M. Lester, New York, Holt Rinehart and Winston, Inc., 1970, p. 125.

१०. R. A. Jacobs and P. S. Rosenbaum, English Transformational Grammar, Waltham, Blaisdell Publishing Company, 1968 [Blaisdell International Edition], p. 17.

११. तत्रैव, पृ. २३.

१२. तत्रैव, पृ. ७४.

१३. संदर्भटीप ९, पृ. १२६.

१४. तत्रैव, पृ. १३९.

१५. संदर्भटीप १०, पृ. २६.

१६. संदर्भटीप ९, पृ. १३५.

१७. संदर्भटीप ७, पृ. ७०.

१८. व्यंकटेश माडगूळकर, करुणाष्टक, मुंबई, मॅजेस्टिक बुक स्टॉल, सप्टेंबर १९८२, पृ. ९३.

१९. संदर्भटीप ३, पृ. २२६.

२०. आनंद साधले, हितोपदेश १, मुंबई, मॅजेस्टिक, जून १९८१, पृ. ९१.

२१. प्र. के. अत्रे, गुद्दे आणि गुदगुल्या, मुंबई, डिव्हाईन, १३-८-१९८०, पृ. १००.

२२. जयवंत दळवी, स्वगत, दुसरी आवृत्ती, मुंबई, मॅजेस्टिक बुक स्टॉल, जुलै १९८१, पृ. १७३.

२३. दि. बा. मोकाशी, आम्ही मराठी माणसं, पुणे, उत्कर्ष प्रकाशन, १-५-१९८१,

पृ. ४५.
२४. 'रुक्मिणी,' अक्षर दिवाळी १९८०, संपा. य. दि. फडके व इतर, पुणे, विश्वकर्मा साहित्यालय, २ मे, १९८१, पृ. ४१.
२५. ग. दि. माडगूळकर, वाटेवरल्या सावल्या, पुणे, विश्वमोहिनी प्रकाशन, १४ डिसेंबर १९८१, पृ. १७.
२६. सी. रामचंद्र, माझ्या जीवनाची सरगम, पुणे, इनामदार बंधु प्रकाशन, १२-१-१९७७, पृ. ८०.
२७. संदर्भटीप १८, पृ.१४.
२८. जयवंत दळवी, सारे प्रवासी घडीचे, तृतीयावृत्ती (महाविद्यालयीन), मुंबई, मॅजेस्टिक, जून १९७४, पृ. २३.
२९. संदर्भटीप २६, पृ. ४८.
३०. संदर्भटीप २०, पृ. ७५.
३१. दुर्गा खोटे, मी दुर्गा खोटे, मुंबई, मॅजेस्टिक बुक स्टॉल, १४-१-१९८२, पृ. ४५.
३२. दत्तो वामन पोतदार, 'यत्नदेवाचा महिमा', कुमारभारती- इयत्ता आठवी, पुणे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षा मंडळ, १९७६, पृ. ५२.
३३. पु. भा. भावे, वाघनखें, पुणे, देशमुख आणि कंपनी, जून १९६१, पृ. ३९.
३४. संदर्भटीप ३१, पृ. ११.
३५. श्री. ज. जोशी, जोशीपुराण, पुणे, श्रीविद्या, १-८-१९८२, पृ. १९८.
३६. संदर्भटीप २५, पृ. ७७.
३७. संदर्भटीप २६, पृ. ८०.
३८. वसंत बापट, बारा गावचं पाणी, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९६६/१८८७, पृ.९.

❑❑❑

# ४.

# वाग्वैजयंतीची भाषा : एक नमुना पाहणी *

१. साहित्यिक गडकरी यांची तीन रूपे रसिकांसमोर आहेत : (एक) नाटककार राम गणेश गडकरी, (दोन) विनोदी गद्यलेखक बाळकराम व (तीन) कवी गोविंदाग्रज. ही तिन्ही रूपे आपापल्या परींनी वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळे संस्मरणीय आहेत. गोविंदाग्रजांची कविता 'वाग्वैजयंती'[1] व 'अप्रकाशित गडकरी'[2] ह्या दोन प्रसिद्ध संकलनांत उपलब्ध आहे. प्रस्तुत लेखात फक्त 'वाग्वैजयंती'वर लक्ष केंद्रित करावयाचे आहे. वाग्वैजयंती हा कवितासंग्रह आहे. कवितेची भाषा व गद्य साहित्याची भाषा ह्यांच्या परस्परसंबंधांबद्दल पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये मतभेद आढळून येतात. वर्डस्वर्थ[3] सारखे कवी आणि श्रीमती इझाबेल हंगरलँड (Mrs. Isabel Hungerland)[4] प्रभृती समीक्षक यांच्या मते गद्य व छंदोबद्ध पद्य यांच्या भाषेत मूलत: फरक काहीही नाही, तर ग्रे[5] कवी, आय्. ए. रिचर्डस्[6] इत्यादी विचारवंतांची अशी दृढ धारणा आहे की, कवितेची भाषा गद्याच्या भाषेहून स्पष्टपणे भिन्न असते. रॉडवे[7] (Rodway), मुकारोव्हस्की[8] (Mukarovsky), नोवॉटनी (Nowottny)[9] इत्यादी काव्यमीमांसकांनी कवितेच्या भाषेचा विश्लेषणात्मक अभ्यास करून असा निष्कर्ष काढला आहे की, कवितेची भाषा ही परिचित प्रमाणभाषेहून सर्वथा निराळी नसते, हे जसे खरे आहे, तसेच ती भाषा परिचित प्रमाणभाषेचाच एक नमुना (brand) देखील नसते, हेही तितकेच खरे आहे. ह्या तिसऱ्या पक्षाचेच म्हणणे बुद्धीला अधिक पटते. त्याच्या अनुरोधाने वाग्वैजयंतीच्या भाषेची अल्पशी विश्लेषणात्मक पाहणी करू.

---

* पूर्वप्रसिद्धी — 'गोविंदाग्रज-समीक्षा', १९८५, पृ. १८९-१९५

२. "अशा विचारे देवापाशी। मागति कधि ही दृष्टि न खाशी।
काय म्हणावे या मूर्खांशी। प्रभो संभाळ। तूच ही आंधळी माळ।।"[10]

ह्या पद्यपंक्तींतील प्रत्येक शब्दाशी आपला परिचय आहे. हे सर्व शब्द दैनंदिन संभाषणात, तसेच जाणीवपूर्वक केलेल्या भाषणात व लिखाणात वापरले जातात. त्यांचे अर्थ आपल्याला अवगत आहेत. परंतु वरील पद्यात हे शब्द पाच तुकड्यांच्या बंदिस्त चौकटीत वापरलेले आहेत. ही चौकट म्हणजेच एक योजना किंवा scheme आहे. संभाषणात किंवा गद्य लिखाणात अशी योजना किंवा scheme नसते. तेव्हा scheme हे कवितेच्या भाषेच्या पृथक्त्वाचे पटकन लक्षात येणारे पहिले कारण आहे. दुसरे कारण म्हणजे वरील शब्दांची एक विशिष्ट संघटना किंवा रचना (pattern) आहे. एक तर पहिल्या तीन चरणांचे व शेवटच्या दोन चरणांचे यमक जुळविलेले आहे. शिवाय संभाषणात किंवा गद्य लिखाणात, 'ते ह्या विचाराने देवापाशी कधीही दृष्टी मागत नाहीत,' किंवा 'प्रभो, तूच ही आंधळ्यांची माळ सांभाळ' ह्या स्वरूपाची वाक्यरचना झाली असती. वरील कवितेत कवीने ह्याहून वेगळा शब्दानुक्रम अनुसरला आहे. म्हणजेच कवितेतील शब्दानुक्रम हा संभाषणातील व/वा गद्यातील शब्दानुक्रमाहून भिन्न असतो. तिसरे गद्य-पद्य-भेदक तत्त्व जाणवते ते असे की, संभाषणात व/वा गद्यात आपण रूढीस धरून 'विचाराने', 'मागत नाहीत कधीही', 'मूर्खास' अशी शब्दरूपे वापरली असती. वरील कवितेतील विचारे, न मागति कधि, मूर्खांशी ही रूपे रूढीस सोडून आहेत. कविता व गद्य यांमधील चौथे भेदक तत्त्व लक्षात येते ते असे की, आंधळ्यांची माळ हा वाक्प्रचार प्रचलित व प्रसिद्ध आहे. त्यांतील 'आंधळ्यांची' हा शब्द माळेची निश्चिती करून तिच्याविषयी विशेष माहिती सांगतो; ती 'फुलांची माळ' नाही हेही सुचवितो. परंतु 'आंधळी माळ' या कविकृत प्रयोगातील 'आंधळी' हे विशेषण वरील संदर्भात अप्रचलित असल्यामुळे ते वाचून सुरुवातीस काहीसा धक्का बसतो, पण थोडा विचार केल्यानंतर सहृदयाच्या अंत:करणाची कालवाकालव होते. असा अनुभव 'आंधळ्यांची माळ' ह्या रूढ शब्दसंहतीच्या बाबतीत येत नाही. वरील कविता गेय आहे, हे तिचे संभाषणाहून व/वा गद्य लिखाणाहून आणखी एक निराळेपण आहे. एकंदरीने, कवितेची भाषा नित्याच्या परिचित (म्हणजेच प्रचलित) भाषेपासून काही बाबतींत दूर सरकलेली असते. किंबहुना ती तशी हेतुपूर्वक बनविलेली असते. कवीला सौंदर्यनिर्मिती साधून रसिक वाचकाला 'विशेष प्रकारचा आनंद' द्यावयाचा असतो. म्हणून कवी, मुकारोव्हस्कीच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे, 'intentional violation of the norm of the standard'[11] करीत असतो. ह्यालाच विचलन किंवा deviation असे म्हणतात. परंतु कवितेच्या संदर्भात होणारे असे deviation आपल्याला खटकत नाही. नोवॉटनी ही विदुषी स्पष्टपणे म्हणतेच, "Such a deviation from the language of common life

does not strike us as eccentric or affected when we encounter it in a poem."[12] ह्या दृष्टीने 'वाग्वैजयंती'चा थोडा अधिक विचार करू.

३. येथे प्रारंभीच हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की, समग्र 'वाग्वैजयंती'चा विचार प्रस्तुत लहानशा लेखात अभिप्रेत नाही; तसा तो करणे शक्यही नाही. वाग्वैजयंतीमधील प्रत्येक पद्यपंक्तीचे विश्लेषण करणे हे दीर्घकालीन उद्योगाचे काम आहे. म्हणूनच वाग्वैजयंतीच्या १ ते ३० व २०१ ते २०७ एवढ्याच पानांचे पृथक्करण खाली सादर केले जात आहे. ते निर्णायक आहे, असे नाही; हा एक अल्पसा प्रयत्न आहे. म्हणूनच लेखाला एक नमुना पाहणी असे शीर्षक दिले आहे. ह्यापुढील भागात शब्दरूपी किंवा पंक्तिरूपी अवतरणानंतरच्या कंसात दिलेले आकडे हे वाग्वैजयंतीचे पृष्ठांक आहेत.

४. काही शब्द गद्य संभाषणात किंवा गद्य लिखाणातच वापरले जातात, ते कवितेत वापरण्याची प्रथा सामान्यपणे नाही. पण गोविंदाग्रजांनी असे काही शब्द कवितांत सर्रास वापरले आहेत. उदाहरणार्थ, 'अगदिच गैर!' (६), 'हीच वासना सामान्यांची धावे' (९), 'परि जगणे ही मुदत ठरविली' (९), 'विश्रांतीचा मुक्काम' (९), 'उन्हाळ्यासाठी पाणी' (१०), 'किंवा केल्या' (२४), 'प्रेतांचा चौपदरी सूरज' (२५), 'तुटकी प्रेते' (२५), इत्यादी. ह्या शब्दप्रयोगांमुळे त्या-त्या ठिकाणी कवितेला गद्याची कळा आली आहे.

५. 'राम' जाणतो 'क्या है अंदर' (३०), 'कन्हय्या! बजाव बजाव मुरली!' (१०२) ह्या दोन स्थळी हिंदी व 'श्री फर्ग्युसन मंदिरि' (२०३) ह्या स्थळी इंग्रजी शब्दप्रयोग झाले आहेत. ह्यांपैकी हिंदी शब्दप्रयोग मराठीशी एकजीव झाले आहेत, पण इंग्रजी शब्द मात्र पंगतीतील अनाहूत पाहुण्यासारखा खटकतो.

६. मराठी भाषा संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश इत्यादी पायऱ्या ओलांडून आकाराला आलेली असल्यामुळे तिच्यात संस्कृत शब्दांचे स्वाभाविकपणे वैपुल्य आहे. 'रामवाणी'त (२०४) देखील संस्कृत शब्दांचे व संस्कृत व्याकरणानुसारी लकबींचे अस्तित्व स्पष्टपणे जाणवते. प्रथमत: उक्तरोक्त वैशिष्ट्यांची उदाहरणे अवलोकू. संस्कृतात विशेष्य व विशेषण एकाच विभक्तीत असतात. वाग्वै-जयंतीतही 'वश्या गी' (३), 'धन्या कविता' (३), 'बालरूपा प्रतिमा' (१०), 'जिज्ञासा अधिका' (४) इत्यादी स्थळी संस्कृतसदृश शब्दरचना आढळतात. जरी त्या वृत्ताच्या सोयीसाठी झालेल्या असल्या तरी त्या 'अमराठी' अवश्य वाटतात. 'घ्या मग सुखेन आराम' (४) ह्यातील सुखेन शब्द काव्य म्हणतेवेळी सुखे व न असा तुटला तर अर्थहानी होण्याची धास्ती आहे. 'निजमित्र मेघ

पाठविला' (२) ही वाक्यधाटणी संस्कृतसमान आहे. आता केवळ संस्कृत शब्दावली अवलोकू. गर्भावना (१), तारकातति (१), गिरिराज श्वशुरसदनाला (२), सागरभाजा (३), शिवगिरिजादर्शनमुदिता (३), सत्सुमदाम (५), तद्वचनपथक्रमणा (५), शशि भगणीं मन करणी (५), भगवज्जनकंकणांत (५), यशोभा (७), धवाननालोकन (१०), सत्कृतिसंघवृष्टिकरणी (१२), गंगायामुन (१२), सुरक्तधवला मंत्राक्षता अक्षता (१२), कुसुमचापपाशा (१३), चित्तगीतापुढे (२०३), असे कित्येक सामासिक संस्कृत शब्द दृग्गोचर होतात. एक तर ह्यांच्या आधिक्यामुळे कविता 'जड' झाली आहे आणि दुसरे म्हणजे ती अस्सल मराठीपण काही अंशी गमावून बसली आहे. शिवाय काही ठिकाणी ती अर्थदृष्ट्या दुर्बोध झाली आहे. वरीलपैकी काही शब्द संस्कृत न जाणणाऱ्याच्या अर्थाकलनाला प्रतिबंधक ठरतात.

७. 'बहिरासहिरा होतो जीव' (१८) व 'भुरक्यागहिऱ्या गोऱ्यामोऱ्या... काळोखाच्या दोऱ्या' (२२) ह्या अभ्यस्त शब्दांपैकी बहिरासहिरा हा शब्द श्रवणसुखद व जीवस्थितीचे यथावत वर्णन करणारा आहे. पण काळोखाच्या दोऱ्या 'गोऱ्यामोऱ्या' कल्पनेतही संभवत नाहीत. म्हणजे ही ध्वन्यावृत्ती केवळ नादाच्या हव्यासाखातर झालेली आहे, ती अर्थपोषक नाही.

८. कवी शब्दरूपांची पुनरुक्ती करून एखाद्या मनोगतावर जोर देतो, एखादा आशय वाचकाच्या मनावर ठसवतो किंवा एखादा आशय संस्मरणीय करतो. अशा पुनरुक्तीला परिवर्तित वाक्यसाधक व्याकरणाच्या परिभाषेत addition operation असे म्हणतात.[१३] भाषेच्या ह्या सामर्थ्याची जाणीव गोविंदाग्रजांना अवश्य होती, हे पुढील उदाहरणांवरून स्पष्ट होते : 'काठी टेकित टेकित' (२), 'देवल ते देवल' (३), 'ज्या हीन हीन म्हणति' (५), 'जा, जा, जा, तोवरि खेळ' (६), 'चमकत चमकत तिकडे जाई' (६), 'धो धो धो धो ओघचि सारा' (१५), 'शांत शांत मग जिकडे तिकडे' (२३), 'नको नको आम्हांस' (२५), 'नवी नवी देई शोभा' (२०५) इत्यादी. (तुळा, मागील पृ. ४१)

९. ह्याच संदर्भात आणखीही एका शब्दविन्यासाचा विचार करणे सुसंगत ठरेल. कवी कधीकधी एकच अर्थ निरनिराळ्या शब्दांत अभिव्यक्त करून रचनेला वाचनीयता प्राप्त करून देतो. वाग्वैजयंतीतील 'वेद पुराणे नच पढलासी! न्याय, तर्कही नच शिकलासी' (७) ह्या एकामागोमाग येणाऱ्या पंक्तींत क्रियांच्या अर्थांचे साम्य आहे, पण ते समानार्थकत्व भिन्न शब्दांनी व्यक्त केले गेले आहे. कवीने पहिल्या चरणात पढलासी शब्द योजिला आहे आणि दुसऱ्या चरणात तत्समानार्थक शिकलासी शब्द वापरला आहे. त्यायोगे रचनेत कंटाळवाणेपणा

न येता विविधता आली आहे. ह्या प्रक्रियेला replacement operation[14] म्हणतात. (मागील पृ. ४५ पाहा.)

१०. काव्य हे कवीने वाचावयाचे किंवा गावयाचे आणि रसिकांनी ऐकावयाचे असते. त्यामुळे कवितेच्या शब्दावलीचा परिणाम कानाच्या मार्गे मनावर होत असतो. कानांवर लयबद्ध किंवा समतोल अशी शब्दरचना पडली की रसिक मान डोलावू लागतो. समानान्तर शब्दयोजना करून कवीला हा परिणाम साधता येतो. त्यासाठी कवीचा स्वत:चा 'कान' तयार असावा लागतो. गोविंदाग्रजांचा तसा तो होता ह्याचे प्रत्यंतर खालील पंक्तींवरून येते :

'श्रद्धा साधुजनी, न या गुरुजनी' (१२), 'नच रिझवाया, नच खिजवाया' (१६), 'कोणी निजले, कोणी मेले' (१९), 'दूर कराया-दूर हराया' (२२), 'भयाण जागी, भयाण काळी' (२४), 'शांत रसाचा एकांताचा! स्वानुभवाचा वैराग्याचा' (२३) ह्या व अशा शब्दसंघटनांत कधी अर्थाची समता असते, तर कधी विषमता असते. ह्या प्रक्रियेला permutation[15] असे म्हणतात. (मागील पृ. ४३-४४ पाहा.)

११.१ कोणत्याही भाषेची अन्त:सामर्थ्ये अक्षरश: अगणित असतात. ती लुटण्याची मुभा साहित्यिकाला असते. असे एक सामर्थ्य म्हणजे अन्तर्निविष्ट शब्दरचना करणे हे होय. उदाहरणार्थ, 'This', he said, 'will work' हे वाक्य He said , 'This will work' ह्या वाक्यापेक्षा निश्चितपणे ठसठशीत व लक्षात राहणारे आहे. ते तसे होण्याचे कारण म्हणजे he said हे दोन शब्द एका बाजूला This आणि दुसऱ्या बाजूला will work ह्या दोहोंच्या मध्ये निविष्ट केले आहेत. गोविंदाग्रजांना ह्या भाषिक युक्तीचे भान आहे, हे पुढील शब्दरचनांवरून जाणवते.

'ऐकुनि, काळा! थांब जरा' (२०१), 'मित्रा ही कविता-न गद्य-इजला निर्बंध कैचा बरे?' (वाचकांस विज्ञापना), 'उडुन जा स्वैर। काजव्या, चमक बाहेर' (६), 'मानवी कावा। वेड्या, तुज नाही ठावा' (७), 'वेडा, वाटे तरी, म्हणा' (९), 'सकल जन तरी। तुजसि मम तनया। शिरि धरितिल हारासम या' (४) अशा प्रकारच्या शब्दयोजनेला reordering[16] असे म्हणतात. (मागील पृ. ४४-४५ पाहा.)

११.२ ह्या प्रक्रियेचे आणखी एक रूप म्हणजे काव्यगत वाक्याच्या शब्दांच्या अनुक्रमात छंदाच्या बंधनास अनुसरून होणारे परिवर्तन हे होय. ह्याचेही दोन पोटभेद पडतात. एक पोटभेद असा की, गद्यातल्याच शब्दांचा क्रम बदलला की त्यांचे पद्यात रूपांतर होते. उदाहरणार्थ, 'म्हणून सांगतो हुकूम माझा ऐक' (२०२), 'नको करू वृथा त्वरा' (२०२), 'आनंदाची माया हासत खेळत कुठेच का

नाही?' (२०२), 'म्हणतात झोप आली शिक्षा ऐकिली तरी त्वरित ज्यास' (२०३), 'क्षणार्धात चिद्वृत्ति ही रंगली' (२०३), 'क्षणार्धात झाली समाधिस्थ ही' (२०४), 'तारांची राणी हसरी' (२०४), 'काय जाणतो तो त्यांना' (२०५), 'बोलू काय अधिक मी?' (३), 'दु:ख बिलगते थेट जिवाला' (९), 'भक्कम दगडांचे धरण बांधून' (१०), 'फुले कालची काळवंडली' (२१), इत्यादी रचनांतील शब्दांची डावीकडे-उजवीकडे अशी थोडी फिरवाफिरव केली की त्यांचे गद्यांत रूपांतर होते. (कवीने गद्याचे पद्यात परिवर्तन साधलेले असते.)

११.३ प्रस्तुत प्रक्रियेचा दुसरा पोटभेद असा की, शब्दांच्या रूपांना पद्यानुरूप मुरड घातलेली असते. पण तेवढे रूपपरिवर्तन सोडल्यास प्रयुक्त पद्यपंक्तीच्या आधारे गद्य विधानाची प्राप्ती करता येते. (कवीने गद्याचे पद्यात रूपांतर साधलेले असते). उदाहरणार्थ, 'वंदावा न कसा म्या?' (५), 'ही षोडश कुसुमे निजवासे निशिदिनि करोत शुद्ध मला' (६), 'मिरवाया मी म्हणुनी लाजे' (६), 'हे वेड तुझ्या मनि सारे' (६), 'तुज बघुनी वाटते की' (८), 'प्रकार सारा कळे तयाला' (२), 'म्हणुनिच दिसते ते ते पटते' (१९), इत्यादी.

१२. कवींच्या भाषेसंबंधी रॉडवेने असे एक निरीक्षण नोंदले आहे की, कवीने काही शब्द जाणूनबुजून वगळलेले असतात, रसिकाने त्यांची कल्पना करून अर्थ समजून घ्यावयाचा असतो.[17] वाग्वैजयंतीत ही प्रवृत्तीदेखील दृष्टिगोचर होते. उदाहरणार्थ, 'जाशिल कोठे सांग पुढे' (२०२), 'म्हणतात झोप आली' (२०३), 'विचारांतरी लीन वीणावती' (२०३), 'असेल त्याचा गर्व धरावा' (७) ह्या चरणांत अनुक्रमे ते, असे, झाली आणि आपल्यापाशी ह्या शब्दांचा अध्याहार करावा लागतो.

१३. ह्याखेरीज वाग्वैजयंतीत ऐकुनि-म्हणुनि-टाकुनी-प्रभृती 'ऊन' प्रत्ययान्त शब्द, करि-फोडिसी-जाहले-न करी-प्रभृती क्रियापदरूपे, तेचि-परि-वरूनी-प्रभृती अव्यये आणि तव-मज-त्याते-त्वां प्रभृती सर्वनामरूपे प्राचुर्याने आढळून येतात. त्यांचा वापर फक्त छंदोबद्ध कवितेतच होत असतो, ही गोष्ट सर्वपरिचित आहे.

येथवर गोविंदाग्रजांच्या वाग्वैजयंतीच्या भाषेची एक धावती पाहणी केली. ह्याच पद्धतीने सूक्ष्म व सविस्तार अभ्यास केल्यास गोविंदाग्रजांच्या काव्याच्या भाषेची आणखी अनेक वैशिष्ट्ये दृष्टोत्पत्तीस येतील. तरीदेखील तिचे यच्चयावत पैलू हस्तगत झाले असे म्हणता येणार नाही. ह्याचे कारण नोवॉटनीच्या पुढील शब्दांत नमूद करून हा लेख संपवू : "...Poetry is language at full stretch, bringing into maximal interplay the various potentialities afforded by linguistic forms in artistic structures."[18]

□□

# संदर्भटीपा


१. गोविंदाग्रज, वाग्वैजयंती, सहावी आवृत्ती, पुणे, मॉडर्न बुक डेपो, १९५५.
२. अप्रकाशित गडकरी, संपा. प्र. के. अत्रे, प्रथम, मुंबई, ह. वि. मोटे प्रकाशन, २३-१-१९६२.
३. Princeton Encyclopedia of Poetry and Poetics, ed., A. Preminger, enlarged edition, New York, 1975, p. 815.
४. Essays on Style and Language, ed., R. Fowler, second impression, London, Routledge & Kegan Paul, 1967, p. 36.
५. संदर्भटीप ३.
६. संदर्भटीप ४, पृ. ३६.
७. 'Algebra to Augustanism', संदर्भटीप ४, पृ. ६७.
८. 'Standard Language & Poetic Language', तत्रैव, पृ. ४२-५५.
९. W. Nowottny, The Language Poets Use, fifth ed., London, The Athlone Press, 1975.
१०. संदर्भटीप १, पृ. ४०.
११. संदर्भटीप ४, पृ. ४२.
१२. संदर्भटीप ९, पृ. ४१.
१३. E.Bach, An Introduction to Transformational Grammar, New York, Holt, Rinehart & Winston, Inc., 1964, p. 70.
१४. तत्रैव
१५. तत्रैव
१६. तत्रैव
१७. संदर्भटीप ४, पृ. ६७.
१८. संदर्भटीप ९, पृ. १२३.


□□□

५.

# जुन्या मराठी शब्दांचे पुनरुज्जीवन *

## १. मराठी भाषेला आलेली मरगळ

अलीकडचे मराठी साहित्य वाचत असताना एक विचार मनात पुन:पुन्हा उद्‌भवतो आणि मनाला अस्वस्थ करून सोडतो. तो विचार असा की, आजची मराठी भाषा गुळगुळीत, निस्तेज व चैतन्यहीन तर होत चालली नाही ना! आजचे साहित्य विविध व विपुल विषयांनी संपन्न आहे; पन्नास-साठ वर्षांपूर्वीच्या साहित्यिकाला जे विषय कधी सुचलेसुद्धा नसते ते विषय आज साहित्यात मोकळेपणाने मांडले जात आहेत; त्या विषयांच्या अभिव्यक्तीच्या वेगवेगळ्या तऱ्हा अस्तित्वात येत आहेत, त्या कल्पिल्या जात आहेत; मिश्र स्वरूपाच्या साहित्य-प्रकारांचे प्रयोग केले जात आहेत; तसेच इतर भारतीय भाषांतील साहित्यिक प्रवृत्तींनी मराठी साहित्य, अल्प प्रमाणात का होईना, प्रभावित होत आहे. जरी अशा प्रकारे मराठी साहित्याचा विस्तार व विकास होत असला तरी त्या साहित्याची अभिव्यक्ती करणाऱ्या भाषेची सद्य:स्थिती समाधानकारक आहे काय, असा प्रश्न मनात उद्‌भवतो. आजच्या साहित्यिक भाषेत तोचतोचपणा, निर्जीवपणा किंवा ठोकळेबाजपणा तर अवतरलेला नाही ना, अशी एक शंका येते. आजच्या भाषेत शब्द चपटे किंवा गुळगुळीत झाले आहेत; ते आपला ताजेपणा, टवटवीतपणा किंवा तजेलदारपणा गमावून बसले आहेत; परिणामी अशा शब्दांच्या संघटना (word structures) बोथट वा सपाट वाटतात; त्यांच्या योगे साधलेल्या लिखाणात भरडपणा येत असल्याचे प्रतीत होते. आजच्या मराठी भाषेतील ह्या वैगुण्याबद्दलची रुखरुख प्रसिद्ध कथाकार महादेवशास्त्री

---

* पूर्वप्रसिद्धी – ‘युगवाणी’ (नागपूर), जानेवारी-फेब्रुवारी-मार्च १९८९, पृ. ६७-७२

जोशी यांनी १९८१ साली भरलेल्या सोळाव्या गोमंतक मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात पुढील समर्पक शब्दांत व्यक्त केली होती. ते म्हणाले होते :

"सांप्रत मराठीचं अभिव्यक्तीचं कसब वाढलेलं दिसतं. पण शब्दसंपदा त्या मानाने कमी झाली आहे. आपणापाशी जे थोडेबहुत चालचलाऊ शब्द आहेत त्यांच्या मदतीनेच आपण 'कोंड्याचा मांडा' करतो. आपलं काहीतरी हरवलं आहे, हे जेव्हा कळतं, तेव्हा माणूस त्याच्या शोधाला सरसावतो. पण खेदाची गोष्ट ही, की आपलं काही हरवलं आहे, हेच आपण विसरलो आहोत. जिथे आपल्याला नेमका मराठी शब्द सापडत नाही, तिथे आपण अवतरणात इंग्रजी शब्द ठेवून मोकळे होतो. मराठीतलं नेटकं, चांगलं, सुंदर, अर्थवाहक असं बरंचसं काही हरवलं आहे. दहा वाक्यांचा अर्थ दोन वाक्यांत ठाशीवपणे सांगणारा वाक्प्रचार आता आपल्या लेखनात दिसत नाही.... पूर्वसूरींचा अभ्यास तुटला आहे. आपलं मराठी साहित्यच आपल्या महनीय भाषिक आणि सांस्कृतिक परंपरेपासून तुटलं आहे. ही स्थिती स्पृहणीय खास नाही. म्हणून नव्याने उदयाला येणाऱ्या गोमंतकीय आणि महाराष्ट्रीय साहित्यिकांनी हा आपला वारसा शोधावा आणि खऱ्या अर्थाने शब्दसृष्टीचे ईश्वर व्हावं, अशी माझी त्यांना कळकळीची सूचना आहे."[1]

पंडित महादेवशास्त्री जोशींसारख्या एका सिद्धहस्त व नामांकित साहित्यिकांना मराठी भाषेच्या स्थितिगतीविषयी चिंता वाटली व ती त्यांनी स्पष्टपणे बोलून दाखवली ही बाब हेच सुचवते की, मराठी भाषेचे स्वास्थ्य बिघडले असून त्यावर यथायोग्य उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. ह्या दिशेने विचार करू लागता जो एक उपाय सुचतो तोच प्रस्तुत लेखात मांडण्याचे ठरविले आहे.

## २. जुन्या मराठी शब्दांच्या पुनरुज्जीवनाची आवश्यकता

कोणत्याही भाषेत नवीन शब्दांची भर विविध कारणांनी पडत असते. तिच्या योगे विविध अर्थ, कल्पना, विचार इत्यादींची यथावत अभिव्यक्ती करण्याचे संबंधित भाषेचे सामर्थ्य वाढत असते. विदेशी संस्कृतीशी व तिच्या भाषेशी होणारा परिचय, स्वदेशातल्याच इतर भाषाभगिनींचा पडणारा प्रभाव, प्रतिभाशाली साहित्यिकांकडून होणारे अभिनव शब्दप्रयोग, शास्त्रीय व तांत्रिक संकल्पना व्यक्त करण्यासाठी साधले जाणारे नवीन शब्द इत्यादी अनेक मार्गांनी भाषेच्या शब्दभांडाराची सतत अभिवृद्धी होत असते, ही गोष्ट सर्वपरिचित आहे. अभिवृद्धीची ही प्रक्रिया एकीकडे चालू असताना जुन्या शब्दांच्या गळतीची प्रक्रियाही दुसरीकडे चालू असते. एकेकाळी प्रचारात असलेल्या, अभिप्रेत अर्थ वा मनोगते व्यक्त करू शकणाऱ्या व लोकांच्या तोंडी रुळलेल्या शब्दांचे कालांतराने

संबंधित भाषकांना विस्मरण होते व ते शब्द प्रचारातून नाहीसे होतात. क्वचित त्यांची जागा त्यांच्याच इतके अचूक शब्द घेतात, पण अनेकदा त्यांचा अर्थ व्यक्त करण्यासाठी अघळपघळ, पसरट व श्रुतिकटू शब्दावलीचा आश्रय घ्यावा लागतो. अशा वेळी अर्थवाहक जुन्या शब्दांच्या पुनरुज्जीवनाची आवश्यकता उत्कटतेने भासू लागते. अशा पुनरुज्जीवित शब्दांच्या वापरामुळे भाषा अर्थगुरू, सुटसुटीत, टवटवीत, आनंददायक व स्मरणीय बनते. वस्तुत: असे शब्द नवीन नसतातच, ते जुने व एकेकाळी रूढ असलेले असेच असतात; पण त्यांच्यावरील धुरळा झटकून व त्यांच्यावर साचलेली काजळी निपटून टाकून त्यांना पुन्हा एकदा 'चलनी नाण्यां'चे स्वरूप दिले की ते भाषेला जिवंत व रसरशीत बनवितात. जुन्या मराठीतील असे कित्येक 'कार्यसाधक' शब्द सध्या जणू अडगळीत पडल्यासारखे असून ते पुन:प्रचलनाची जणू आतुरतेने वाट बघत आहेत. असे शब्द पुन्हा रूढ केल्याने मराठी भाषेला कशी नव्हाळी प्राप्त होण्यासारखी आहे ते, निवडक शब्दांच्या उदाहरणांद्वारे, स्पष्ट करू. शब्दांची निवड पुढील तीन कोशांच्या आधारे केली आहे :

अ) काळेराव अप्पा, मराठी भाषेचा तंजावरी कोश, संपा. शं. गो. तुळपुळे, आवृत्ती पहिली, पुणे, व्हीनस प्रकाशन, ऑक्टोबर १९७३.

ब) विद्याधर वामन भिडे, सरस्वती शब्दकोश भाग पहिला, पुरवणीकार रा. शं. वाळिंबे, दुसरी आवृत्ती, पुणे, चित्रशाळा प्रेस, १९६९.

क) विद्याधर वामन भिडे, सरस्वती शब्दकोश भाग दुसरा, पुरवणीकार रा. शं. वाळिंबे, दुसरी आवृत्ती, पुणे, चित्रशाळा प्रेस, १९७०.

खालील नोंदींत वरील तीन कोशग्रंथांचा निर्देश अनुक्रमे अ, ब व क ह्या अक्षरांनी केला असून त्या अक्षरांपुढे संबंधित कोशग्रंथाचे पृष्ठांक नमूद केले आहेत. शब्दांच्या नोंदी अकारानुक्रमाने केल्या असून शब्दांच्या पुढे त्यांच्या व्याकरणिक जातीचा उल्लेख केला आहे.

## ३. पुनरुज्जीवन-योग्य शब्द

अकढा/ढी/ढे (ब-२) (वि.) = पूर्णपणे न कढलेले लोणी, तूप इत्यादी
अकळतनकळत (ब-४) (क्रि. वि.) = न जाणता; कर्मधर्मसंयोगाने
अखोड (ब-७) (वि.) = अव्यंग, ज्यात दोष काढावयास जागा नाही असे
अगल्याबगल्या (ब-१०) (वि.) = कोणीतरी, य:कश्चित किंमतीचा
अगाजा (ब-११) (पुं.ना.) = गाजावाजा, प्रसिद्धी, बोलबाला
अघननघन (ब-१४) (क्रि. वि.) = विनाकारण, कुरापत नसताना, अन्यायाने
अचरटपचरट (ब-१५) (वि.) = पाल्हाळिक, असंबद्ध, मूर्खपणाचे
अजादुजा (ब-१८) (वि.) = आपपर, माझा-तुझा, आपले-लोकांचे
आचंबणे (ब-१३९) (अ.क्रि.) = अचंबा पावणे, आश्चर्यचकित होणे

आडकाम (ब-२४) (न. ना.) = गौण काम, मुख्य कामाला उपयोगी पडणारे काम
आडखर्च (ब-२४) (पुं.ना.) = किरकोळ खर्च, आनुषंगिक खर्च.
आडवेळ (ब-२६) (स्त्री.ना.) = अनुचित किंवा भलतीच वेळ; कामाची नव्हे अशी वेळ
आनाकानी (ब-१४८) (स्त्री.ना.) = दुर्लक्ष; ऐकले नाही असे ढोंग
आलापाला (ब-१५८) (पुं.ना.) = जाडेभरडे गरीबाऊ जेवण; गरिबाची मीठ-भाकरी
उगामुका (ब-१८२) (क्रि.वि.) = अगदी स्तब्ध, अगदी न बोलता, न हालता
उभवणे (अ-४२) (स.क्रि.) = उभा/उभी/उभे करणे
उभाउभी (अ-४२) (क्रि.वि.) = उभ्याउभ्याने
उलणे (अ-४१) (स.क्रि.) = तडकणे, तडा खाणे
ऐनकिंमत (ब-२४७) (स्त्री.ना) = वस्तूची किंवा मालाची मूळ किंमत (विरुद्धार्थ = विक्रीची किंमत)
ऐलफैल (अ-४३) (क्रि.वि.) = अर्वाच्यपणे
काळवे (ब-३८०) (न.ना.) = संध्याकाळच्या प्रारंभी पसरणारा अर्धवट अंधार
किडखाद (अ-५०) (वि.) = किड्यांनी खाल्लेले
कोलणे (अ-५३) (स.क्रि.) = टाळणे
गळवट (अ-६०) (वि.) = गळ्यापावेतो भरलेले, गळायला लागेपर्यंत भरलेले
घाणणे (अ-६५) (अ.क्रि.) = घाणेरडा वास येणे
चट्ट करणे (अ-६८) (स.क्रि.) = समग्र खाणे
चावळणे (अ-६९) (अ.क्रि.) = घाबरेपणाने अडखळत बोलणे
छिलणे (अ-७४) (स.क्रि.) = तासणे
जाणपण (अ-७६) (न.ना.) = शहाणपण, समज
जीवट (अ-७७) (वि.) = खंबीर मनाचा, निर्भय
जुडणे (अ-७८) (अ.क्रि.) = चिकटणे
झगझगणे (अ-८०) (अ.क्रि.) = लखलखणे
झेपावणे (अ-८१) (स.क्रि.) = तात्पर्य ओळखणे
झोंड (अ-८१) (वि.) = निलाजरा, धटिंगण
टाकोटाक (अ-८३) (क्रि.वि.) = लवकर
डामाडोल (अ-८६) (वि.) = अस्थिर
ढेबरा (अ-८७) (वि.) = ओबडधोबड नाकाचा
तणधर (अ-८९) (न.ना.) गवताचे घर
ताठणे (ब-८६३) (अ.क्रि.) = ताठ होणे; वळेनासे होणे; गर्वाने उन्मत्त होणे
ताडबाजी (ब-८६३) (स्त्री.ना.) = तर्क; भरमसाठ तर्क

तांडव (ब-८६३) (न.ना.) बेतालपणाची अतिशयोक्ती; क्षुल्लक गोष्टीचा बोभाटा
तातडसार (ब-८६५) (वि.) = लगबग्या; सदा घाईत असणारा
तातावणे (ब-८६५) (अ.क्रि.) = त्रस्त किंवा जर्जर झालेले असणे
तात्पुरचा (ब-८६५) (क्रि.वि.) = जाणूनबुजून, बुद्धिपुरस्सर
ताथय्या (ब-८६५) (पुं.ना.) = मुलांची दांडगाई किंवा दंगामस्ती
तांबडसांज किंवा तांबेसांज (ब-८६८, ८६९) (स्त्री.ना.) = सूर्यास्तानंतरची पण रात्रीच्या पूर्वीची वेळ
तारकाबारका (ब-८७०) (वि.) = भांबावलेला, गोंधळलेला, आश्चर्यचकित झालेला
तारकीपारखी (ब-८७०) (वि.) = तर्क + परीक्षा करणारा; धूर्त; चौकस; सावध; जागरूक
तारता (ब-८७०) (पुं.ना.) = तारक; तारणारा
तारोतार (ब-८७२) (क्रि.वि.) = खंड न पडता (तुळा- हिंदीतील 'लगातार')
तारोळा (ब-८७२) (पुं.ना.) = अडथळा, घोटाळा, गोंधळ, दुर्दशा
ताले (ब-८७३) (पुं.अ.व.ना.) = नशिबाचे किंवा दैवाचे खेळ
तावणे (अ-९१) (स.क्रि.) = तापवणे, ऊन करणे
तिताली (ब-८७९) (वि.) = तीन मजल्यांचे (घर), ताल = मजला
तिंतुर (ब-८७९) (पुं.ना.) = भांडे, वस्त्र इत्यादींना पडलेले बारीक छिद्र किंवा भोक
तिपाठी (ब-८८०) (वि.) = एखादा श्लोक किंवा एखादे वाक्य तीन वेळा वाचून किंवा ऐकून पाठ म्हणू शकणारा
तिपिकी (ब-८८०) (वि.) = एका वर्षात तीन पिके देणारे (शेत) किंवा देणारी (जमीन)
तिफसली (ब-८८०) (वि.) = एका वर्षात तीन पिके देणारे (शेत) किंवा देणारी (जमीन)
तिंब (ब-८८०) (वि.) = पूर्णपणे भिजलेला; ज्याच्यातून थेंबाथेंबांनी पाणी गळत आहे असा
तिंबणे (ब-८८०) (अ.क्रि.) = १. शिजलेला भात फार वेळ राहिल्याने आंबुस होणे; २. माणूस किंवा पशू आजारामुळे किंवा अपुऱ्या खाण्यामुळे रोडावणे
तिरतिरा किंवा तिरतिऱ्या (ब-८८१) (वि.) = अधीर, चंचल मनाचा, अस्थिर
तिलप्राय किंवा तिलतुल्य (ब-८८३) (वि.) = अगदी लहान, अगदी थोडा
तिशी (ब-८८४) (स्त्री.ना.) = एकाच जातीच्या तीस पदार्थांचा संच किंवा समुदाय
तिसाला (ब-८८५) (क्रि.वि.) = एकापुढे एक तीन वर्षे
तिळातिळाने (ब-८८७) (क्रि.वि.) = अगदी थोड्या प्रमाणात/लक्षात येणार

नाही अशा वेगाने वाढणे, रोडावणे, अशक्त होणे, इ.
तीड (ब-८८५) (स्त्री.ना.) = मित्रामित्रांच्या मनांत एकमेकांविषयी उत्पन्न होणारी विमनस्कता; बेबनाव
तीर्थकाक (ब-८८६) (पुं.ना.) = लोभी मनुष्य
तुकडमोड्या किंवा तुकडबाबू (ब-८८८) (पुं.ना.) = प्रपंचाची जबाबदारी न घेणारा, कोणतेही कामधाम न करणारा, केवळ जेवावयाच्या योग्यतेचा मनुष्य; दुसऱ्याच्या घरात पुष्कळ दिवस नि:संकोचपणे राहणारा मनुष्य
तुकड्या (ब-८८८) (वि.) = भोजनाच्या वेळी लोकांच्या घरी सापेक्ष जाणारा
तुकणे (ब-८८८) (स.क्रि.) = १. तराजूत घालून पदार्थाचे वजन करणे किंवा ठरवणे; २. कोणत्याही साधनाने एक पदार्थ दुसऱ्याच्या मानाने किती कमी-अधिक योग्यतेचा आहे ते ठरवणे; ३. एकाची दुसऱ्याशी बरोबरी करणे; एक दुसऱ्याच्या योग्यतेचा आहे असे ठरवणे
तुटणे (ब-८८९) (अ.क्रि.) = एखाद्याला एखादे घर तुटणे (= पारखे होणे)
तुटरा (ब-८८९) (वि.) = क्षुल्लक निमित्तावरून भांडायला उठणारा
तुटार (ब-८९०) (वि.) = तुटलेला, मोडका, छिन्नविच्छिन्न
तुरबुरणे (ब-८९२) (अ.क्रि.) = १. चरफडणे; २. झाडे टवटवीत दिसणे; ३. नव्या पालवीने डवरणे; ४. धुमारे फुटणे
तुरळणे (ब-८९२) (स.क्रि.) = पदार्थांची ठाशीव मांडणी मोडून ती विरळ करणे; वस्त्र इत्यादी सैलसर विणणे
तुरा लावणे (ब-८९२) (वाप्र.) = १. काही अलौकिक, मोठ्या पराक्रमाचे वा देशहिताचे कृत्य करून कीर्ती संपादणे; २. तसे कृत्य करून वैभवास चढणे; ३. वादात सरशी मिळवणे किंवा वरचढ ठरणे
तुरुंब (ब-८९३) (क्रि.वि.) = काठोकाठ (उदा. भांड्यात पाणी तुरुंब भरले)
तुरुत (ब-८९३) (क्रि.वि.) = ताबडतोब (उदा. तुरुत दान महापुण्य)
तुलित (ब-८९३) (वि.) = तोललेले; दुसऱ्या पदार्थाशी ताडून पाहिलेले; दुसऱ्या पदार्थाच्या बरोबरीचे
तूटपाऊस (ब-८९५) (पुं.ना.) = १. मधूनमधून पडणारा पाऊस; २. सर्वत्र न पडलेला पाऊस
तूष्णीं (ब-८९५) (न.ना.) = पदार्थाचे अत्यल्प प्रमाण, अगदी थोडा पदार्थ (उदा. पेठ्यांच्या घरी तुपाच्या नावाने बहुतेक तूष्णीम्च असते)
तेखी (ब-८९६) (वि.) = रागीट, आवेशी, तापट
तेलंगभट (ब-८९८) (पुं.ना.) = आगंतुक मनुष्य; विशिष्ट पदार्थ लोचटपणे मागणारा माणूस
तेलची (अ-९३) (स्त्री.ना.) = तळलेली लहान पोळी
तोंड (ब-९००) (न.ना.) = सखोल अध्ययन सुलभ करणारे प्रवेशद्वार (उदा.

व्याकरण हे भाषेचे तोंड होय = व्याकरणात प्रवेश झाला की भाषा सुसाध्य होते.)

तोंडोतोंड (अ-९४) (क्रि.वि.) = काठोकाठ, तोंडापावेतो

तोरदार (ब-९०६) (वि.) = ऐटखोर; संपत्ती, अधिकार इत्यादींमुळे उन्मत्त किंवा गर्विष्ठ

तोलणे (ब-९०६) (अ.क्रि.) = १. कलणे किंवा झुकणे (उदा. हा खांब इमारतीकडे तोलला आहे); २. विशिष्ट पदार्थाकडे मन आकृष्ट होणे (उदा. त्याचे मन श्रीखंडाकडे तोलते); ३. झेपणे (उदा. पुरोहिताला न्यायाधीशाचे काम तोलणार नाही.)

तौरी किंवा तवरी (ब-९०७) (वि.) = रागीट, तापट, चिडखोर

त्रास त्रास देणे (ब-९०८) (वाप्र.) = अती गांजणे किंवा सतावणे

त्रिकाळी (ब-९०९) (क्रि.वि.) = दुपारची वेळ फार टळून गेल्यावर म्हणजे अवेळी

त्रितय (ब-९०८) (न.ना.) = कोणत्याही तीन वस्तूंचा समुच्चय

त्रिवाचा (ब-९०९) (स्त्री.ना.) = तीन वेळा उच्चारलेली प्रतिज्ञा किंवा उच्चारलेले वचन

त्रेपन्नी (ब-९१०) (वि.) = अत्यंत वात्रट किंवा लफंगा

त्रेसष्टी (ब-९१०) (स्त्री.ना.) = पती व पत्नी, मित्र वा मित्र, सेवक व मालक यांचा पूर्ण सलोखा

थकित (ब-९११) (वि.) = थक्क झालेला, आश्चर्यचकित, मती गुंग झाली आहे असा

थटकारणे (ब-९११) (स.क्रि.) = १. ठाशीव रचनेत घालणे; २. व्यवस्थित रूपात मांडणे; ३. नेटक्या रीतीने ठेवणे किंवा कपडे वगैरे घालणे

थडीस लावणे (किंवा लागणे) (ब-९११) (स./अ.क्रि.) = शेवटास लावणे किंवा लागणे

थंड (ब-९१२) (वि.) = १. विसर्जन होणे (उदा. ताबूत थंड झाले); २. उपद्रव नसणे (उदा. यंदा दंगेधोपे थंड आहेत); ३. स्वयंपाक व्हायचा असणे (उदा. रानड्यांच्या घरी अजून थंड आहे); ४. आनंद होणे (उदा. नातू मंत्री झाल्याचे पाहून आजीचे डोळे थंड झाले); ५. शमणे (उदा. दंगा थंड झाला); ६. मरणे (उदा. हातपाय थंड पडले)

थंडीचे पिल्लू (ब-९१२) (न.ना.) = हलकीशी थंडी; अल्पकाळ टिकणारी थंडी

थप्पडखाऊ किंवा थप्पडवाईक (ब-९१३) (वि.) = कर्तृत्वशून्य (मनुष्य)

थलथलीत (ब-९१४) (वि.) = १. फार पिकल्यामुळे किंवा अतिशय भिजल्यामुळे ज्यात काही टणकपणा राहिलेला नाही असा (पदार्थ, चिखल, फळ, गळू,

पीठ इत्यादी; २. लठ्ठ असून फोफसे (शरीर). ह्या अर्थी थिलथिलीत असाही शब्द आहे. (ब-९१४)
थाकी (ब-९१४) (स्त्री.ना.) = एखाद्या माणसाची बोलण्याची, हसण्याची किंवा चालण्याची पद्धत किंवा शैली
थार (ब-९१७) (पुं.ना.) = कर्जाऊ दिलेल्या रकमेस तारण (उदा. तुला मी कशाच्या थारावर कर्ज देऊ?)
थाळातांब्या (ब-९९७) (पुं.ना.ए.व.) = संसाराच्या उपयोगाची भांडीकुंडी (समुच्चयाने)
थिगळ (ब-९१८) (वि.) = संथ, सुस्त, मद्दड ('तल्लख'च्या उलट)
थिजवणे (ब-९१८) (स.क्रि.) = एखाद्याला गलितोत्साह करणे; खचवणे.
थुंकीचाट्या (ब-९१८) (वि.) = स्वाभिमान सोडून समर्थाची नीच आणि हलकी कामे करणारा
थेटखरेदी (ब-९१८) (स्त्री.ना.) = वस्तू बनविली जाते त्याच ठिकाणी केलेली खरेदी
थोटा पिंपळ (ब-९१९) (पुं.ना.) = ज्याला बायको, मुले इत्यादी परिवार नाही असा पुरुष
थोडकावणे (ब-९१९) (अ.क्रि.) = कमी किंवा उणा होणे. (उदा. आमच्या विहिरीचे पाणी उन्हाळ्यात थोडकावते. रामभाऊंचा व्यापारधंदा सध्या थोडकावला आहे.)
थोप (ब-९२०) (स्त्री.ना.) = मुक्काम किंवा मुक्कामाची जागा. (उदा. वाटेत आमच्या तीन थोपी झाल्या. आम्ही थोपीवर पोहोचलो तेव्हा आठ वाजले होते.)
थोरावणे (अ- ९६) (अ.क्रि.) = वाढणे; उंच होणे; प्रबळ होणे
दगडघाशी (ब-९२२) (स्त्री.ना.) = कोणतेही कष्टमय किंवा जिकिरीचे काम
दगदगणे (ब-९२२) (अ.क्रि.) = काही जिकिरीच्या कामामुळे बेजार होऊन जाणे
दचक (अ-९६) (पुं.ना.) = वचक
दत्तात्रेयाची फेरी किंवा स्वारी (ब-९२६) (स्त्री.ना.) = सदा भटकणारा माणूस; जो अमुक वेळी अमुक ठिकाणी सापडेल असे निश्चितपणे सांगता येत नाही असा माणूस; अकल्पितपणे येणारा माणूस
ददाची विद्या किंवा ददाची बाराखडी (ब-९२७) (स्त्री.ना.) = देण्याची क्रिया किंवा देण्याची प्रवृत्ती; औदार्य (उदा. त्याला ददाची बाराखडी येत नाही.)
दमडीपूत (ब-९३०) (वि.) = पैशाचा लोभी असा (माणूस)
दमडीवर चमडी मिळविणे (ब-९३०) (वाप्र.) = अत्यल्प भांडवलावर मोठा नफा मिळविणे
दर येणे (ब-९३१) (अ.क्रि.) = एखादा पदार्थ महाग किंवा दुर्मीळ होणे

दरगुदर (ब-९३१) (पुं.ना.) = काणाडोळा; दुर्लक्ष
दरठरोती (ब-९३१) (स्त्री.ना.) = दर ठरविणे
दरदाम (ब-९३१) (पुं.ना.) = किंमत किंवा दर याची चौकशी करणे (उदा. वस्तूचा दरदाम चार दुकानांत विचार आणि मगच खरेदी कर)
दरा (ब-९३२) (पुं. किंवा स्त्री.ना.) = (लाक्षणिक) पोट. (उदा. जेथे भरे दरा तोच गाव बरा)
दर्यागर्क (ब-९३४) (वि.) = १. समुद्रात बुडून मेलेला; २. समुद्राच्या पाण्याने वाहून गेलेले शेत किंवा गाव
दंवारणे (ब-९३६) (अ.क्रि.) = दंवाने व्याप्त किंवा दमट होणे
दशमी दशा (ब-९३७) (स्त्री.ना.) = म्हातारपण
दहा घरचे दहा (ब- ९३८) (पुं.ना.) = १. बेजबाबदार माणसे; २. भिन्नभिन्न मतांची माणसे; ज्यांचे एकमत होणे शक्य नाही अशी माणसे
दहीमही करणे (ब-९३८) (अ.क्रि.) = कचरणे; साशंक होणे; कर्तव्यमूढ होणे
दळ्या (ब-९३९) (वि.) = दळणकांडण इत्यादी बायकी कामे करणारा किंवा करण्याची प्रवृत्ती असलेला
दाखल (ब-९४०) (श.अ.) = सारखे; प्रमाणे. (उदा. हा नोकर पुत्रादाखल आहे; हे काम मी केल्यादाखल आहे; ती नोकरी मिळाल्यादाखलच आहे)
दाखला घेणे (ब-९४१) (स.क्रि.) = अनुकरणीय गोष्ट म्हणून स्वीकारणे (उदा. मुंगीपासून उद्योगशीलतेचा दाखला घ्यावा)
दाखवणूक (ब-९४१) (स्त्री.ना.) = प्रदर्शन, मंदिर, खेळ इत्यादी दाखवणाऱ्यास द्यावयाची मजुरी किंवा बक्षिशी
दांडारणे (ब-९४३) (अ.क्रि.) = अतिश्रमामुळे किंवा थंडीमुळे विशिष्ट गात्र ताठ होणे
दांडी (ब-९४४) (स्त्री.ना.) = समुद्रात घुसलेला जमिनीचा अरुंद पट्टा (उदा. कुलाब्याची दांडी)
दाढभर (ब-९४४) (क्रि.वि.) = तृप्ती होण्याइतक्या प्रमाणात (उदा. यंदा दाढभर ऊस खायला मिळाला.)
दाणापाणी (ब-९४५) (न.ना.एक.व.) = चरितार्थाची साधने समुच्चयाने.
दाणेकरी (ब-९४५) (पुं.ना.) = १. धान्य विकणारा व्यापारी; २. धान्याचा संग्रह करणारा मनुष्य
दातकसई किंवा दातकसाई (ब-९४७) (पुं.ना.) = जो नेहमी अशुभ भाकिते करतो आणि ज्याची अशुभ भाकिते खरी ठरतात असा माणूस.
दातरा (ब-९४७) (वि.) = दाताळ; ज्याचे पुढचे दात ओठाच्या बाहेर येतात असा
दाताळणे (ब-९४७) (स.क्रि.) = १. दातांनी चावून उष्टे करणे; २. (लाक्षणिक)

काही गुप्त गोष्ट बोलून जाहीर करणे
दादर (ब-९४८) (पुं.ना.) = १. लाकडी जिना; २. इकडून काढून तिकडे लावता येईलसा जिना
दाब (अ-९७) (पुं.ना.) = जरब, धास्ती; भय
दाबण (ब-९४९) (न.ना.) = वस्तू चेपण्यासाठी तिच्यावर ठेवलेला जड पदार्थ
दामचुंबक (ब-९५०) (पुं.ना.) = कृपण मनुष्य; चिक्कू (याला दामजोड किंवा दामजोड्या असेही म्हणतात— ब-९५०)
दामजड (ब-९५०) (वि.) = भारी किमतीचे; मूल्यवान
दामट (ब-९५१) (स्त्री.ना.) = आकाश मेघाच्छादित असून बारीकबारीक पाऊस पडत असतो अशी दिवसाची स्थिती
दार (ब-९५१) (न.ना.) = दाराच्या पुढचा किंवा शेजारचा प्रदेश. (उदा. आम्ही दारी तुळस लावली आहे)
दाळगोटा (ब-९५५) (पुं.ना.) = भरडून केलेल्या डाळीत राहिलेला सबंध म्हणजे न फुटलेला दाणा
दाळपिठिया (ब-९५५) (वि.) = गरीब किंवा अतिशय सौम्य स्वभावाचा (मनुष्य)
दाळरोटी (सब बात खोटी) (ब-९५५) (स्त्री.ना.) = जीवनात सर्वांत अधिक महत्त्वाची वस्तू जेवण, (इतर वस्तू कमी महत्त्वाच्या)
दिक्कतखोर (ब-९५५) (वि.) = जे बाजारात चालेल किंवा नाही अशी शंका ज्याच्या संबंधात येते असे नाणे
दिपवा (ब-९५७) (पुं.ना.) = सर्व दिवसभर मेघांची अंधेरी असता मधूनमधून काही वेळ जो सूर्यप्रकाश दिसतो तो
दिलदपृत(फ्त)र (ब-९५७) (न.ना.) = अंत:करणाची चोपडी जिच्यात घडलेल्या गोष्टींची नोंद होत असते; स्मृती
दिवसबळ (ब-९५९) (न.ना.) दिवसाच्या प्रकाशाची अनुकूलता (उदा. दिवसबळाशिवाय बारीक अक्षर वाचता येत नाही.)
दिवसमुख (ब-९५९) (न.ना.) = पहाट, प्रभातकाळ
दिवसा दिवाळी (ब-९५९) (स्त्री.ना.) = उधळपट्टी (उदा. दिवसा दिवाळी करणाऱ्याला कालांतराने दिवाळेच काढावे लागते)
दुकाळणे (ब-९६५) (अ.क्रि.) = दुर्मीळ किंवा महाग होणे
दुखरू (ब-९६६) (न.ना.) = ठेच, गळू इत्यादी लहानसे पण लवकर बरे न होणारे दुखणे
दुचाळा (ब-९६७) (पुं.ना.) = हे करू की ते करू अशी मनाची संदिग्ध किंवा पेचाची स्थिती (दु = दोन, चाळा = हालचाल)

दुधवणी (ब-९७०) (न.ना.) = ज्यात फार पाणी घातले गेले आहे असे दूध
दुधाणे (अ-९९) (न.ना) = दूध तापवण्याचे पात्र किंवा भांडे
दुधाळ (अ-९९) (वि.) = दुधाने भरलेले
दुपरतणे (ब-९७०) (अ.क्रि.) = शमलेले दुखणे पुन्हा उद्भवणे (to relapse)
दुपायी (अ-९९) (वि.) = ज्याला दोन पाय आहेत असे
दुपारीतिपारी (ब-९७१) (क्रि.वि.) = १. मध्यान्हाच्या सुमारास; २. भलत्याच वेळी
दुवारणे (ब-९७७) (स.क्रि.) = पुनरावृत्ती करणे; तीच गोष्ट पुन्हा करणे
दुवाळणे (ब-९७७) (स.क्रि.) = एकदा सांगितलेली हकीगत दुसऱ्या खेपेस सांगताना थोडी बदलून सांगणे
देखणाऊ (ब-९८३) (वि.) = केवळ दिसण्यात सुंदर पण भिकार किंवा नादान
देखतपत्र (अ-१००) (क्रि.वि.) = पत्र पाहताच
देखदुखी (ब-९८२) (वि.) = दुसऱ्याचे चांगले पाहून ज्याला दुःख होते असा; मत्सरी
देखीव (ब-९८३) (वि.) = प्रत्यक्ष पाहिलेली (गोष्ट किंवा घटना)
देघे (ब-९८४) (स्त्री.ना.) = उसने देणे व उसने घेणे ह्या स्वरूपाचा व्यवहार
देठसुटा (ब-९८४) (वि.) = गळून किंवा तुटून पडण्याच्या स्थितीतील (फूल, फळ इत्यादी)
देवारणे (ब-९८७) (न.ना.) = डोक्यावरचे ओझे विश्रांतीसाठी उतरता यावे ह्यासाठी रस्त्याच्या कडेला केलेली सोयीची रचना. ह्याला धरमधक्का असेही म्हणतात. (क-१००८)
दोरा (ब-९९२) (पुं.ना.) = वशीला (उदा. कार्यालयात त्याचा दोरा होता म्हणून काम झाले)
दोराळ (ब-९९२) (वि.) = ज्यात रेषा किंवा तंतू फार आहेत असे.
दोरीसूत (ब-९९२) (क्रि.वि.) = अगदी सरळ रेषेत; मध्ये वळणे न घेता (उदा. हा रस्ता येथून दोरीसूत चिंचवडास जातो)
दौलतीचा खांब (ब-९९३) (पुं.ना) = ज्याच्या भाग्याने कुटुंबाला सुखविलास भोगावयास मिळतो असा कुटुंबप्रमुख
द्विपक्व (ब-९९७) (वि.) = दोन वेळा भाजलेले किंवा शिजवलेले (उदा. उकडीचे मोदक)
धडकफडक (क-१००१) (वि.) = मनात येईल ते कोणाचीही भीड न बाळगता बोलणारा
धनचळ (क-१००४) (पुं.ना.) = १. पैशाचे वेड; २. पैसा गेल्यामुळे लागते ते वेड
धर (क-१००६) (पुं.ना.) = १. लक्षात ठेवण्याची ताकद (उदा. गोविंदाच्या

बुद्धीला धर नाही, त्याला एक श्लोक दहा वेळा सांगावा लागतो); २. वर्तन, विचार इत्यादींचा एकसूत्रीपणा किंवा एकवाक्यता (उदा. गोपाळाच्या बोलण्याला धर नाही, आता एक बोलेल तर घटकेनंतर दुसरेच बोलेल)

धरणे (क-१००८) (अ.क्रि.) = निवारले जाणे (नुसत्या भाताने माझी भूक धरत नाही)

धरणेपारणे (क-१००८) (न.ना.ए.व.) = दारिद्र्यामुळे कधी जेवण मिळते, तर कधी उपाशी राहावे लागते अशी स्थिती. (उदा. त्याची नोकरी गेल्यापासून त्याचे धरणेपारणे चालले आहे)

धरधरणे किंवा धरधरावणे (क-१००८) (अ.क्रि.) = आजारातून उठून पूर्वस्थितीवर येणे

धरमेळ (क-१००८) (पुं.ना.) = भाषण, वर्तन इत्यादींत पद्धतीची एकरूपता

धर्मपुरी (क-१००९) (स्त्री.ना.) = ज्या घरात आल्यागेल्या पाहुण्याचा चांगला आदरसत्कार केला जातो असे घर

धवधवीत (क-१०११) (वि.) = गडद (पिवळा, पांढरा, गोरा इत्यादी)

धशाफशा किंवा धशीफशी (क-१०११) (क्रि.वि.) = निष्काळजीपणाने, दांडगाईने किंवा अव्यवस्थित रीतीने

धांद किंवा धांदोटी (क-१०१४) (स्त्री.ना.) = वस्त्र, कातडे, कागद इत्यादीची लांब व अरुंद पट्टी

धाम (क-१०१५) (स्त्री.ना.) = लग्ने, मुंजी इत्यादी विधी गावात एकाच वेळी मोठ्या संख्येने होऊ लागण्याची लाट (धूमधाम असा शब्दही वापरतात.)

धार (क-१०१६) (स्त्री.ना.) = क्षितिज (उदा. दिवस धारेस आला)

धारकशी (क-१०१६) (स्त्री.ना.) = सक्ती, तगादा किंवा कडकपणाची वागणूक (उदा. 'मी तुमची धारकशी चालू देणार नाही', असे सुनेने सासूला बजावले)

धारबोळ (क-१०१७) (क्रि.वि.) = काठोकाठ (उदा. भांडे पाण्याने/दुधाने/तेलाने धारबोळ भरले आहे)

धालाधाकटा (क-१०१८) (वि.) = लहान, आटोपशीर, गोंडस, सुंदर, ठेंगणाठुसका

धिंडावणे (क-१०१९) (अ.क्रि.) = घराबाहेर कोठेतरी जाणे किंवा भटकत असणे (हा शब्दप्रयोग निंदार्थी होत असतो)

धिरणे (क-१०२०) (अ.क्रि.) = धीर धरणे (उदा. तुम्ही दोन महिने धिरलात तर मी ते काम करीन)

धुकट (क-१०२०) (क्रि.वि.) = अस्पष्टपणे, अंधुक रीतीने

धुंडाधुंडी (अ-१०३) (स्त्री.ना.) हुडकाहुडकी

धुनक किंवा धुनूक (क-१०२१) (स्त्री.ना.) = लोकांत अर्धवट म्हणजे तपशीलवार नव्हे अशी पसरलेली काही बातमी. हिला धून (अ-१०२५)

असेही म्हणतात
धुपांगरा किंवा धुपांगारा (क-१०२२) (पुं.ना.) = शिजताना तळाशी करपलेला भात
धुमड (क-१०२२) (स्त्री.ना.) = दंगामस्ती, चंगळ, वैपुल्य (उदा. आज सकाळपासून पावसाने धुमड लावली आहे.)
धुमाधार (क-१०२३) किंवा धुवाधार (क-१०२४) (क्रि.वि.) = जोराने, मोठ्या धारांनी, संतत (पाऊस पडणे) (तुळा-हिंदी शब्द 'धुआँधार')
धुरकणे (क-१०२३) (अ.क्रि.) = (एखादा पदार्थ) धुरामुळे खराब होणे
धुळवरा, किंवा धुळारा किंवा धुळोरा (क-१०२४) (पुं.ना.) = धूळ, केरकचरा
धूतवस्त्र (क-१०२५) (न.ना.) = धुऊन स्वच्छ केलेले वस्त्र (उदा. तो धूतवस्त्र नेसून पूजेला बसला)
धूळदशा किंवा धूळधाण किंवा धूळधाणी किंवा धूळधाम किंवा धूळपट किंवा धूळपट्टी (क-१०२६) (स्त्री.ना.) किंवा धूळधमासा (क-१०२६) (पुं.ना.) = विध्वंस, नाश
धोंडदिवस (क-१०२७) (पुं.ना.) = ज्यात कोणतेही धर्मकृत्य होत नाही असा दिवस
धोंडमहिना किंवा धोंडमास (क-१०२७) (पुं.ना.) = ज्यात कोणतेही धर्मकृत्य होत नाही असा महिना
धोप (क-१०२८) (क्रि.वि.) = अतिशय (पांढरा)
धोरणशुद्ध (क-१०२९) (वि.) = १. नीट विचार करून केलेले; २. समंजसपणाचे
धोशा किंवा धौशा किंवा धोसा (क-१०२९) (पुं.ना.) = १. दुसऱ्याला लावलेला तगादा; २. स्वत:ला लागलेली हुरहूर
ध्यान (क-१०२९) (न.ना.) = सर्व कामे यथायोग्य करण्याची मन:स्थिती (उदा.  अजून तो झोपेत आहे, ध्यानावर आलेला नाही)
'न'चा पाढा वाचणे (क-१०३१) (वाप्र.) = काही काम करीत नाही, असे म्हणणे
नकळा (क-१०३२) (वि.) = १. अडाणी, मूर्ख, २. अज्ञात, ठाऊक नसलेला,  ३. ज्याला एखादी गोष्ट कळलेली नाही असा
नखाग्री (क-१०३३) (क्रि.वि.) = नखाच्या टोकावर (उदा. दार्शनिक सिद्धांत त्याच्या नखाग्री आहेत)
न च ननु (क-१०३५) (न.ना.) = करू की करू नको अशी मन:स्थिती (उदा. तो न च ननु करू लागला)
नजरपाहणी (क-१०३५) (स्त्री.ना.) = एखाद्या वस्तूचा अदमास करण्यासाठी तिच्यावर टाकलेली नजर
नजरबाग (क-१०३५) (पुं.वा स्त्री.ना.) = नजरेला संतुष्ट करण्यासाठी घरापुढे केलेला किंवा केलेली बाग

नजरबाज (क-१०३५) (वि.) = सूक्ष्म नजरेने वस्तूचे निरीक्षण करण्यात कुशल
नपड (क-१०३७) (स्त्री.ना.) = दोन माणसांचे एकमेकांशी न पटण्याची स्थिती
नभश्चुंबक किंवा नभश्चुंबित (क-१०३८) (वि.) = खूप उंच वृक्ष, पर्वत, मंदिर इत्यादी
नवघड (क-१०४१) (वि.) = नवीन बनविलेला किंवा घडविलेला
नवतरणे किंवा नवतारणे (क-१०४१) (स.क्रि.) = जुन्या वस्तूची डागडुजी करून तिला नवे रूप देणे
नवथर (क-१०४१) किंवा नवसर (क-१०४२) (क्रि.वि.) = नुकताच, अगदी अलीकडे
नवसरणे किंवा नवसारणे (क-१०४२) (स.क्रि.) = डागडुजी करून एखादी वस्तू पूर्वीसारखी किंवा त्याच्या खालोखाल चांगली करणे. (to renovate)
नक्षत्रमाळ किंवा नक्षत्रमाळा (क-१०४६) (स्त्री.ना.) = दोरीवर अस्ताव्यस्त लोंबत असलेले कपडे (हा शब्द निंदा करण्यासाठी वापरतात)
नाक (क-१०४७) (न.ना.) = अब्रू (उदा. त्या व्यवहारात माझे नाक गेले, हे खरेच)
नाकसबी (क-१०४७) (वि.) = अकुशल (उदा. हा कारागीर नाकसबी आहे)
नाकुवत (क-१०४७) (वि.) = अशक्त, दुबळा
नाका-ओठावर जेवणे (क-१०४८) (वाप्र.) = चोखंदळपणाने जेवणे
नाकातला बाल (क-१०४८) (पुं.ना.) = आवडीचा, प्रेमाचा किंवा जिव्हाळ्याचा माणूस
नाकील (क-१०४९) (वि.) = ज्याचे नाक सुरेख व सरळ आहे असा
नागमोडीचा पीतांबर नेसणे (क-१०५०) (वाप्र.) = नागवे असणे
नागवे उदाहरण (क-१०५९) (न.ना.) = चटकदार नव्हे असा दाखला
नागवे कोल्हे भेटणे किंवा नागवी सवाशीण भेटणे (क-१०५१) (वाप्र.) = अनपेक्षित किंवा अकल्पित लाभ होणे
नाचरी करणे (क-१०५२) (वाप्र.) = नोकरीधंद्यामुळे किंवा अन्य कारणामुळे वारंवार स्थलांतर करणे
नाजूक काम (क-१०५२) (न.ना.) = लाच घेणे किंवा देणे
नाट जाणे (क-१०५३) (वाप्र.) = सुना जाणे, फुकट जाणे, काम न होणे (उदा. आजचा दिवस नाट गेला)
नाड सापडणे (क-१०५३) (वाप्र.) = युक्तिप्रयुक्तीने स्वभावाचे ज्ञान होणे
नाद जाणे (क-१०५५) (वाप्र.) = पत जाणे, लौकिक नष्ट होणे
नादखोर (क-१०५५) (वि.) = १. नादाला लागलेला, २. पिच्छा पुरवून सतावणारा, ३. आपल्या तंत्राने चालावयास लावणारा

नादवाद (क-१०५५) (पुं.ना.ए.व.) = शुष्क वादविवाद
नापत (क-१०५६) (वि.) = ज्याच्यावर भरवसा ठेवता येत नाही असा; भरवशास अपात्र
नापूस (क-१०५६) (स्त्री.ना.) = उपेक्षा; कोणी विचारीत नाही अशी स्थिती.
नामजात किंवा नामजाद (क-१०५७) (वि.) = प्रख्यात
नायरीं (क-१०५८) किंवा नावली (क-१०६१) (स्त्री.ना.) = एकसारखे नाही म्हणण्याची (किंवा नकार देण्याची) क्रिया
नारावारा (क-१०५९) (पुं.ना.) = १. निष्काळजीपणाने कामाचा बोजवारा उडवणे; २. उडवाउडवीची उत्तरे देणे
नाशिकची कल्हई किंवा जिल्हई (क-१०६१) (स्त्री.ना.) = अल्प काळ टिकणारी चकाकी किंवा तकतकी
नाही तेच (क-१०६३) (वि.) भलतेच; मूर्खासारखे
निकळा (क-१०६४) (वि.) बेचव, पांचट किंवा पचपचीत (भात, भाजी, भाकरी, इत्यादी)
निका (अ-१०६) (वि.) नेटका; चांगला
निगोड (क-१०६६) (वि.) = ज्यात योग्य प्रमाणात साखर किंवा गूळ घातलेला नाही असा (पदार्थ)
निघोर किंवा निघोरी (क-१०६७) (वि.) = निश्चित; विवंचनारहित; काळजी नसलेला
निचाड (अ-१०६) (वि.) = दाक्षिण्यहीन
निजाळू (क-१०६८) (वि.) = ज्याला झोप फार येते असा मनुष्य; झोपाळू
निजोखमी (क-१०६८) (वि.) = ज्यात तोटा होण्याचा किंवा ठोकर बसण्याचा संभव नाही किंवा अल्प संभव आहे, असा व्यवहार
निझाडून (क-१०६८) (क्रि.वि.) = १. स्पष्ट शब्दांनी उत्तर देणे; २. भीडभाड न ठेवता स्पष्ट शब्दांनी नकारात्मक उत्तर देणे
नितांतणे (क-१०६९) (अ.क्रि.) = एखाद्या वस्तूसाठी अतिशय उत्कंठित होणे
नित्यनवा (क-१०६९) (वि.) = १. कामाला कधीही न कंटाळणारा; उत्साही; २. अत्यंत विसराळू. ज्याला एकच गोष्ट पुन्हा सांगावी लागते असा
निदर्दी (क-१०७०) (वि.) = १. कठोर, २. कोडगा, निर्लज्ज, रागावल्यावरही ज्याला लाज वाटत नाही असा
निदावापत्र किंवा निदावेपत्र (क-१०७१) (न.ना.) = वस्तूवर इत:पर हक्क नाही किंवा वस्तूवरील हक्क सोडला आहे, असे लिहून दिलेला कागद
निनावा (क-१०७२) (पु.ना.) खात्री, दुसऱ्याबद्दलची हमी (उदा. त्याला तुम्ही नोकरीला ठेवा. मी त्याचा निनावा देतो.)

निपट (क-१०७२) (क्रि.वि.) = अगदी, सर्वथैव, पूर्णपणे (उदा. तो निपट बावळा आहे)
निपणजा (अ-१०७) (पुं.ना.) पणज्याचे वडील
निपणजी (अ-१०७) (स्त्री.ना.) = पणज्याची आई किंवा पणजीची आई
निपणती (अ-१०७) (स्त्री.ना.) = पणतूची किंवा पणतीची मुलगी
निपाणी (क-१०७३) (वि.) = १. जेथे मुबलक पाणी नाही असा गाव किंवा देश; २. ज्यात पाणी मिसळलेले नाही असे दूध
निमोल (अ-१०७) (वि.) = अनमोल
निरानिपटा, निरानिपटारा किंवा निरानिस्तरा (क-१०७९) (पुं.ना.) = १. समाप्त केलेल्या कामावर शेवटचा = सफाईचा हात फिरविणे; २. कामासाठी आणलेली किंवा जमवलेली साधनसामग्री जागच्या जागी ठेवणे; ३. समाप्त केलेले काम पुन्हा काळजीपूर्वक तपासून त्यात राहून गेलेल्या चुका दुरुस्त करणे
निरावणे (क-१०७९) (स.क्रि.) = वस्त्रे वगैरे जिन्नस हवेत किंवा उन्हात पसरून ठेवणे
निर्ददात किंवा निर्दधात (क्र. १०८२) (वि.) = ज्याला खाण्यापिण्याची पंचाईत नाही असा; सुस्थितीत असलेला
निर्धोक (क-१०८२) (वि.) = जेथे किंवा ज्यात काही धोका नाही असे स्थळ, व्यापार इत्यादी; सुरक्षित; अपायरहित असे
निर्बीज (क-१०८२) (वि.) = ज्याला काही आधार, प्रमाण किंवा पुरावा नाही असा आरोप, ठपका किंवा अशी बातमी
निर्युक्तिक (क-१०८४) (वि.) = असमंजसपणाचा; युक्तीशी न जुळणारा
निर्वाहक (क-१०८४) (पुं.ना.) = एखादे काम चालवणारा किंवा पार पाडणारा मनुष्य
निलागी (क-१०८५) (वि.) = १. किड्यांनी न खाल्लेले धान्य, लाकूड इत्यादी; २. ज्याला बहुधा कीड लागत नाही असे
निवळशंख (क-१०८६) (वि.) = १. अत्यंत निर्मळ, २. मूर्ख, ३. निर्धन, ४. निरक्षर
निवळले लोखंड (क-१०८६) (न.ना.) = वृद्ध असून धट्टाकट्टा आणि बळकट असा माणूस
निश्चक्र (क-१०८९) (वि.) = काहीही न खाता केलेला (उपास)
नि:संग (क-१०९०) (वि.) = जो चालरीत, शिष्टाचार इत्यादी पाळत नाही असा
निसळणे (क-१०९१) (स.क्रि.) = चकचकीत करणे; उजळा देऊन तकतकीत करणे

निस्तूक (क-१०९२-९३) (क्रि.वि.) = १. सर्वथैव, पूर्णपणे (उदा. माझा ताप निस्तूक गेला); २. फक्त (उदा. हा विद्यार्थी निस्तूक कर्मकांडी आहे); ३. अट्टल किंवा पक्का (उदा. किसन निस्तूक चोर आहे)

नीजमोड किंवा नीदमोड (क-१०९४) (स्त्री.ना.) = झोपमोड; झोपेत आलेला व्यत्यय

नीटवीट (क-१०१४) (क्रि.वि.) = उघडउघड, तक्रारीला जागा न राहता

नीदसुरा (अ-१०८) (वि.) = झोपाळू

नीस (क-१०९५) (पुं.ना.) = बारकाईने केलेली तपासणी किंवा सूक्ष्म परीक्षा

नेकबोल (क-१०९६) (वि.) = खरे बोलणारा

नेकसल्ला (क-१०९६) (पुं.ना.) = हितावह उपदेश

नेटपाट (क-१०९६) (पुं.ना.) = जोराचा प्रयत्न; निग्रहाची खटपट

नेटापाटाचा (क-१०९६) (वि.) = चिवट, दणकट, कसदार, कणखर (मनुष्य किंवा प्राणी)

नेटणे (क-१०९६) (अ.क्रि.) = झटणे; सर्व शक्ती खर्च करणे (उदा. तू नेटून अभ्यास केलास तर चांगल्या प्रकारे पास होशील)

नेपाळणे (क-१०९७) (स.क्रि.) = जमीन किंवा भिंतीचा गिलावा घोटून सपाट व गुळगुळीत करणे

नोकझोक (क-११००) (पुं. किंवा स्त्री.ना.) = ओझरते दर्शन किंवा ओझरती भेट (उदा. प्रतिभा नोकझोक दाखवून गेली)

नोकानोकी (क-११००) (स्त्री.ना.) = भाषणात टोमणे मारणे किंवा कुजके बोलणे

न्यूनांग (क-११०२) (वि.) = हात, पाय, डोळे इत्यादींपैकी एखादा अवयव ज्याला कमी आहे, असा मनुष्य किंवा पशू

पंक्तिभाऊ (क-११०४) (पुं.ना.) = एकत्र बसून किंवा एका पंक्तीत बसून जेवणारे लोक

पखरडा (क-११०४) (पुं.ना.) अस्तव्यस्त किंवा अव्यवस्थित स्थिती (उदा. खोलीत तुझ्या कपड्यांचा पखरडा पडला आहे)

पखरणे किंवा पखळणे (क-११०४) (स.क्रि.) = सामानसुमान अव्यवस्थितपणे इकडेतिकडे टाकणे

पखाल पार्वती (क-११०५) (स्त्री.ना.) = लठ्ठ व थुलथुलीत अंगाची स्त्री (हा शब्द निंदार्थी वापरतात.)

पघळ (अ-१०९) (वि.) = रुंद, सैल

पटकोडगा (क-१११२) (वि.) = अतिनिर्लज्ज, बेशरम

पट्टा ओढणे (किंवा ओढून ठेवणे) (क-१११३) (वाप्र.) = एखाद्या कामाला सुरुवात करणे (किंवा सुरुवात करून ठेवणे)

पडशिष्य (क-१११५) (पुं.ना.) = आपल्या शिष्याने तयार केलेला शिष्य
पडघर (क-१११५) (न.ना.) = नादुरुस्त व पडीत घर
पडदा (क-१११८) (पुं.ना.) = परकेपणाची किंवा बेभरवशाची भावना (उदा. त्याच्या-आमच्या मैत्रीत पडदा नाही)
पडनाव (क-१११५) (न.ना.) = कागदोपत्रीच्या नावाहून वेगळे असे व्यावहारिक नाव
पडभोजन (क-१११५) (न.ना.) = लग्नानंतर वरपक्षाने वधूपक्षाला दिलेली मेजवानी
पडू किंवा पड्या (क-१११९) (वि.) = मंद, संथ, मथ्थड
पणपणे (क-११२१) (अ.क्रि.) = १. उत्पन्न होणे; २. रुजणे; ३. जोराने वाढणे; ४. वैभवास चढणे. (तुळा— हिंदी शब्द 'पनपना')
पत्रदर्शनी (क-११२२) (क्रि.वि.) = पत्र पाहताच; पत्र हाती पडताच
पद्महस्त किंवा पद्महस्ती (क-११२६) (वि.) = ज्याचा हातगुण चांगला आहे असा; ज्याला सर्व कामांत यश मिळते असा
पन्नासणे (अ-११०) (अ.क्रि.) = पसरणे (उदा. ती बातमी हां हां म्हणता पन्नासली)
परगणा (क-११२९) (पुं.ना.) = कामाचा, व्यवहाराचा, अभ्यासाचा किंवा स्वयंपाकाचा पसारा
परटवणे (क-११३०) (न.ना.) = धोब्याकडे धुवायला द्यावयाचे किंवा त्याच्याकडून धुऊन आलेले वस्त्र
परमातखाऊ (क-११३२) (वि.) = निरुद्योगीपणात किंवा दुसऱ्यांकडून भोजने उकळण्यात मग्न; भूमीला भारभूत झालेला
परवचा (क-११३२) (पुं.ना.) = स्वत:संबंधी प्रौढीची, लांबलचक आणि कंटाळवाणी हकीगत
पवाडा (अ-१०९) (पुं.ना.) = विस्तार
पाइकी (अ-१११) (स्त्री.ना.) = चाकरी; सेवा
पांघरी (अ-११२) (स्त्री.ना.) = पांघरूण
फुलारी (अ-१२१) (पुं.ना.) = फुले विकणारा
बागमाळी (अ-१२४) (पुं.ना.) = बागेत काम करणारा नोकर
बावरा (अ-१२४) (वि.) = घाबरा, भ्रांत
बुळणे (अ-१२५) (स.क्रि.) = तोंडात झटपट कोंबणे
भांग्या (अ-१२९) (पुं.ना.) = भांग खाणारा
भिजट (अ-१३१) (वि.) = भिजलेले
मुसळ नेसणे (क-१०९९) (वाप्र.) = निर्लज्जपणे दुर्भाषण किंवा दुर्वर्तन करणे

मोकळणे (अ-१४०) (स.क्रि.) = सोडणे
राजस (अ-१४४) (वि.) = चांगले; सुंदर
रोखारोखी (अ-१४७) (क्रि.वि.) = रोखाने; मोल देऊन. (आमचा सगळा रोखारोखी व्यवहार असतो)
लोटालोटी (अ-१५१) (स्त्री.ना.) = ढकलाढकली; गर्दी
वादाळणे (अ-१५६) (स.क्रि.) = निऊन जाणे; वातड होणे; भिजट होणे
वाफारणे (अ-१५६) (स.क्रि.) = वाफेवर शिजवणे
विखराविखरी (अ-१५८) (स्त्री.ना.) = पसरापसरी, चिवडाचिवडी
सटपटणे (अ-१६७) (अ.क्रि.) = घाबरेघुबरे किंवा भयभीत होणे
सांदोसांदी (अ-१६९) (क्रि.वि.) = गल्लोगल्ली
सालोसाल (अ-१६९) (क्रि.वि.) = दरवर्षी; वर्षानुवर्षे
सोनपावला (अ-१७३) (वि.) = चांगल्या पायगुणाचा
सोपारे (अ-१७२) (वि.) = स्वल्प
हातदिवा (अ-१७६) (पुं.ना.) = हातात धरण्याचा दिवा
हातपंखा (अ-१७६) (पुं.ना.) = हातात धरण्याचा पंखा (उदा. हल्ली सर्वत्र विजेचे पंखे वापरात असल्यामुळे कोणी हातपंखा वापरत नाही)
हिरवट (अ-१७७) (वि.) = तुसडा

(वरील नोंदींत वापरलेल्या संक्षेपांचा निर्देशक्रमानुसार खुलासा : वि. = विशेषण, क्रि.वि. = क्रियाविशेषण, पुं.ना. = पुंलिंगी नाम, न.ना. = नपुंसकलिंगी नाम, अ.क्रि. = अकर्मक क्रियापद, स्त्री.ना. = स्त्रीलिंगी नाम, स.क्रि. = सकर्मक क्रियापद, पुं.अ.व.ना. = पुंलिंगी अनेकवचनी नाम, पुं.ना.ए.व. = पुंलिंगी नाम एकवचन, श.अ. = शब्दयोगी अव्यय, न.ना.एक.व. = नपुंसकलिंगी नाम एकवचन, न.ना.ए.व. = नपुंसकलिंगी नाम एकवचन, न.पुं.ना. = नपुंसकलिंगी व पुंलिंगी नाम, वाप्र. = वाक्प्रचार)

वरील शब्दांत फक्त दोन-तीन वाक्प्रचारांचा निर्देश केला आहे. परंतु आणखी काही वाक्प्रचार आणि म्हणी यांचाही 'जीर्णोद्धार' करण्यासारखा आहे. परंतु, निबंधाचा विस्तार होऊ नये, म्हणून त्यांचा अंतर्भाव वरील यादीत केला नाही.

## ४. पुनरुज्जीवनयोग्य शब्दांची वैशिष्ट्ये

वरील शब्दांचे विश्लेषण केले असता असे ध्यानात येते की, ह्या शब्दांत ते-ते अर्थ व्यक्त करण्याची क्षमता तर आहेच, पण त्याशिवाय त्यांमध्ये आणखीही काही वैशिष्ट्ये आहेत. ती अशी :

४.१ अखोड, आडखर्च, आडवेळ, काळवे, किडखाद, घाणणे, जाणपण, तातडसार, तावणे, तिपिकी, थेटखरेदी, थोडकावणे, दगदगणे,

दचक, दाखवणूक, दाब, दुकाळणे, दुधाणे, दुपायी, देठसुटा, धुमाधार, नजरबाज, नवघड, निघोर (निघोरी), पघळ, पाइकी, पांघरी, भिजट, वादाळणे, वाफारणे इत्यादी शब्द ते-ते अर्थ अगदी अचूकपणे व अनन्वयाने व्यक्त करतात. पाश्चात्य शैलीशास्त्राच्या परिभाषेनुसार ह्या व एतत्सदृश शब्दांना mot juste (= most appropriate) असे म्हणता येईल.

४.२ आलापाला, झगझगणे, टाकोटाक, तारोतार, तुरबुरणे, ददाची विद्या, दुपारीतिपारी, धशाफशा, धालाधाकटा, धुंडाधुंडी, नादवाद, नारावारा, निरानिपटारा, नीटवीट, पणपणे, रोखारोखी, लोटालोटी, सांदोसांदी ह्या ध्वन्यनुकारी शब्दांचे अर्थ मनाला सुखावतात आणि त्यांतील अक्षरांची पुनरावृत्ती कानांना रिझवते.

४.३ उगामुका, उभवणे, ऐलफैल, काळवे, गळवट, छिलणे, तांबडसांज, तीर्थकाक, तेलची, तोंडोतोंड, तोलणे, थोरावणे, दगडघाशी, दाढभर, देठसुटा, धारकशी, नजरपाहणी, नक्षत्रमाळ, लोटालोटी, सोनपावला, हातदिवा, हातपंखा इत्यादी शब्द त्या-त्या अर्थांची चित्रे डोळ्यांसमोर उभी करतात.

४.४ आलापाला, किडखाद, जीवट, तारोळा, तीर्थकाक, त्रेपत्री, त्रेसष्टी, देखणाऊ, धारबोळ, धुनक, नकळा, नापूस, नायरी, निघोर, पद्महस्त, पत्रासणे, पवाडा, पांघरी, बागमाळी, सटपटणे इत्यादी शब्दांतील नावीन्य चित्तवेधक आहे.

४.५ ऐलफैल, दगडघाशी, ददाची विद्या (किंवा बाराखडी), दाळपिठिया, दिलदप्तर, देखणाऊ, हिरवट इत्यादी काही शब्द आपापले अर्थ अप्रत्यक्ष रीतीने व कौशल्याने व्यक्त करतात.

४.६ अगाजा, अघननघन, ताठणे, तारकाबारका, तारोळा, तुकणे, तुरबुरणे, तुरा लावणे, तोलणे, थंड, थोरावणे, धर, निरानिपटा, निवळशंख, निस्तूक, पणपणे असे शब्द अनेकार्थक आहेत. त्यामुळे त्यांच्या वापराचे क्षेत्र व्यापक आहे.

४.७ अकळतनकळत, ददाची विद्या, दत्तात्रेयाची फेरी, दमडीपूत, दहीमही करणे, दातकसई, दामचुंबक, दाळपिठिया, दुचाळा, दुवाळणे, देखदुखी, धडकफडक, धार, धारकशी, धिरणे, धोशा, ध्यान, न च ननु, नजरबाज, नपड, नापूस, निघोर, नितांतणे, मुसळ नेसणे इत्यादी शब्दांचा मानवी वर्तन, विचारशैली, विशिष्ट मन:स्थिती, मनुष्य-स्वभावाच्या लकबी इत्यादींशी निकटचा संबंध आहे.

४.८ तीर्थकाक, तुरा लावणे, तोंड, त्रेसष्टी, थंडीचे पिल्लू, थिजवणे, थोटा पिंपळ, दगडघाशी, दरा, दांडारणे, दाताळणे, दिलदप्तर,

दिवसमुख, दोरा, दौलतीचा खांब, धर्मपुरी, धार, नक्षत्रमाळ, नाक, निवळलेले लोखंड, पखाल पार्वती इत्यादी शब्दांत मनमोहक रूपकगर्भता आहे.

४.९ अकढा, अखोड, आचंबणे, उभवणे, चावळणे, तिताली, तिसाला, तुकडबाबू, तेलची, थोडकावणे, दंवारणे, दळ्या, दिपवा, दुखरू, दुधाणे, देठसुटा, धुरकणे, निपट, निर्बीज, निलागी, पांघरी, फुलारी इत्यादी शब्द विस्तृत अर्थ सुटसुटीतपणे व्यक्त करू शकतात.

४.१० ऐनकिंमत, तारकीपारखी, तिपाठी, तिपिकी, तिशी, तूटपाऊस, त्रितय, थाळातांब्या, दमडीवर चमडी मिळवणे, दर येणे, दरठरोती, दरदाम, दाखवणूक, दाणापाणी, दामजड, दाळरोटी, दिक्कतखोर, दिवसबळ, देखतपत्र, देखीव, देघे, धनचळ, नवतरणे, नाचरी करणे, नाजूक काम, नापत, निजोखमी, निदावापत्र, नीस, रोखारोखी इत्यादी शब्द आणि वाक्प्रचार दैनंदिन व्यवहारांतील कृती व वस्तू यांच्याशी कमालीचे निगडित असल्यामुळे व्यवहारात चटकन व सहजपणे सामावून घेतले जातील, असे आहेत.

४.११ तिंबणे, दादर, धाम, धार, ध्यान, निपाणी, नि:संग, नोकझोक, पडदा, परगणा, परवचा, पवाडा इत्यादी शब्द सध्याच्या मराठी भाषेतही प्रचलित आहेत. परंतु वरील नोंदींनुसार हे शब्द जुन्या जमान्यात वेगळ्या अर्थांनी वापरले जात असत, असे जाणवते. ह्यांचा पुनर्वापर सुरू केल्यास मराठी भाषेत वेगळ्या व अधिकच्या अर्थच्छटांची भर पडेल.

४.१२ तांबडसांज, तिपिकी, तिरतिरा, तिलप्राय, तुकडमोड्या, तौरी, थप्पडखाऊ, दातकसई, दिलदप्तर, धरधरणे, धशाफशा, धुनक, धुपांगरा, धुळवरा, धूळदशा, धोंडमहिना, धोशा, नभश्चुंबक, नवतरणे, नक्षत्रमाळ, निघोर, निदावापत्र, निरानिपटा, नीजमोड, पडू, पद्महस्त इत्यादी अनेक शब्दांचे लेखन एकाहून अधिक प्रकारांनी होते. त्या शब्दांचे पुन:प्रचलन झाल्यास मराठी भाषेची शब्दसंख्या समृद्ध होईल.

४.१३ तांडव, ताथय्या, तेलंगभट, त्रिवाचा, थोटा पिंपळ, दत्तात्रेयाची फेरी, ददाची विद्या, धोंडमहिना, न च ननु, नाशिकची कल्हई, निचाड, पखाल पार्वती, पद्महस्त, सोनपावला, हातदिवा इत्यादी शब्द प्राचीन परंपरा, प्रथा, विद्या व संस्कृती यांच्याशी संबद्ध आहेत. ह्यांच्या पुनरुज्जीवनाच्या द्वारे संस्कृति-संवर्धनाचे कार्यही साधले जाईल.

४.१४ थेटखरेदी, थोप, दाबण, दुपरतणे, धरधरणे, नवतरणे हे शब्द इंग्रजीतील purchase at factory retail outlet, halt/stop, paperweight, to relapse, to convalesce, to renovate ह्या

शब्दांचे अर्थ समर्थपणे व्यक्त करणारे आहेत. अर्थात हे जुने शब्द भाषण-लेखनातील वरील इंग्रजी शब्दांची जागा तोलामोलाने भरून काढू शकतात.

४.१५ नाजूक काम-सारखी शब्दावली अनिष्ट अर्थ प्रच्छन्नपणे व्यक्त करू शकते.

५. मराठी भाषा बोलणारांनी व लिहिणारांनी, विशेषत: ललित लेखकांनी, शब्दकोशांचा साक्षेपाने अभ्यास करून वरीलसारखे पुनरुज्जीवनक्षम शब्द शोधून काढले आणि त्यांचा वापर आपल्या बोलण्या-लिहिण्यात पुन्हा सुरू केला, तर लेखाच्या सुरुवातीला वर्णिलेली मराठी भाषेची मरगळ अंशत: झांझडली तर जाईलच, पण त्याशिवाय भाषेत टवटवी उत्पन्न होईल. ह्या प्रक्रियेच्या ओघात काही भाषक किंवा लेखक वरीलसारख्या शब्दांत पदरच्या काही छटा मिसळतील. त्यांयोगे त्या शब्दांना अधिकचे पैलू पडतील. ही घटना भाषेच्या नैसर्गिक प्रवृत्तीचा विचार करता स्वागतार्हच मानावी लागेल. भावी शब्दकोशकाराला अशा शब्दांच्या नोंदी, त्या शब्दांना चिकटलेल्या नव्या अर्थच्छटांसह, कराव्या लागतील.

सध्या मराठी भाषेवर हिंदी व इंग्रजी ह्या भाषांचा खूप असर (!) पडत आहे. मराठी भाषकांना स्वभाषेविषयी पुरेशी आस्था नाही. शालेय, महाविद्यालयीन व विद्यापीठीय स्तरांवर भाषेची शुद्धता व भाषेचे सौष्ठव ह्या दोन्ही अंगांची उपेक्षाच होत आहे. थोडक्यात, मराठी भाषेला 'बाहेरचे' आणि 'आतले' असे दोन्ही प्रकारचे शत्रू आहेत. अशा प्रकारे परिस्थिती सर्वथा निराशाजनक आहे. तरीदेखील मराठी भाषा आणखी शेकडो वर्षे जिवंत राहील ह्या दुर्दम्य विश्वासापोटी काही जुन्या मराठी शब्दांचे पुनरुज्जीवन करून मराठी भाषेला 'नक्काळी' प्राप्त करून देता येईल, अशी भूमिका ह्या लेखात मांडली आहे. मराठी भाषेवर प्रेम करणारे ह्या भूमिकेचा यथोचित परामर्श घेतीलच.

❑❑

## संदर्भटीप

१. महादेवशास्त्री जोशी, आमचा वानप्रस्थ, प्रथमावृत्ती, पुणे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९८३, पृ.`११६.

❑❑❑

# ६.

# भाषांतर : समस्या व उपाय *

## १. अनुवाद आणि भाषांतर

इंग्रजीतील translation ह्या शब्दासाठी आपण मराठीत अनुवाद आणि भाषांतर असे दोन शब्द वापरतो. ह्यांपैकी अनुवाद हा शब्द 'अनु' उपसर्गयुक्त 'वद्' (प्रथम गण परस्मैपद) ह्या धातूपासून साधलेला असून त्याचा अर्थ, पूर्वी जे काही बोलले गेलेले असेल तेच पुन्हा बोलणे किंवा उच्चारणे, हा आहे. म्हणजेच अनुवाद हा शब्द पुनरुक्ती किंवा पुनरुच्चार हा अर्थ व्यक्त करतो. अशा पुनरुक्तीत मूळ उक्तीच्या भाषेहून भिन्न भाषेचा संबंध येत नाही. तसा संबंध 'भाषान्तर' (अन्या भाषा भाषान्तरम् असा ह्या सामासिक शब्दाचा विग्रह होतो) शब्दात येतो. एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत यथामूल व्यक्त करणे म्हणजे भाषांतर करणे होय. वस्तुस्थिती अशी असली तरी मराठी भाषेत अनुवाद व भाषान्तर हे दोन्ही शब्द समानार्थक मानले जात असून ते इंग्रजीतील translation ह्या शब्दाचा अर्थ व्यक्त करतात. म्हणून प्रस्तुत लेखात वरील दोन्ही शब्द परस्परांचे पर्यायवाचक म्हणून स्वीकारून वापरले आहेत. शिवाय, 'भाषान्तर'ऐवजी भाषांतर हे रूढ लेखनच लेखाच्या ह्यापुढील भागात पत्करले आहे. भाषांतर शब्दापासून भाषांतरकार व भाषांतरकर्ता हे दोन कर्तृवाचक शब्द मराठीत प्रचलित आहेत, ही बाब सर्वश्रुत आहे.

## २. भाषांतरकाराची योग्यता व पूर्वतयारी

२.१ भाषांतरकाराला भाषांतरासाठी हस्तलिखित किंवा मुद्रित असा कोणत्याही

---

* पूर्वप्रसिद्धी – 'साहित्यसूची' (पुणे), दिवाळी अंक १९८९

स्वरूपातील मजकूर दिला जाण्याची शक्यता असते. भाषांतरकाराला भाषांतरासाठी मिळालेल्या लिखाणाची लिपी उत्तम प्रकारे अवगत असली पाहिजे. उर्दू, सिंधी, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम्, पंजाबी इत्यादी भारतीय भाषांच्या लिप्यांचे स्वरूप देवनागरी लिपीहून सर्वथा वेगळे आहे. म्हणून भाषांतरकाराला ह्या लिप्यांपैकी एखाद्या लिपीतील लिखाणाचे भाषांतर करावयाचे असल तर त्याला त्या लिपीचे, वर्णमालेचे व अक्षरसिद्धीचे पक्के ज्ञान असणे अगत्याचे असते.

२.२ संबंधित लिखाणाच्या लिपीच्या ज्ञानाखेरीज भाषांतरकर्त्याला त्या लिखाणाच्या भाषेचे व्याकरण, त्या भाषेतील नाम-सर्वनाम-प्रभृतींची लिंगनिष्ठ व वचननिष्ठ विशिष्ट रूपे, शब्दांची विभक्तिरूपे, विशिष्ट अर्थी होणारी कालवाचक व अर्थवाचक क्रियापदरूपे, संबंधित भाषेतील पूर्व-अपर-प्रत्ययांच्या योगे साधली जाणारी धातुसाधित-प्रभृती विविध रूपे, संबंधित भाषेतील म्हणी व वाक्प्रचार, भाषेत रूढ असलेल्या विशिष्ट शब्दरचना (idioms and phrases) आणि संबंधित भाषकांची सांस्कृतिक परंपरा ह्या गोष्टीही चांगल्या प्रकारे ठाऊक असणे आवश्यक असते.

२.३ भाषांतरकाराच्या ठायी आवश्यक असणारी तिसरी क्षमता म्हणजे त्याला मूळ लेखकाच्या हस्तलिखितातील 'हस्तदोष' समजले पाहिजेत. म्हणजे असे की, मूळ लेखकाच्या अज्ञानाने, अनवधानाने किंवा निष्काळजीपणाने झालेल्या चुका हेरण्याची कुवत व सवय भाषांतरकाराच्या ठिकाणी असणे आवश्यक असते. हिंदी भाषेतील काही शब्दांच्या आधारे हा मुद्दा स्पष्ट करू.

| **हिंदी शब्द व त्यांचे अर्थ** | | **चुकीच्या लेखनामुळे होणारे अर्थान्तर** | |
|---|---|---|---|
| **शब्द** | **अर्थ** | **चुकीचे लेखन** | **अर्थान्तर** |
| आलि | भ्रमर, भुंगा | अली | सखी, मैत्रीण |
| आदि | वगैरे | आदी | सराईत |
| ओर | प्रति, कडे | और | व, आणि |
| घाटा | तोटा | घाटी | दरी |
| चिर | कायमचा | चीर | वस्त्र |
| दाईं | डावा/डावी | दाई | मोलकरीण |
| पत्र | पत्ता | पत्ता | पान |
| परिणाम | फळ | परिमाण | प्रमाण |
| पिक | कोकिळ | पीक | पिंक |

| | | | |
|---|---|---|---|
| बदन | शरीर | वदन | तोंड |
| बुरा | वाईट | बूरा (चीनी) | पिठीसाखर |
| यही | हाच/हीच | यहीं | येथेच |
| शेर | वाघ | सेर | शेराचे माप |

२.४ भाषांतरासाठी पुढ्यात असलेल्या मजकुराचा साहित्यप्रकार हा घटकही ह्याबाबतीत विचारात घेण्याजोगा असतो. कारण भाषेची ढब किंवा ठेवण साहित्य-प्रकारानुसार वेगवेगळी असते. उदाहरणार्थ, छंदोबद्ध कवितेची भाषा व्यावहारिक व गद्यसाहित्यिक भाषेहून वेगळी किंवा विचलित (deviated) असते; तिचे व्याकरण व्यावहारिक व गद्यभाषेच्या व्याकरणाहून काही अंशी निराळे असते; तिच्यातील शब्दांच्या अर्थांचा निश्चय करताना संयोग-विप्रयोग-साहचर्य-प्रभृती अर्थनियामके, सामाजिक प्रथाश्रद्धा, साहित्यिक संप्रदाय, शुभाशुभविषयक संकेत, संदर्भ, तर्कसंगती इत्यादी अनेक बाबींचा विवेक करावा लागतो. नाटकाची भाषा बोलीभाषेच्या व संभाषणाच्या जवळ जाणारी असते; कथा-कादंबऱ्यांची भाषा काव्याच्या भाषेच्या तुलनेने कमी विचलित असते, तर निबंध-प्रबंधांची भाषा नियमबद्ध व प्रमाणस्वरूपी असते. त्यामुळे भाषांतरकर्त्याला वरील तपशिलाचे भान ठेवून भाषांतर करावे लागत असते.

२.५ ह्या संदर्भात आणखीही एका लहानशा गोष्टीचा उल्लेख करावयास हवा. ती गोष्ट ही की, ज्या भाषांचा मूलस्रोत एकच असतो, त्यांच्या ठेवणीत फार मोठा फरक नसतो. उदाहरणार्थ, मराठी, हिन्दी, गुजराती इत्यादी भाषांचे मूळ उगमस्थान संस्कृत आहे. त्यामुळे त्या भाषांत अनेक बाबतींत सारखेपणा आहे. त्यामुळे ह्यांपैकी एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत उतरविण्याचे काम बरेच सुलभ असते.

एकंदरीने भाषांतरकाराला अंगीकृत कार्यात यशस्वी व्हावयाचे असेल, तर त्याला वरील सर्व गोष्टींशी दृढ परिचय करून घ्यावा लागतो. एवढी पूर्वतयारी झाल्यानंतर प्रत्यक्ष भाषांतराचे कार्य करताना त्याला कोणकोणत्या गोष्टींच्या बाबतीत दक्षता बाळगावी लागते, कोणत्या गोष्टींचा बारकाईने विचार करावा लागतो, कोणती पथ्ये पाळावी लागतात, कोणते धोके टाळावे लागतात आणि मूळ लिखाणावर कोणकोणते संस्कार-परिष्कार करावे लागतात, त्याचा आता सोदाहरण विचार करू.

## ३. शब्दार्थविवेक

३.१ भाषेतील प्रत्येक शब्दाला एक अर्थ असतो किंवा एकाहून अधिक अर्थ असतात आणि त्यांचे तपशीलवार वर्णन त्या-त्या भाषेच्या कोशात केलेले असते. अनुवादकाला शब्दांचा अर्थ निश्चित करण्यासाठी कोशाची मदत घ्यावीच लागते, तरच त्याला मूळ लिखाणाचा यथावत व अविकृत अनुवाद करता येतो. परंतु ह्याबाबतीत अनुवादकाची कधीकधी फसगत होण्याची धास्ती असते. काही भाषांत रूपत: सारखे पण अर्थत: निराळे असे अनेक शब्द असतात. त्यांच्या त्या-त्या भाषांतील अर्थच्छटांशी अनुवादकाचा उत्तम परिचय नसल्यास आणि त्याने त्या-त्या शब्दांचे अर्थ कोशग्रंथांतून शोधून काढण्याची तसदी न घेतल्यास अनुवादात चुका होण्याची संभाव्यता असते. उदाहरणार्थ, उतारू, उत्तेजित, उपद्रव, उपन्यास, उपाधि, ऊन, खत, खरा, खाली, खुराक, खोटा, घाम, जाडा, टीका, तथा, त्रास, दरी, दर्शक, दादा, देवता, धावा, पत्ता, प्रकृति, बंदर, मौलिक, यातायात, लाट, विधान, व्यस्त, शिक्षा, संधि, संवाद, संशोधन, सहसा, स्वस्थ, हलवा, हकीकत हे व असेच आणखी अनेक शब्द मराठीत तसेच हिंदीतही रूढ आहेत; परंतु त्यांचे ह्या दोन्ही भाषांतील अर्थ निरनिराळे आहेत. ह्या वस्तुस्थितीकडे काटेकोरपणे लक्ष देऊनच अनुवादकाला अनुवाद करावा लागतो. नाहीतर तो चुकीचा होण्याची शक्यता असते. काही उदाहरणांद्वारे ह्या मुद्याचा खुलासा करू. मराठीत दीर ह्या शब्दाला मोठा व धाकटा ही विशेषणे लावून अभिप्रेत अर्थ व्यक्त केला जातो, पण हिन्दीत जेठ (ज्येष्ठ शब्दापासून साधलेला शब्द) व देवर असे दोन वेगळे शब्द आहेत. मराठीत मुलाचा मुलगा (= नातू) व मुलीचा मुलगा (= नातू) अशी स्पष्टीकरणे करावी लागतात, पण हिंदीमध्ये ते अर्थ व्यक्त करणारे पोता व नाती असे दोन स्वतंत्र शब्द आहेत. हिंदीच्या दृष्टीने 'रामानुजने अपनी इच्छासे वन का वरण किया।' हे वाक्य योग्य. परंतु मराठीत 'वरण'चा वेगळा अर्थ असल्यामुळे ह्या वाक्याचा मराठी अनुवाद 'रामानुजाने (= रामाच्या धाकट्या भावाने, लक्ष्मणाने) स्वेच्छया वनवास पत्करला', असाच करणे इष्ट. हिंदीत 'चाहे' ह्या अव्ययाचा अर्थ 'मग' असा आहे. तो ध्यानी घेऊन 'चाहे वह अयोध्या हो या वन हो' हे वाक्य मराठीत 'मग ती अयोध्या असो किंवा जंगल असो', असेच भाषांतरित करणे योग्य.

३.२ आता काही संस्कृत शब्दांचे अवलोकन करू. निष्कारण शब्दाचे निर्निमित्त व निरुद्दिष्ट असे दोन अर्थ आहेत. पण 'ब्राह्मणेन निष्कारणं

धर्म: षडङ्ग: वेद: अध्येय: ज्ञेयश्च' ह्या वाक्याचे भाषान्तर करताना निष्कारणं शब्दाचे निरपेक्षपणे असे भाषान्तर करणे आवश्यक आहे. 'काव्यस्य अलम् अलङ्कारै:' यातील 'अलम्' शब्दाचा अनुवाद निरुपयोगी किंवा व्यर्थ असा करणे अपेक्षित आहे. तद्वत 'वक्ष्येऽहं काव्यशास्त्रं अनुत्तमम्।' यातील 'अनुत्तम' म्हणजे उत्कृष्ट होय. न्यायशास्त्र (= प्राचीन तर्कशास्त्र) अंत:करणाला (किंवा मनाला) ज्ञानेंद्रिय मानते, तर वेदान्तशास्त्र त्याला द्रव्य मानते. हे ज्या अनुवादकाला ठाऊक आहे तो अनुवादक 'अंत:करणं द्रव्यं काव्योपादानम्' ह्या सूत्राचा अनुवाद 'द्रव्यरूप असलेले अंत:करण हे काव्याचे उपादान होय', असाच अचूकपणे करील. 'अ' ह्या पूर्वप्रत्ययाचे संस्कृतात सादृश्य, अभाव, भेद, अल्पता, अप्राशस्त्य व विरोध असे सहा अर्थ मानण्यात आले आहेत. हे ज्याला ठाऊक नसेल त्याला अब्राह्मण:, अज्ञानम्, अपट:, अनुदरा, अकाल: व अनीति: ह्या शब्दांचे यथावत अनुवाद करता येणार नाहीत. 'अनु' ह्या अव्ययाचा अर्थ 'पश्चात' असा आहे, हे सर्वांना ठाऊक आहे. पण 'जपं अनु प्रावर्षत्' (= जपाच्या परिणामी वृष्टी झाली), 'अनु हरिं सुरा:' (= सुर म्हणजे देव हरीहून खालच्या श्रेणीचे आहेत) इत्यादी वाक्यांचा बिनचूक अनुवाद व्याकरणाच्या साक्षेपी अभ्यासकालाच शक्य असतो. 'स: पुरुष: पितरति।' ह्या वाक्याचा 'तो पुरुष पित्याप्रमाणे आचरण करतो' असा यथायोग्य अनुवाद नामधातूंच्या ज्ञानाद्वारेच होऊ शकतो. संस्कृतात 'तद्' ह्या सर्वनामाचा क्वचित 'प्रसिद्ध' ह्या अर्थी प्रयोग करतात. उदाहरणार्थ, 'सा रम्या नगरी!' पण 'तद्'ची आवृत्ती (repetition) केली (उदाहरणार्थ, 'तेषु तेषु स्थानेषु।') की 'तद्'चा विभिन्न किंवा विविध असा अर्थ होतो. तसेच 'यद्'ची पुनरावृत्ती केली की, सगळे किंवा समस्त असा अर्थ होतो (उदाहरणार्थ, 'यद् यद् एषा कथयति।'). 'खलु' ह्या अव्ययाच्याही खचित, विनवणी, विचारणा, निषेध, कारण, पादपूरण, वाक्यालंकार अशा विविध अर्थच्छटा आहेत. बिनचूक अनुवादासाठी ह्यांच्या ज्ञानाची आवश्यकता असते.

३.३ ह्याच संदर्भात सामासिक शब्दांचा विचार करणे योग्य ठरेल. मराठी, हिन्दी व इंग्रजी भाषांत लांबलचक समास करण्याची प्रथा नाही. परंतु संस्कृत भाषेत तसे समास केले जातात. किंबहुना समास हे संस्कृत भाषेचे एक आभूषण आहे, एक वैभव आहे. सामासिक शब्दांतील घटकांचे पौर्वापर्य, अर्थनिश्चितीचे नियम, समासदृष्ट्या पदांची योग्यता इत्यादी बाबींसंबंधी संस्कृत व्याकरणात नियम घालून दिलेले आहेत. अनुवादकाला त्या नियमांचे भान ठेवून अनुवाद करावयाचा असतो.

उदाहरणार्थ, 'पर्यन्तरेखागणनाकृतान्त', 'अम्लानप्रतिभाप्रकर्षोत्प्रेक्षितेन', 'गीर्वाणसारकणनिर्मितगात्रम्' इत्यादी दीर्घ समासांतील शब्द सुटे करून व मूळ आशय टिकवून धरून त्यांचे अनुवाद करावयाचे असतात. त्यासाठी दोन्ही भाषांतील समर्पक शब्द भाषांतरकाराला ठाऊक असणेही आवश्यक असते.

## ४. व्याकरणविचार

४.१ अनुवाद हे द्वैभाषिक कार्य आहे. त्यामुळे अनुवादकाला संबंधित दोन्ही भाषांतील व्याकरणाच्या खाचाखोचा दक्षतेने ध्यानात ठेवून अनुवादकार्य करावयाचे असते. प्रत्येक भाषेत शब्दांच्या लिंगवचनांसंबंधी काही निश्चित नियम असतात. उदाहरणार्थ, मराठीतील 'पत्नी' ह्या अर्थाचे संस्कृतातील कलत्र व दारा हे शब्द अनुक्रमे नपुंसकलिंगात व पुल्लिंगात वापरले जात असतात. मराठी आत्मा, महिमा, पोलीस इत्यादी शब्द पुल्लिंगात असून व्यक्ती, देवता इत्यादी शब्द स्त्रीलिंगात आहेत, तर ह्याच्या उलट हिंदीत पहिले तिन्ही शब्द स्त्रीलिंगात असून शेवटचे दोन शब्द पुल्लिंगात आहेत. वाक्यातील क्रियापदाचे रूप लिंगवचनानुसार बदलत असल्यामुळे वरीलसारखा लिंगभेद अनुवाद करताना लक्षात ठेवावा लागत असतो. उदाहरणार्थ, 'काशी की महिमा अपार है।' ह्या हिन्दी वाक्याचा मराठी अनुवाद 'काशीचा महिमा अपार आहे', असा होतो तर 'ती व्यक्ती उभी आहे' ह्या मराठी वाक्याचे हिन्दी भाषांतर 'वह व्यक्ति खड़ा है।' असे होते.

४.२ भाषान्तरकाराला वचनविवेकही करावा लागतो. उदाहरणार्थ, संस्कृतात कलिंग, वंग, गुर्जर इत्यादी देशवाचक शब्द नेहमी अनेकवचनी असतात, पण 'कलिंगदेश' मात्र एकवचनात असतो. तसेच दाराः, आपः, वर्षाः, सिकताः इत्यादी काही ठरावीक शब्द संस्कृतात नेहमी बहुवचनात असतात, पण त्यांची मराठीत भाषांतरे करताना पत्न्या, जळे ('जळ'चे अनेकवचन) इत्यादी प्रयोग करण्याची रूढी नाही. राम, कृष्ण, हनुमान इत्यादी देव आणि वाल्मीकी, नारद इत्यादी महर्षी यांचे वाचक शब्द हिंदीत बहुवचनात ठेवण्याचा प्रघात आहे. त्यामुळे 'राम सीतेचा पती होता' ह्या मराठी वाक्याचे हिन्दीकरण 'राम सीता के पति थे।' असे होते. देवदेवता, संतसत्पुरुष, महात्मा, इत्यादींचे 'दर्शन' हा अर्थ व्यक्त करण्यासाठी हिन्दीत बहुवचनाचा प्रयोग करतात. उदाहरणार्थ, 'मैंने श्रीकृष्ण के दर्शन किये।', परंतु मराठीत ह्या वाक्याचे भाषांतर 'मी श्रीकृष्णाचे दर्शन घेतले' असे एकवचनीच होते.

४.३ मराठीत व हिन्दीत विभक्ति-प्रत्ययांच्या बाबतीत थोडासा फरक आहे, हे खालील उदाहरण- वाक्यांवरून स्पष्ट होईल :

| **हिन्दी वाक्य** | **मराठी अनुवाद** |
|---|---|
| इसी आस्था और विश्वास के साथ मैं विदेश गया। | ह्याच आस्थेने व विश्वासाने मी परदेशी गेलो. |
| राजा की दो लड़कियाँ थीं। | राजाला दोन मुली होत्या. |
| वह बम्बई (किंवा मुंबई) जाएगा। | तो मुंबईला जाईल. |
| विमलाने उनसे प्रार्थना की। | विमलाने त्यांना विनंती केली. |
| उन दोनों में पटती नहीं। | त्या दोघांचे पटत नाही. |
| मैंने तुमसे/आपसे पूछा। | मी तुम्हांला/आपणांस विचारले. |

ह्यावरून हे लक्षात येते की, अनुवादकाने विभक्ति-प्रत्ययांच्या बाबतीत साक्षेप बाळगावयास हवा असतो.

## ५. परिवर्तन-प्रक्रिया

५.१ कथा, कादंबरी, नाटक, निबंध इत्यादी प्रत्येक प्रकारचे लिखाण अनेक वाक्यसमूहांनी सिद्ध झालेले असते. असा प्रत्येक वाक्यसमूह लहानमोठ्या वाक्यांचा बनलेला असतो. अशी वाक्ये क्वचित एकशब्दात्मक (उदाहरणार्थ, होय; असे?; नाही; आलो!; म्हणजे?; काय?; कोठे?, इत्यादी) असतात पण प्राय: बहुशब्दात्मकच असतात. वाक्यातील शब्दांचा व वाक्यसमूहातील वाक्यांचा एक ठरावीक क्रम असतो. संस्कृत भाषेत प्रत्येक शब्द (म्हणजे 'पद') प्रत्यययुक्त असल्यामुळे वाक्यान्तर्गत शब्दक्रम महत्त्वाचा नसतो. पण मराठी व इंग्रजी भाषांत त्याला महत्त्व असते, किंबहुना तो बाधित झाल्यास अर्थभेद, अर्थहानी इत्यादी होण्याची संभाव्यता असते. अनुवादकाला ह्या बाबतीत सावधगिरी बाळगावी लागत असते. काही वाक्यांचे अवलोकन करू.

५.२ 'हतविलोचन: हर:' आणि 'मुग्धा गुर्जरभूमिपालमहिषी' ह्या संस्कृत शब्दसंघटनांचे मराठी अनुवाद अनुक्रमे 'शंकराचे नेत्र लुब्ध झाले (= खिळले)' आणि 'गुजरातच्या राजाची भाबडी पट्टराणी' असे होतात. ह्यांत दोन भाषांतील शब्दरचनांचे शब्दानुक्रम वेगळे असल्याचे स्पष्टपणे जाणवते. संस्कृतमध्ये हेतुदर्शक पंचमी विभक्तीतील शब्द वाक्याच्या शेवटी योजतात, तर मराठीत त्याचे स्थान बदलावे लागते. उदाहरणार्थ, 'ईश्वरो द्विविध: कवि: कर्ता इति भेदात्।' ह्याचे

मराठीकरण 'ईश्वर द्विविध आहे कारण त्याचे कवी व कर्ता असे दोन प्रकार आहेत' (किंवा ईश्वराचे कवी व कर्ता असे दोन प्रकार असल्यामुळे ईश्वर द्विविध आहे) असे होते आणि 'धर्मयोर् एकनिर्देशोऽन्यस्य संवित् साहचर्यात्।' ह्या सूत्राचे मराठी भाषांतर 'दोन गुणधर्मांपैकी एका गुणधर्माचा उल्लेख केल्यास दुसऱ्या गुणधर्माचे ज्ञान (त्या दोन गुणधर्मांच्या परस्पर-) साहचर्यामुळे होते', असे होते. ह्या दोन सूत्रांतील 'भेदात्' व 'साहचर्यात्' ह्या दोन पंचम्यन्त संस्कृत शब्दांच्या स्थानांचा मराठी अनुवादात बदल झाला आहे. आता दोन इंग्रजी वाक्ये पाहू. 'What are potatoes today?' व 'Who is to blame?' ह्या इंग्रजी वाक्यांचे मराठी अनुवाद क्रमश: 'आज बटाटे काय भावाने आहेत?' (किंवा 'आज बटाट्यांचा काय भाव आहे?') व 'दोष कोणाला द्यायचा?' असे होतात. ह्या मराठी वाक्यांतही मूळच्या वाक्यांचा शब्दानुक्रम परिवर्तित झाल्याचे स्पष्टपणे जाणवते. आता काही हिन्दी वाक्यांचा विचार करू.'प्रस्तुत है उक्त घटना का चित्रण', 'क्या अब घर चलेंगे?', 'उसीको नारद नाम देते हैं— राम।' आणि 'कपड़ा सिकुडेगा तो नहीं?' ह्या हिन्दी वाक्यांची मराठी भाषांतरे क्रमश: 'वरील घटनेचे चित्रण सादर करीत आहोत,' 'आता घरी येणार का?', 'त्यालाच नारद राम असे म्हणतो' (किंवा 'नारद त्यालाच राम असे म्हणतो') आणि 'कापड आटणार नाही ना?'). ह्यात झालेला शब्दक्रमातील बदल सहज लक्षात येण्यासारखा आहे.

५.३ असाच बदल दीर्घ वाक्यांतील घटकांमध्येही करावा लागतो. उदाहरणार्थ, 'Rama returned to Ayodhya after the monkeys had taken Lanka' ह्या इंग्रजी वाक्यातील घटकांचे क्रम मराठीत 'वानरांनी लंका घेतल्यानंतर राम अयोध्येला परतला' असे आणि संस्कृतात 'कपिभि: गृहीतायां लङ्कायां राम: अयोध्यां निववृते' असे बदलतात. आणखी एक वाक्य पाहू. 'मी अजून जिवंत असताना चंद्रगुप्तावर कोण मात करू इच्छितो?' ह्या मराठी वाक्याचे इंग्रजी व संस्कृत अनुवाद क्रमश: पुढीलप्रमाणे होतील : 'Who, while I am still alive, wishes to overcome Candragupta?', 'क एव मयि स्थिते चन्द्रगुप्तं अभिभवितुं इच्छति?' आता एखाद-दोन हिन्दी वाक्यांचे अवलोकन करू.

| **हिन्दी वाक्य** | **मराठी अनुवाद** |
|---|---|
| 'यही रामायण का सन्देश है— सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् | 'सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दु:खभाग् भवेत् -हाच रामायणाचा |

| | |
|---|---|
| दुःखभाग् भवेत्।' | सन्देश (किंवा हीच रामायणाची शिकवण) आहे.' |
| 'रामायण में संस्कार शब्द का सारगर्भित प्रयोग मिलता है— दो विशिष्ट प्रसंगों में।' | 'रामायणात दोन विशिष्ट प्रसंगी संस्कार शब्दाचा सारगर्भ प्रयोग आढळतो.' |

"Characters in plays and novels never talk quite like people do in life" हे इंग्रजीतील वाक्य 'आपण माणसे व्यवहारात जशी बोलतो तशी नाटक-कादंबऱ्यांतील पात्रे बोलत नाहीत', असे मराठीत उतरवणे योग्य. विवेकानंदांच्या खालील तीन वाक्यांचे मराठी तर्जुमे पाहा :

| इंग्रजी वाक्य | मराठी भाषांतर |
|---|---|
| The totality of all souls, not the human alone, is the Personal God. | केवळ मानवांच्याच नव्हे तर सर्वच प्राण्यांच्या आत्म्यांची समष्टी म्हणजे सगुण ईश्वर होय. |
| That was the ground of my six years fight- that I would not accept her. | मी तिला मानणार नाही ह्या एका मुद्द्यावर मी (सतत) सहा वर्षे झगडत होतो. |
| 'I am for no action', said the Swami speaking slowly and with a long pause. | बराच वेळ थांबून स्वामीजी आस्ते आस्ते म्हणाले, 'प्रतिकार करू नये या मताचा मी आहे.' |

५.४ ह्यानंतर परिवर्तनाच्या आणखी एका प्रक्रियेकडे वळू. अनुवादकाला अनेकदा मूळच्या कर्तरी वाक्याचे कर्मणी वाक्यात वा कर्मणी वाक्याचे कर्तरी वाक्यात रूपांतर करणे इष्ट व आवश्यक वाटते. कारण तसे करणे अनुवादाच्या भाषेशी जास्त जुळतेमिळते असते. उदाहरणार्थ, खालील जोड्या पाहा :

| इंग्रजी वाक्य | मराठी भाषांतर |
|---|---|
| 'One day the Swami was asked.' | 'एके दिवशी (कोणीतरी) स्वामीजींना विचारले.' |
| 'Religion was never preached by planners.' | 'योजनाकर्त्यांनी कधीच धर्माचा उपदेश केला नाही.' |
| 'Your life will be changed by this book.' | 'हा ग्रंथ तुमचे जीवन बदलून टाकील.' |

| 'You will be told when the time comes.' | 'वेळ येईल तेव्हा तुला/तुम्हांला सांगेन/सांगू.' |
|---|---|

५.५ परोक्षापरोक्ष-निवेदनाच्या बाबतीतही हाच उपाय अवलंबावा लागतो. म्हणजे कधी परोक्षाचे अपरोक्षात तर कधी अपरोक्षाचे परोक्षात भाषांतर करावे लागते. एखाद-दोन उदाहरणांद्वारे हा मुद्दा स्पष्ट करू. खालील इंग्रजी उतारा वाचा :

'It was in Almora that a certain elderly man, with a face full of amiable weakness, came and put him a question about karma. What were they to do, he asked, whose karma it was to see the strong oppress the weak?'

ह्या उताऱ्याचा पुढीलप्रमाणे अनुवाद ग्राह्य ठरेल— 'ती अल्मोड्यातील गोष्ट आहे. एकदा कोणी एक वयस्कर व दुबळा पण चेहऱ्यावर प्रेमळ भाव असलेला मनुष्य स्वामीजींकडे आला आणि त्याने कर्मविषयक एक प्रश्न विचारला. त्याचा प्रश्न होता— 'बलवान दुर्बळांना छळतात हे बघण्याचेच ज्यांच्या कर्मात आहे त्यांनी काय करावे?'

पुढील इंग्रजी वाक्यांच्या अनुवादाच्या बाबतीतही वरीलसारखेच फेरफार करावे लागतात.

'Answering the remark of a disciple who felt that it would be better for her to come back to this life again and again and help the causes that were of interest to her instead of striving for personal salvation with a deep longing to get out of life.'

ह्या वाक्यांचा सुगम मराठी अनुवाद असा होऊ शकेल : "एकदा स्वामीजींच्या एका शिष्येने पुढील शब्दांत आपले मनोगत व्यक्त केले : 'मला जर इहलोकी पुन्हापुन्हा जन्म घेता आला तर फार बरे वाटेल. कारण तसे घडून आले तर ह्या जीवनाच्या कटकटींतून सुटण्याच्या इच्छेने वैयक्तिक मुक्तीसाठी धडपडण्याऐवजी माझ्या आवडीची ध्येये सुकर करीन.' ह्याला उत्तर देताना..."

एकंदरीने, वर वर्णिल्याप्रमाणे, परिवर्तन-प्रक्रिया व्यापक व बहुमुखी असते.

## ६. अर्थाचे स्पष्टीकरण व शब्दांची पदरमोड

६.१ भाषांतरकाराला एका भाषेतील आशय वाचकांना यथामूल व पूर्णपणे

समजेल अशा पद्धतीने दुसऱ्या भाषेत व्यक्त करावयाचा असतो. तसे करताना त्याला संबंधित दोन्ही भाषांच्या स्वाभाविक वैशिष्ट्यांकडे लक्ष द्यावे लागते. संस्कृतसारखी भाषा समासबहुल असल्यामुळे ती एखाद-दोन शब्दांत बराच अर्थ व्यक्त करू शकते. मराठी भाषेची प्रकृती दीर्घ समासांना अनुकूल नाही. त्यामुळे मूळ मजकुराचा आशय व्यक्त करण्यासाठी मराठी अनुवादकाला एखाद्या शब्दाची (प्रसंगी एखाद्या वाक्याचीही) पदरमोड करावी लागते. क्वचित्-स्थळी मुळातील शब्दांचे, संकल्पनांचे वा भावनांचे परस्परसंबंध विशद व्हावेत ह्यासाठीही अनुवादकाला संक्षेप-विस्ताराचे धोरण अवलंबावे लागते. काही उदाहरणांच्या आधारे हा मुद्दा स्पष्ट करू.

| संस्कृत वाक्ये | मराठी अनुवाद |
|---|---|
| 'समुद्रस्य जलं लवणम्।' | समुद्राचे पाणी खारट (असते). |
| 'ईश्वरस्य प्रसादेन जीवामि।' | परमेश्वराच्या कृपेने (मी) जिवंत आहे/जगत आहे. |
| 'वारिणां निधिः उदधिः।' | पाण्याचा निधी (म्हणजे) समुद्र (होय). |
| 'शठानां चरितं गर्हणीयम्।' | ठकांचे आचरण निंद्य (असते). |
| 'तस्मै अच्युताय नमः?' | त्या विष्णूला (माझा) नमस्कार (असो) किंवा त्या विष्णूला (मी) नमस्कार (करतो). |
| 'प्रथमं दिव्यः प्रयत्नः उपदिश्यते, ततः पौरुषः।' | 'प्रथम दैवी उपायांचा उपदेश (करतो) व त्यानंतर मानवी (उपायांचा उपदेश करतो). |

वरील अनुवादवाक्यांवरून हे स्पष्ट होते की, अनुवादप्रसंगी क्रियापदे, सर्वनामे व वाक्यांश अशा अनेक भाषा-घटकांची पदरमोड करावी लागते. शिवाय, संबंधित भाषेच्या प्रथेनुसार शब्दांच्या वचनप्रयोगातही फेरबदल करावा लागतो (उदाहरणार्थ, संस्कृत 'वारिणां' ह्या अनेकवचनी रूपाचे 'पाण्याचा' असे एकवचनी रूपांतर).

संस्कृतातील सूत्रबद्ध शास्त्रीय ग्रंथांचा अनुवाद करताना सूत्रांचा पूर्वापर-संबंध ध्यानात घेऊन काही अध्याहृत शब्दांचा अनुवाद करावा लागतो. उदाहरणार्थ, वामन नामक शास्त्रकाराच्या ग्रंथात 'कलाशास्त्रेभ्यः कलातत्त्वस्य संवित्!', 'कामशास्त्रतः कामोपचारस्य।' अशी लागोपाठची दोन सूत्रे आहेत. त्यांची भाषांतरे अशी होतात : '(गीत, चित्र, नृत्य इत्यादी) कलांची (मीमांसा करणाऱ्या) शास्त्रीय ग्रंथांपासून (त्या-त्या)

कलांच्या मूलतत्त्वांचे ज्ञान (होते).' 'कामशास्त्रावरील ग्रंथापासून काम-व्यवहाराचे (ज्ञान होते).' येथे कंसांत दर्शविलेले शब्द पदरचे वापरून सूत्रार्थ स्पष्ट करावा लागतो. ही पद्धत सर्वच शास्त्रीय ग्रंथांच्या अनुवादाच्या बाबतीत अवलंबावी लागते.

६.२ आता काही इंग्रजी वाक्यांच्या अनुवादाचे अवलोकन करू.

| इंग्रजी वाक्य | मराठी अनुवाद |
|---|---|
| It was mere play. And so of life. | ती केवळ लीला (किंवा क्रीडा) होती आणि जीवनाचेही तसेच (आहे) (जीवनही एक लीला किंवा क्रीडाच आहे). |
| Fighting is not a sign of growth. Absorption is the sign. | संघर्ष ही (काही) विकासाची खूण नाही. (तर) सामावून घेणे ही (विकासाची) खूण आहे. |
| I have never quoted anything but the Upanishads. | मी उपनिषदांतील अवतरणांखेरीज दुसऱ्या (कशातलीही अवतरणे) कधीही दिलेली नाहीत. |

ह्याबाबतीत कधीकधी मूळ वाक्यांची लय किंवा त्यांतील शब्दसंघटनांची समानान्तरता इत्यादी वैशिष्ट्येही टिकवून धरावी लागतात. उदाहरणार्थ,

| | |
|---|---|
| The river is pure that flows, the monk is pure that goes. | वाहती नदी पवित्र असते, भ्रमणशील संन्यासी पवित्र असतो. |
| Make poetry, make art, of it. | तिला/त्याला काव्याचे रूप द्या, तिला/त्याला कलेचे रूप द्या. |

६.३ सरतेशेवटी काही हिन्दी वाक्यांचा परामर्श घेऊ.

| हिन्दी वाक्य | मराठी अनुवाद |
|---|---|
| आदमी को चाहिए कि वह हमेशा सच बोले। | मनुष्याने नेहमी खरे बोलले पाहिजे. |
| संसृति मात्र को संस्कृति समझना राम की बड़ी विशेषता है। | केवळ संसाराला संस्कृती मानणे (हे) रामाचे (फार) मोठे वैशिष्ट्य आहे. |
| रामायण में सत् असत् दोनोंका मिश्रण है। | रामायणात सत् (म्हणजे खरे/ चांगले/उदात्त/योग्य) (व) असत् |

| | |
|---|---|
| | (म्हणजे खोटे/वाईट/अनुदात्त/ अयोग्य) (ह्या) दोहोंचे मिश्रण आहे. |
| दशरथनंदन राम ईश्वर है या मानव, यह कहना कठिन है। | दशरथपुत्र राम (हा) देव आहे की मानव (आहे) हे सांगणे कठीण आहे. |

ह्यावरून हे स्पष्ट होते की, हिन्दी-मराठी-अनुवादांतही पदरमोड व संक्षेपविस्तार ह्या प्रक्रिया अनिवार्य असतात.

येथवर मूळ लिखाणाचा अनुवाद सुस्पष्ट व निःसंदिग्ध व्हावा ह्यासाठी अर्थपूरक शब्दांचा प्रयोग, संक्षेप, विस्तार इत्यादी प्रक्रियांचा अवलंब कसा करावा लागतो, त्याचा आढावा घेतला. आता प्रत्येक भाषेची खास स्वतःची अशी जी एक ढब (= अभिव्यक्तीची विशिष्ट सरणी) असते तिचा अनुवादावर कोणता प्रभाव पडतो, त्याचा विचार करू.

## ७. भाषेची रूढी

७.१ हिंदी वाक्यांच्या मराठी अनुवादाने प्रस्तुत मुद्द्याच्या विचाराला आरंभ करू. 'मैं नकद माल बेचता हूँ।' या वाक्याचे 'मी रोख किंवा रोखीने माल विकतो' हे शब्दाला शब्द ठेवून केलेले मराठी भाषांतर आहे. पण 'माझा रोखीचा व्यवहार आहे', हे मराठीच्या ठेवणीसरसे भाषांतर आहे. 'सात तारीख़ तक के टिकट बिक गए हैं?' हे हिन्दी वाक्य योग्य. पण 'सात तारखेपर्यंतची तिकिटे विकली गेली आहेत', हे त्याचे शब्दशः भाषांतर झाले. पण 'सात तारखेपर्यंतची तिकिटे खपली आहेत', हे मराठीच्या रूढीनुसार असलेले भाषांतर होय. 'इसलिए समय जल्दी कट गया।' ह्या हिन्दी वाक्याचे 'म्हणून वेळ केव्हाच गेला' हे 'म्हणून वेळ लवकर गेला' ह्यापेक्षा अधिक स्वाभाविक ठरते. हिंदीत 'आपका शुभ नाम?' असे विचारण्याची रूढी आहे तर, मराठीत 'तुमचे नाव काय?' असे विचारण्याची रीत आहे. 'मैं गाना (अथवा गुजराती) नहीं जानता।' ह्या हिन्दी वाक्याचा 'मला गाणे (अथवा गुजराती) येत नाही', हा मराठी अनुवाद ग्राह्य ठरेल. ह्याउलट काही मराठी वाक्यांच्या हिन्दी अनुवादांचाही विचार करू.

| मराठी वाक्य | हिन्दी अनुवाद |
|---|---|
| आपण नाटकात काम कराल? | क्या आप नाटक में अभिनय करेंगे? |

| | |
|---|---|
| काय, कसे काय? | कहिये; आप कैसे हैं? |
| चला, चहा घेऊ या. | आइये, हम चाय पियें। |
| मी आपल्यासाठी काय करू? | मैं आपकी क्या सेवा कर सकता हूँ? |
| पुढे गेल्यावर मिठाईची दुकाने लागतील. | आगे चलकर मिठाईकी दुकानें लगेंगी। |
| बोला, कसे काय चालले आहे? | कहिये, कैसी बीत रही है? |
| पाने वाढली आहेत. | थालियाँ लगी हैं। |

७.२ अनुवाद करताना हिन्दी-मराठींतील वाक्संप्रदाय जसा सांभाळावा लागतो तसाच इंग्रजीच्या बाबतीतही सांभाळणे आवश्यक असते. उदाहरणार्थ, 'The elder I grow', ह्या वाक्यार्थाचे 'माझे वय जसजसे वाढत आहे', हे मराठीकरण स्वाभाविक ठरेल. 'The coin rang false' चे समुचित मराठीकरण 'नाणे बद्द वाजले', असे होईल. 'He died a millionaire' ला 'तो मृत्युसमयी लक्षाधीश होता', असा मराठी पेहराव योग्य ठरेल. 'It wouldn't have done to turn down his request' चे सुभग मराठी रूपांतर 'त्याच्या विनंतीला नकार देणे योग्य ठरले नसते', असे होईल. 'We weren't in when she called' चे योग्य मराठीकरण 'जेव्हा ती आली होती, तेव्हा आम्ही घरी नव्हतो', असे होईल. 'The watch loses two minutes a day' ह्या इंग्रजी वाक्याचा आशय 'घड्याळ (दर) रोज दोन मिनिटे मागे पडते' ह्या शब्दांत व्यक्त होईल. 'He was about to go' चे नैसर्गिक मराठीकरण 'तो जाण्याच्या बेतात होता', असे होईल. 'What is to pay?' ह्या प्रश्नात्मक वाक्याचे भाषांतर 'किती पैसे द्यायचे आहेत?' असे करता येईल. सरतेशेवटी काही संस्कृत वाक्यांचे अवलोकन करू.

७.३

| संस्कृत वाक्य | मराठी भाषांतर |
|---|---|
| गुणाः हास्यतां आयान्ति। | गुण हास्यास्पद होतात. |
| तव निर्णये स्थास्यामि। | मी तुझा निर्णय मानीन. |
| स गगनकुसुमानि चिनोति। | तो हवेत इमले बांधत आहे. |
| अधुना प्रभातप्राया रजनी। | आता जवळजवळ पहाट झाली आहे. |
| एष तव वचसः पिण्डितोऽर्थः। | हा तुझ्या बोलण्याचा गोळाबेरीज अर्थ (किंवा सारांश) आहे. |

| | |
|---|---|
| सा परं विषादं अगच्छत्। | तिला खूप विषाद वाटला. |
| गणेशं वाग् वश्या इव अनुवर्तते। | गणेशाचे वाणीवर प्रभुत्व आहे (= वाणी गणेशाची जणू आज्ञाधारक पत्नी आहे). |

वरील संस्कृत वाक्यांची जर क्रमश: 'गुण हास्यास्पद स्थितीला येतात', 'मी तुझ्या निर्णयात उभा राहीन', 'तो आकाशपुष्पे वेचत आहे', 'आता रात्रीची जवळजवळ पहाट झाली आहे', 'हा तुझ्या बोलण्याच्या अर्थाचा गोळा आहे', 'ती खूप विषादाला गेली', 'वाणी गणेशाच्या जणू मागेमागे जाते' अशी शब्दश: भाषांतरे केली असती तर ती कमालीची हास्यास्पद ठरली असती. म्हणूनच भाषांतरकाराला दोन्ही भाषांच्या वाक्संप्रदायांचे (idiom of the language) भान ठेवावे लागते.

## ८. वाक्प्रचार व म्हणी

वाक्संप्रदायांप्रमाणे वाक्प्रचार व म्हणी यांचाही भाषांतरावर परिणाम होत असतो. ह्यांचा शब्दश: अनुवाद कधी अस्वाभाविक तर कधी अनाकलनीय, कधी अर्थहीन तर कधी हास्यास्पद ठरू शकतो. उदाहरणार्थ, 'अंग चोरणे' या वाक्प्रचाराचा 'शरीर या बदन चोरना' असा शब्दश: हिन्दी अनुवाद अर्थशून्य व हास्यास्पद ठरेल. तद्वत 'कळी खुलणे'चा 'कलिका खिलना' हा अनुवाद अर्थदृष्ट्या अगदीच अनपेक्षित ठरेल. म्हणून मुळातील वाक्प्रचाराला व म्हणीला समानार्थक असा वाक्प्रचार व अशी म्हण शोधून काढून तिचा उपयोग अनुवादात करणे इष्ट व आवश्यक असते. ह्या दृष्टीने मराठी व हिन्दी ह्या दोन्ही भाषांतील उदाहरणे विचारात घेऊ.

८.१

| मराठी वाक्प्रचार | हिन्दी अनुवाद |
|---|---|
| अडणीवरचा शंख | अक्कल का दुश्मन |
| टाळाटाळी करणे | अगरमगर करना |
| कढी पातळ होणे | आटा गीला होना |
| हां हां म्हणता | आन की आन में |
| एरंडाचे गुऱ्हाळ | व्यर्थ बकवास |
| जमीनदोस्त करणे | ईंट से ईंट बजाना |
| अत्यंत आदर दर्शविणे | कदम चूमना |
| शोभा वाढणे | चार चाँद लगना |
| बारा गावचे पाणी पिणे | घाट घाट का पानी पीना |

ह्यांपैकी काही मराठी वाक्प्रचार समानार्थक हिन्दी वाक्प्रचारांपेक्षा अधिक चित्रमय आहेत तर ह्याउलट काही हिन्दी वाक्प्रचार तत्समानार्थक मराठी वाक्प्रचारांपेक्षा अधिक चित्ताकर्षक आहेत. अर्थात हा फरक त्या-त्या भाषेच्या प्रकृतीस व संस्कृतीस अनुसरून अपरिहार्यपणे पडतो.

आता काही हिन्दी म्हणींच्या मराठीकरणाचा विचार करू.

८.२

| हिन्दी म्हण | मराठी अनुवाद |
|---|---|
| अन्धा क्या जाने वसन्त की बहार? | गाढवाला गुळाची काय चव? |
| अटका बनिया देय उधार | अडला हरी गाढवाचे पाय धरी |
| अधजल गगरी छलकत जाय | उथळ पाण्याला खळखळाट फार |
| अनमाँगे मोती मिले, माँगे मिले न भीख | 'न मागे तयाची रमा होय दासी' |
| ऊँची दुकान फीका पकवान | नाव मोठे लक्षण खोटे |
| आयी तो रोजी, नहीं तो रोजा | वाजली तर पुंगी नाहीतर गाजर म्हणून खा |
| ओस चाटे प्यास नहीं बुझती | दात कोरून पोट भरत नाही |
| कहाँ राजा भोज, कहाँ गंगू तेली? | कोठे इंद्राचा ऐरावत, कोठे श्यामभटाची तट्टाणी? |
| नानी के आगे ननिहाल की बातें | आजाला नातू शिकवतो |
| नौ सौ चूहे खाकर बिल्ली चली हजको | करून-करून भागला अन् देवपूजेला लागला. |

अशा प्रकारे समानार्थक वाक्प्रचारांच्या व म्हणींच्या योजनेनेच अनुवादात मूळ लिखाणाचा जिवंतपणा टिकवून धरता येतो आणि अनुवाद मुळातल्या वाक्यांइतकाच ठसकेबाज करता येतो.

## ९. सांस्कृतिक परंपरा

आता ह्या अखेरच्या मुद्याचा परामर्श घेऊ. प्रत्येक भाषेत ती भाषा बोलणाऱ्यांची संस्कृती ओतप्रोत भरलेली असते. संबंधित भाषकांच्या परंपरागत कल्पना, श्रद्धा, रूढी, रीतिरिवाज, इतिहास, पूर्वज, समाजजीवन इत्यादी सगळ्यांचे प्रतिबिंब त्यांच्या भाषेत पडलेले असते. किंबहुना, त्यांची भाषा त्यांच्या ह्या सांस्कृतिक वारशाची किंवा परंपरेची 'वाहिका' असते. मूळ लिखाणाची भाषा बोलणारे व अनुवादाची भाषा बोलणारे अशा दोन्ही वर्गांची सांस्कृतिक परंपरा एकच असेल (म्हणजे त्यांचे मूळ एकच असेल) तर असे परंपरावाचक शब्द

व वाक्प्रयोग फार मोठ्या संख्येत उभयसमान असतात. तरीदेखील काही शब्द व वाक्प्रयोग पूर्णपणे वेगळे असतात, कारण ते त्या-त्या वर्गाचे असून त्या-त्या वर्गातच प्रचलित असतात. जेव्हा दोन्ही वर्गांच्या सांस्कृतिक परंपरा भिन्न असतात (उदाहरणार्थ, भारतीय व युरोपीय) तेव्हा असे परंपरावाचक शब्द व वाक्प्रयोग एकमेकांना पूर्णपणे अपरिचित असतात. अशा स्थितीत अनुवादकाला मूळ लिखाणाचा अनुवाद करताना सांस्कृतिक परंपरावाचक शब्दाचा, शब्दसमूहांचा किंवा वाक्प्रयोगांचा अर्थ थोडक्यात स्पष्ट करून कंसात लिहावा लागतो; केवळ शब्दाला शब्द ठेवून (म्हणजे नुसतेच 'भाषा-अन्तर' करून) भागत नाही. उदाहरणार्थ, कल्याणस्वामी ह्या शब्दाचा हिन्दी अनुवाद करताना प्रथमत: कंसात 'रामदास स्वामी के अतिसेवापरायण 'कल्याण' नामक पट्टशिष्य' असा खुलासा करून मग 'अतिभाविक शिष्य' असा अनुवाद केल्यानेच हिन्दीभाषक वाचकाला पूर्ण अर्थबोध होईल. पेढा व बर्फी हे दोन खाद्यपदार्थ हिन्दी भाषकाच्या (पेड़ा व बरफी ह्या स्वरूपांत) परिचयाचे असतात. परंतु हे दोन खाद्यपदार्थ नवजात मुलगा व नवजात मुलगी यांचीही प्रतीके आहेत, हे महाराष्ट्रीय संस्कृतीचे वैशिष्ट्य हिन्दी भाषकाच्या परिचयाचे नसते. म्हणून अनुवादप्रसंगी त्याचा उलगडा करावा लागतो. अशा प्रकारचे खास मराठी संस्कृतीचे वाचक, द्योतक व व्यंजक कितीतरी शब्द हिन्दीत अनुवाद करणाऱ्या अनुवादकाला अमळ विस्ताराने स्पष्ट करावे लागतात. उदाहरणार्थ, दत्त म्हणून उभा, बारभाईंचे कारस्थान, अन्नशुद्धी, हारतुरे, ही (= बायको), हे (= नवरा), उद्धारणे, बारशास जेवणे, मीठ तोडणे, बसायला जाणे (= पूर्वीच्या वळणाच्या बायकांच्या तोंडी असलेला प्रयोग), मागे आलेली (= विधवा), काळी (= शेतीस योग्य जमीन), शंकरासमोरचा, आखाडसासू, द्रविडो लुडबुडाम्यहम्, उतावळा नवरा नि गुडघ्याला बाशिंग ह्या व ह्यासारख्या उक्तिविशेषांचे निव्वळ शाब्दिक अनुवाद एकतर होणारही नाहीत व दुसरे म्हणजे झालेच तर ते दुर्बोध व विफल अनुवाद ठरतील. म्हणूनच अशा विशिष्ट वचनां (expressions) चे अनुवाद करताना आवश्यक त्या स्पष्टीकरणांची जोड देणे अनुवादकाचे कर्तव्य ठरते. ह्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती अशी की, कोणत्याही एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अनुपद अनुवाद (word for word translation) करणे कधीच संभवत नाही.

## १०. समारोप

येथवर अनुवादाचे किंवा भाषांतराचे स्वरूप, भाषांतरात येणाऱ्या अडचणी, त्यांच्या निवारणाचे उपाय, भाषांतरकार्यात अवलंबाव्या लागणाऱ्या निरनिराळ्या युक्त्या, भाषांतरात अनुस्यूत असलेल्या विविध प्रक्रिया, भाषांतरात एकंदरीने घ्यावयाची दक्षता इत्यादी मुद्द्यांची सोदाहरण चर्चा केली. तिच्या समारोपादाखल

असे म्हणावेसे वाटते की, भाषांतर व तेही यशस्वी भाषांतर हे एक कष्टसाध्य बौद्धिक कार्य असते. त्याला शिस्त व कल्पकता ह्या दोहोंची आवश्यकता असते. भाषांतर कसे करावे किंवा अनुवाद कसा करावा हे एखाद्याचे बोट धरून त्याला शिकविता येणार नाही. सरावानेच सरस अनुवादाचे उपाय सुचतात आणि अनुवादाचे कसब अंगी बाणते. जेव्हा अनुवाद प्रतिध्वनिरूप किंवा पडसादासारखा (echo) वाटतो तेव्हा तो निर्जीव व अयशस्वी झाला आहे, असे समजावे; पण जेव्हा तो अस्सल आवाजा (genuine voice) सारखा भासतो, तेव्हा तो यशस्वी झाला, असे मानावे. म्हणूनच निष्कर्ष असा की, एखादा आशय एखाद्या भाषेत अचूकपणे, पूर्णपणे व प्रभावीपणे व्यक्त करणे जितके कष्टसाध्य तितकेच त्याचे भाषांतर करणेही कष्टसाध्य होय! 'वदणे' स्वाधीन म्हणून सोपे पण 'अनुवदणे' पराधीन म्हणून एकंदरीने कठीणच!

❑❑❑

# प्रमुख सहायक ग्रंथ


## इंग्रजी ग्रंथ

The Complete Works of Swami Vivekanand, Mayavati Memorial Edition, vol. viii, Sixth edition, Calcutta, Advaita Ashram, June, 1977.

First Book of Sanskrit, R.G. Bhandarkar, 1st edition, Mumbai, Keshaw Bhikaji Dhavale, 1986.

The Student's Guide To Sanskrit Composition, V.S.Apte, nineteenth edition, Pune, Poona A.V.Griha, 1947.

The Student's Practical Dictionary Hindi English, Ram Narain Lal, fourth edition, Allahabad, 1921.

The Student's Sanskrit English Dictionary, Vaman Shivram Apte, second edition reprint, New Delhi, Motilal Banarsidass, 1997.

## मराठी ग्रंथ

अभिनव शब्दकोश (विद्यार्थ्यांचा शब्दमित्र), संपा. श्रीपाद जोशी, आवृत्ती पहिली, पुणे, व्हीनस प्रकाशन, जानेवारी १९५८.

मराठी भाषेचे वाक्प्रचार व म्हणी, रचनाकार विद्याधर वामन भिडे, चतुर्थ आवृत्ती, पुणे, चित्रशाळा प्रकाशन, १ नोव्हेंबर १९५९.

मराठी स्वयंशिक्षक, गजानन नरसिंह साठे, द्वितीय संस्करण, पुणे, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, १ जुलाई १९७३.

स्वामी विवेकानंद ग्रंथावली खंड आठवा, संपा. स्वामी शिवतत्त्वानंद व स्वामी व्योमरूपानंद, नागपूर, श्रीरामकृष्ण आश्रम, ६ जानेवारी १९६४.

## संस्कृत ग्रंथ

श्रीगुलाबराव महाराजविरचित काव्यसूत्रसंहिता, समालोचक वा.के.लेले, श्रीगुलाबराव महाराज जन्मशताब्दी प्रकाशन, नागपूर, विश्वसंत साहित्य प्रतिष्ठान, १९८१.

श्रीमद्वामनाचार्यविरचिता काव्यालङ्कारसूत्रवृत्तिः, व्याख्याकार केदारनाथ शर्मा, द्वितीय संस्करण, वाराणसी, चौखम्बा अमरभारती प्रकाशन, वि.सं. २०३६ (= सन १९७९).

क्षेमेन्द्रप्रणीत औचित्यसिद्धान्त आणि औचित्यविचारचर्चा, समीक्षक व संपादक वा.के. लेले, प्रथमावृत्ती, वाराणसी, अभिजात ग्रंथावली प्रकाशन, १९६६.

## हिंदी ग्रंथ

भारतीय व्यवहारकोश (सोलह भाषाओंका शब्दकोश), संपा. विश्वनाथ दिनकर नरवणे, द्वितीयावृत्ती, पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८५.


□□□

राजहंस प्रकाशन TM

राजहंस प्रकाशन ™

मराठी भाषेच्या शुद्धीकरणाच्या उद्देशाने तिचे आत्यंतिक 'संस्कृतीकरण' इष्ट की अनिष्ट, दैनंदिन जीवनातील संभाषणात किती विविध व मजेदार वैशिष्ट्ये असतात, पाश्चात्त्य वाक्यसर्जक व्याकरणाच्या नियमांच्या आधारे भाषेच्या अंगभूत सामर्थ्याचा व सौन्दर्याचा कसा शोध-बोध घेता येतो, काही प्राचीन मराठी शब्दांच्या पुनरुज्जीवनाच्या मदतीने मराठी भाषेतील लिहिण्या-बोलण्यात कसा ठसठशीतपणा व टवटवीतपणा आणता येईल, भाषान्तर ही एक कशी आव्हानात्मक व कष्टसाध्य कला आहे, इत्यादी प्रश्नांची सोदाहरण व साधार चर्चा करीत मराठी भाषेच्या सामर्थ्यावर प्रकाश टाकणारे आणि मराठी भाषेचे सौष्ठव प्रत्ययास आणून देणारे हे निबंध सर्वसाधारण वाचकांबरोबरच चिकित्सक अभ्यासकांनाही खचित वाचनीय वाटतील.

**राजहंस प्रकाशन / पुणे**